# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार १२ जूलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ १०








## दिल्ली-हरियाणा भूकंपाच्या धक्क्यांनी पुन्हा हादरले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्ली-एनसीआर आणि हरियाणाच्या झज्जर आणि रोहतक जिल्ह्यांमध्ये संध्याकाळच्या सुमारास भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले. भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.७ इतकी नोंदवली गेली.



अचानक झालेल्या या धक्क्यांमुळे काही काळ घबराट निर्माण झाली. लोक घाबरून घराबाहेर पडले, परंतु कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. आठवड्यात दुस-यांदा भूकंपाचे धक्के जाणावल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालं आहे. शुक्रवारी संध्याकाळी ७:४९ वाजता दिल्ली-एनसीआरमध्ये सलग दुस-या दिवशी भूकंपाचे धक्के जाणवले. दिल्ली आणि गुरु ग्राम सारख्या एनसीआरच्या काही भागात भूकंपाचे धक्के जाणवले. एकाच आठवड्यात दिल्ली आणि गुरु ग्राम, फरीदाबाद, रोहतक आणि हरियाणाच्या आसपासच्या शहरांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवण्याची ही दुसरी वेळ आहे. या भूकंपाचे केंद्र हरियाणातील झज्जर येथे असल्याचे म्हटलं आहे. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या मते, भूकंपाची खोली १० किलोमीटर होती आणि त्याचे अक्षांश २८.६८ अंश उत्तर आणि रेखांश ७६.७२ अंश पूर्व होते. 'लोक घाबरलेले दिसत आहेत. केंद्रबिंदू झज्जर असल्याचेही सांगण्यात आले होते. आज देखील आम्हाला भूकंपाचे धक्के जाणवले. आम्ही देवाकडे प्रार्थना करत आहोत,' असं हरियाणातील स्थानिकांनी म्हटलं. दरम्यान, गुरुवारीही दिल्ली एनसीआरमध्ये भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले होते. १० मिनिटे जमीन हादरत राहिली आणि लोक त्यांच्या घरातून आणि कार्यालयातून बाहेर पडले.

## 'फुलवंती' 7 प्रमुख पुरस्कारांसह यशस्वी!

### फिल्मफेयर मराठीत मान्यवरांचा सन्मान

**मुंबई :** मराठी चित्रपटसृष्टीत मानाचा समजला जाणारा फिल्मफेअर



मराठी पुरस्कार सोहळा नुकताच पार पडला. या पुरस्कार सोहळ्यात मराठी सिनेमा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणा-यांचा सन्मान करण्यात आला. 'फुलवंती' हा चित्रपट सात प्रमुख पुरस्कारांसह या सोहळ्यातील सर्वात यशस्वी चित्रपट ठरला. त्याच्या पाठोपाठ 'पाणी' या चित्रपटाने सहा पुरस्कार पटकावले. महेश मांजरेकर यांना जुनं फर्निचर सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेता (पुरुष) साठी पुरस्कार मिळाला. तर प्राजक्ता माळी (फुलवंती) आणि वैदेही परशुरामी (एक दोन तीन चार) यांना संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (महिला) साठी पुरस्कार देण्यात आला. आदिनाथ कोठारेला पाणीसाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्काराने गौरवण्यात आलं. तर जितेंद्र जोशीला घातसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेता (क्रिटिक्स चाईस) पुरस्कार मिळाला. राजश्री देशपांडेला सत्यशोधकसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (क्रिटिक्स चाईस) म्हणून निवडण्यात आलं. मराठी मनोरंजन विश्वातील दिग्गज मंडळींसह बॉलिवूडमधीलही कलाकार या सोहळ्यासाठी उपस्थित होते. राजकुमार राव, तब्बू, नवाजुद्दीन सिद्दीकी, जयदीप अहलावत हे कलाकार उपस्थित होते. सिद्धार्थ चांदेकर आणि अमेय वाघ यांनी त्यांच्या खास शैलीमध्ये या पुरस्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन केले.


## कारला कंटेनरची धडक; अपघातात 4 भाविक ठार

**नाशिक /प्रतिनिधी :** मुंबई-आग्रा महामार्गावर मुंढेगाव शिवारात मुंबईकडे जाणा-या कारवर वीज प्रकल्पाच्या राखेची वाहतूक करणारा कंटेनर आदळल्याने मुंबई-अंधेरीतील चारजण जागीच ठार झाले. अपघात एवढा भीषण होता की, अपघातात कार पूर्ण चेपली गेली. गुरु पौर्णिमेच्या दिवशी गरुडेश्वर येथील बाबा रामदास समाधी मंदिर आश्रम येथे दर्शन आटोपून घरी परतताना ही दुर्घटना घडली. कंटेनरचालकाने मद्य प्राशन केल्याचे सांगण्यात येते. त्याला अटक करण्यात आले. अंधेरी येथून गुरु वारी सकाळी गुरु पौर्णिमा सोहळ्यासाठी मुंबई येथील बाबा रामदास समाधी मंदिर आश्रमात मुंबई येथून शेकडो गुरु बंधू आले होते. त्यातील एकाच कुटुंबातील तीन भाविक आणि चालक असे चारजण कारमधून अंधेरी येथे जाण्यासाठी निघाले. त्यांची कार महामार्गावर येताच काही मिनिटांत कारला टँकरने धडक दिली. अपघातग्रस्त कारमधील प्रवासी नित्यानंद सावंत (६२), विद्या सावंत (६५), वीणा सावंत (६८) तसेच चालक दत्तात्रेय अंब्राले (रा. मुंबई) जागीच ठार झाले. तिघेही मृत अविवाहित आहेत. नित्यानंद सावंत हे मुंबई महापालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी होते. विद्या सावंत महानगर टेलिफोन निगमच्या सेवानिवृत्त कर्मचारी आहेत.

## देशात बनविणार 214 पाणबुड्या;

### 1.06 लाख कोटींचा संरक्षण करार

**नवी दिल्ली :** भारतीय नौदलाच्या इतिहासातील सर्वात मोठा संरक्षण करार १.०६ लाख कोटींचा पाणबुडी प्रकल्प आता प्रत्यक्षात येण्याच्या मार्गावर आहे. या करारामुळे भारताच्या समुद्री सामर्थ्याला अभूतपूर्व



बळ मिळणार असून, पुढील दशकात भारतीय नौदल जागतिक पातळीवर एक बलाढ्य पाणबुडी शक्ती म्हणून उदयास येईल. या प्रकल्पाचे नाव प्रोजेक्ट ७५१ असे आहे. यात स्वदेशी उत्पादन आणि आंतरराष्ट्रीय भागीदारीचा संयोग असणार आहे. या प्रकल्पांतर्गत, माझगाव ड?क शिपबिल्डर्स लिमिटेड आणि जर्मनीच्या टीकेएमएस या कंपनीमध्ये भागीदारी होणार असून, आधुनिक तंत्रज्ञानयुक्त एचडीडब्ल्यू क्लास २१४ पाणबुडींचे भारतातच उत्पादन होईल. या पाणबुडींमध्ये अत्याधुनिक एआयपी प्रणाली बसवली जाणार आहे, जी त्यांना २ आठवडे पाण्याखाली राहण्याची क्षमता देईल. या करारांतर्गत पहिली पाणबुडी ७ वर्षांत तयार होईल. त्यानंतर दरवर्षी एक पाणबुडी नौदलात दाखल केली जाईल. विशेष बाब म्हणजे, पहिल्या पाणबुडीमध्ये ४५ टक्के स्थानिक उत्पादन, तर सहाव्या पाणबुडीपर्यंत ते ६० टक्क्यांपर्यंत (पान २ वर)

# शिवरायांचे 12 किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळ यादीत

## रायगड, शिवनेरीसह महाराष्ट्रातील 11, तमिळनाडूतील एका किल्ल्याचा समावेश

**मुंबई/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराजांनी रचलेल्या दुर्गराज्याचा ऐतिहासिक ठसा आता आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाला आहे. महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील १ अशा एकूण १२ किल्ल्यांना युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ (World Heritage Site) म्हणून मानांकन मिळाले आहे. हा संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाचा व ऐतिहासिक क्षण ठरला आहे.

या मानांकनासाठी सांस्कृतिक कार्य विभागाच्या अंतर्गत असलेल्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांच्यातर्फे प्रस्ताव तयार करण्यात आला होता. यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी (महाराष्ट्र) आणि जिंजी (तामिळनाडू) यांचा समावेश होता. 'युनेस्को'च्या जागतिक वारसा स्थळ मानांकनासाठी आवश्यक असलेल्या अद्वितीय वैश्विक मूल्य (Outstanding Universal Value)" या निकषांवर हे किल्ले खरे उतरले. शिवकालीन दुर्गांचे सामरिक, स्थापत्य व सांस्कृतिक महत्त्व, सह्याद्रीच्या कुशल वापरातून साकारलेली माची स्थापत्यशैली आणि गनिमी काव्याचे युद्धतंत्र या सर्व बाबी मानांकनाच्या निर्णयामध्ये निर्णायक ठरल्या. या ऐतिहासिक घडामोडीसाठी अनेक शासकीय यंत्रणांनी एकत्रितपणे कार्य केले. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण आणि संस्कृती मंत्रालय, भारत सरकारमार्फत २०२४-२५ या वर्षाकरिता निवडलेल्या ५ प्रस्तावांपैकी महाराष्ट्राचा मराठा लष्करी स्थापत्य हा प्रस्ताव प्रधानमंत्री



कार्यालयाने युनेस्कोकडे पाठविण्यासाठी निवडला होता. या यशस्वी प्रवासात वास्तुविशारद डॉ.शिखा जैन आणि पुरातत्व संचालक डॉ.तेजस गर्गे यांचे योगदान मोलाचे ठरले. 'युनेस्को'च्या ४६व्या अधिवेशनात राज्यातील अधिकारी, गड संवर्धन समिती सदस्य व तज्ज्ञांचा सहभाग होता. ऑक्टोबर २०२४ मध्ये क्ष्क्ग्र्च तज्ज्ञ श्री. ह्वाजोंग ली यांनी या १२ किल्ल्यांची स्थळ भेट घेतली आणि जिल्हाधिकारी व वनविभागांनीही सहकार्य केले.

**राजकीय नेतृत्वाचे प्रभावी योगदान-** या मानांकनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी युनेस्कोच्या महानिदेशकांची भेट घेउन शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, भारताचे युनेस्कोतील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा आणि , पुरातत्व संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी यांच्या प्रयत्नांमुळे हे यश शक्य झाले.

### शौर्य, वारसा आणि पर्यटनाला चालना

*हे मानांकन केवळ ऐतिहासिक किल्ल्यांचे गौरवगान नाही, तर पर्यटन, संशोधन व स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारा निर्णायक टप्पा आहे. या माध्यमातून महाराष्ट्राचे शौर्य, स्थापत्य परंपरा आणि स्वराज्यरचना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर अधोरेखित झाली आहे. 'छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवलेली दुर्गसंपदा म्हणजे महाराष्ट्राच्या शौर्याचा वारसा आहे. 'युनेस्को'चा दर्जा हा त्या ऐतिहासिक समृद्धतेला जागतिक मान्यता देणारा आहे.' असे मत सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी व्यक्त केले आहे.*

### नाशिक जि.प.त 10 वर्षांपासून सुरु होता छळ

## 30 हून अधिक महिलांचे लैंगिक शोषण करणारा विभागप्रमुख निलंबित

**नाशिक/प्रतिनिधी :**नाशिक जिल्हा परिषदेमध्ये विभागप्रमुखाकडून लैंगिक छळ होत असल्याच्या तक्रारी समोर आल्यानंतर खळबळ उडाली आहे. विभागप्रमुखाकडून जिल्हाभरातील विभाग प्रमुखाने अधिकाराचा गैरवापर करत अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे समोर आलं. अधिका-याच्या पदाच्या दबावामुळे संबंधित महिला पुढे येउन तक्रार करण्यास चाचरत




विविध विभागातील ३० हून अधिक महिलांवर जाळे फेकण्याचा प्रयत्न केल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. पुराव्यांसह तक्रारी प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणांची राज्य महिला आयोगाकडून गंभीर दखल घेण्यात आली. त्यानंतर आता ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी त्या विभागप्रमुखाला निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत.

नाशिक जिल्हा परिषदेतील होत्या. मात्र, त्या अधिका-याबाबतची पहिली तक्रार प्राप्त झाली आणि इतर पीडित महिलांनीदेखील तक्रारी केल्या. पीडित महिलांपैकी काहींचा गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ छळ सुरू होता. या अधिका-याने विविध पदांवर असताना त्या-त्या कार्यालयातील, कामाशी संबंध असलेल्या महिला कर्मचा-यांना कामाचा धाक, काही वेळा आमिष दाखवत जाळ्यात (पान २ वर)

## संजय गायकवाडविरोधात गुन्हा दाखल

**मुंबई :** आमदार निवासातील कॅन्टीन कर्मचा-याला मारहाण केल्याप्रकरणी सत्ताधारी शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्यावर अखेर आज




अदखलपात्र गुन्हा दाखल झाला. यामुळे त्यांच्या अडचणींत मोठी भर पडण्याची शक्यता आहे. पण गायकवाड यांनी चांगल्या कामासाठी कितीही गुन्हे दाखल केले तरी हरकत नसल्याचे म्हटले आहे. आमदार संजय गायकवाड यांनी गत मंगळवारी रात्री आमदार निवासातील कॅन्टीनच्या कर्मचा-याला मारहाण केली होती. त्यांनी आपल्याला या कॅन्टीनमधून शिळे अन्न मिळाल्याचा आरोप केला होता. या घटनेचे राजकीय वर्तुळात तीव्र पडसाद उमटले होते. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी गायकवाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल (पान २ वर)

## पैशांनी भरलेली बॅग, हातात सिगारेट

### मंत्री संजय शिरसाटांचा व्हिडीओ व्हायरल

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. दोन दिवसांपूर्वी त्यांनी, त्यांना आयकर विभागाची नोटीस आल्याचा दावा केला होता. दरम्यान, पैशांची बॅग शेजारी घेउन बसले असल्याचा व्हिडीओ समोर आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. अशातच, ठाकरे गटाचे खासदार संजय राउत यांनी शिरसाट यांच्यासंदर्भात केलेला दावा खरा ठरल्याची चर्चादेखील रंगली आहे. राउत यांनी या व्हिडीओसंदर्भात माध्यमांशी संवाद साधताना भाष्य केले होते. पैशांच्या बॅगेसह शिरसाट असल्याचा दावा राउतांनी केला होता. दरम्यान, शिरसाटांचा हा व्हिडीओ समोर आला आहे. यानंतर शिरसाट यांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे.



**काय म्हणाले शिरसाट?-** जो व्हिडीओ पाहत आहात तो माझ्या घरातील आहे. माझं बेडरूम आहे. बेडरूममध्ये मी बसलेलो आहे. बाजूला माझा सर्वात लाडका कुत्रा हा माझ्या बेडरूममध्ये आहे. व्हिडीओबद्दल मला आश्चर्य नाही, यात काही गैर नाही, टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जातोय. एक बॅग ठेवलेली आहे. एवढी मोठी बॅग जर पैशाची ठेवायची असेल तर अलमा-या काय मेल्यात का? या बॅगमध्ये पैसे नाहीत तर कपडे आहेत, असा दावाही संजय शिरसाट यांनी केलाय. संजय राउतांनी आज ठरल्याप्रमाणे भुंकण्याचा काम केले. शिंदे साहेब दिल्लीला अमित शाह साहेबाला भेटले व त्यांनी सांगितलं की माझा पक्ष लागला तर विलीन करा. परंतु मला मुख्यमंत्री करा हे सगळं पाहिलं, तर यांना संताजी-धनाजी दिसतात का? असा प्रश्न आहे. मुर्खासारखे स्टेटमेंट दिसतात. सकाळी उठले का एकनाथ शिंदे, दुपारी उठलं का एकनाथ शिंदे, मेळावा असला की एकनाथ शिंदे संध्याकाळी झोपताना एकनाथ शिंदे ..एवढचं संजय राउत यांचं चालू आहे. गेलेली सत्ता त्यांना स्वस्थ बसू देत नाही. अशा शब्दात राउतांचाही शिरसाटांनी समाचार घेतला.

## 50 खोक्यातला एक खोका शिरसाटांचा

### व्हायरल व्हिडीओ येताच आदित्य ठाकरेंनी खिजवले!

**मुंबई/प्रतिनिधी :** मंत्री संजय शिरसाट हे अडचणीत सापडले आहेत, त्यांना आयकर विभागाची नोटीस आली आहे. या नोटीशीनंतर शिरसाट यांचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राउत यांनी हा व्हिडीओ समोर आणला आहे. यात संजय शिरसाट यांच्या घरात असलेल्या बॅगेत नोटांचे बंडल पाहायला मिळत आहे. यावर आता आमदार आदित्य ठाकरेंनीही भाष्य केले आहे. संजय शिरसाट यांच्या



व्हिडिओवर बोलताना आदित्य ठाकरे यांनी म्हटलं की, आम्ही गेले दोन अडीच वर्षे ५० खोके एकदम ओक्के बोलत आहोत, त्यातील एक खोका आज दिसला. एक आमदार मारामारी करत आहे, आज एक आमदार खोक्यासमोर बसलेला दिसला. बॅगमध्ये काय आहे याबाबत ते बदलून बदलून सांगतील, महात्मा गांधींचा फोटो असलेला बनियान होता, बाकी त्यात काही नव्हतं असं ते सांगतील. पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, ते मंत्री आहेत, त्यांच्यावर आधीही (पान २ वर)

## दारुड्यांना अशी शिक्षा द्या की नशा एका मिनिटात उतरायला हवी

### सुधीर मुनगंटीवारांचे विधान



**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात भाजपाचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत महाराष्ट्र दारूबंदी सुधारणा विधेयक २०२५ विचारात घेण्यात यावे यासाठी प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव मांडताना सुधीर मुनगंटीवार यांनी दारूशी संबंधित विविध मुद्द्यांवर भाष्य केले. याचबरोबर सार्वजनिक ठिकाणी दारू पिणा-यांवर कडक कारवाईच्या तरतुदीचीही मागणी केली. याबाबत बोलताना, त्यांनी सार्वजनिक ठिकाणी दारू पिणा-यांना (पान २ वर)

## भाजप खासदार भलतेच बरळले!

### महिलेने रस्त्याची मागणी केली, म्हणाले- डिलिव्हरीची तारीख सांगा

**भोपाळ/वृत्तसंस्था :** मध्य प्रदेशातील सिधी जिल्ह्यातील लीला साहू रस्त्याची मागणी घेउन, सातत्याने सोशल मीडियावर सक्रिय असतात. आता याच संदर्भातील त्यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर जबरदस्त व्हायरल होत आहे. या व्हायरल व्हिडिओवर भाजप खासदार राजेश मिश्रा यांनी त्यांना विचित्र सल्ला दिला आहे. खासदार म्हणाले, जर त्यांनी डिलिव्हरीची तारीख सांगितली, तर आम्ही त्यांना उचलून रुग्णालयात दाखल करू. आमच्याकडे सर्व व्यवस्था आहे. लीला साहू यांनी एक व्हिडिओ जारी करत, लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारला होता.लीला साहू यांनी यापूर्वीही एक व्हिडिओ तयार करत, थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींकडेच रस्त्याची मागणी केली होती. तेव्हाही त्यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर जबरदस्त व्हायरल झाला होता. आता, लीला साहू या गर्भवती आहेत आणि त्यांनी पुन्हा एकदा गावातील इतर गर्भवती महिलांसोबत असाच एक व्हिडिओ तयार करून रस्त्याची मागणी केली आहे. त्यांनी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनावरही टीका केली आहे. त्यांचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर जबरदस्त व्हायरल होत आहे. सिधीचे



खासदार डॉ. राजेश मिश्रा यांना माध्यमांनी लीला साहू यांच्या व्हिडिओसंदर्भात प्रश्न केला असता, त्यांनी अत्यंत विचित्र उत्तर दिले. ते म्हणाले कालजीचे कारण नाही. आमच्याकडे रुग्णवाहिका आहे, रुग्णालय आहे, आशा कार्यकर्ताही आहेत, आम्ही व्यवस्था करू. डिलिव्हरीची एक संभाव्य तारीख असते, जर त्यांनी आम्हाला सांगितली, तर आम्ही त्यांना एक आठवडा आधीच उचलू आणि रुग्णालयात दाखल करू. ते पुढे म्हणाले, आपण रस्ते बांधत नाही, तर अभियंते बांधतात. कंत्राटदार बांधतात. खासदार राजेश मिश्रा या रस्त्यासाठी काँग्रेसला जबाबदार धरत आहेत. मात्र, गेल्या वेळी भाजपच्या रीती पाठक सिधीच्या खासदार होत्या.




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## विधानसभेत आमदार बकाने यांचा प्रश्न

# बोगस बियाणे आले अंगलट तोटावार निलंबितः भोयरकडे पदभार?

**वर्धा जनमाध्यम :** आ. राजेश बकाने यांनी शेतकऱ्यांना विकलेले बोगस बियाणे प्रकरण विधानसभेत चांगलेच उचलून धरले. अखेर, सरकारला कायदेशीर कारवाई करायला भाग पडले असून वर्धेतील कृषी अधीक्षक अधिकारी तोटावार यांच्यावर ते शेकणार असल्याचे संकेत आहेत. जे पेरले ते उगवले या नियमानुसार तोटावार यांच्यावर अधिकृत निलंबनाची घोषणा होण्याची शयता आहे. यासोबतच या प्रकरणात ज्या ज्या अधिकाऱ्याचे या प्रकरणात हात ओले झाले त्यांच्यावरही कारवाई होणार आहे.

हैदराबाद येथील 'वरुण सीडस अ?ण्ड अग्रोटेक (इंडिया) प्रा. लि. आणि सोनम सीड टेनॉलॉजी प्रा. लि. या कंपन्यांनी सोयाबीनचे बोगस व उगमक्षमतेविना बियाणे विकले. या बोगस बियाण्यांमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसान झाले आहेत. हे बियाणे म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतीची हत्या आहे. त्यामुळे या कंपन्यांवर फसवणुकीचा नाही तर थेट हत्येचा गुन्हा दाखल करा अशी मागणी आ. बकाने यांनी सभागृहात करून वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आस्थेचा आणि भविष्याचा प्रश्न आ. राजेश बकाने यांनी उपस्थित केला होता. त्यामुळे वर्धा जिल्ह्यातील प्रशासनात खळबळ उडाली होती. यावेळी कृषी अधीक्षक तोटावार यांच्यावरही कारवाई करण्याची मागणी केली होती.



शेतकऱ्यांच्या अतिशय जिव्हाळ्याच्या प्रश्नावर आवाज उठवल्यानंतर सरकाने जिल्हा कृषी अधीक्षक तोटावार यांना निलंबित करण्यावर निर्णय घेतला असल्याचे विश्वसनिय सुत्रांनी सांगितले.

दरम्यान, तोटावार यांचा प्रभार नलिनी भोयर यांना देण्यात आले आहे. बियाणे उत्पादक कंपनी सोनम सीड्स आणि वितरक कंपनीवरून सीड्स या दोन्ही कंपन्या संपूर्ण महाराष्ट्रातून ब्लॅकलिस्टेड होण्याची शयता आहे. 'यासोबतच ज्या ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्या त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई नेण्याची मागणीही आ. बकाने यांनी केली होती.

त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय होण्याची शयता आहे. आ. बकाने यांनी दोन दिवसापूर्वी बोगस बियाणे तर काल सेवाग्राम हॉस्पिटलचा प्रश्न अतिशय आक्रमकपणे उचलून धरला. विधानसभेत गेल्या २५ वर्षात प्रथमच देवळीचा आवाज गुंजतो आहे.

राज्यातील हजारो शेतकऱ्यांचे आयुष्य उध्वस्त करणाऱ्या बोगस बियाणे कंपन्यांवर कठोर कारवाई, संबंधित बियाण्यांचे परीक्षण करणारे व नोंदणी देणारे कृषी विभागातील अधिकारी, जिल्हा बियाणे निरीक्षक आणि संशयास्पद मंजुरी देणारे वरिष्ठ अधिकाऱ्यावरही कठोर विभागीय व फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी केली होती.

कारवाई न झाल्यास ही लढाई विधानसभेपासून रस्त्यावर लढवू, असा इशारा देखील आ. बकाने यांनी दिला होता. त्यानंतर सरकारने तोटावार यांच्यावर निलंबनाच्या कारवाईचा निर्णय घेतला असल्याचे सांगण्यात आले.

## श्री प्रल्हाद पै यांचा अमृत महोत्सव अत्यंत उत्साही वातावरणात साजरा

### तब्बल २० हजारांहून अधिक नामधारकांची उपस्थिती

**मुंबई/ प्रतिनिधीः-** सद्गुरु श्री. वामनराव पै यांचे सुपुत्र आणि जीवनविद्या मिशनचे आजीव विश्वस्त प्रल्हाद वामनराव पै यांनी नुकतीच ८ जुलै रोजी वयाची पंच्याहत्तरी पूर्ण केली. याचे औचित्य साधून जीवनविद्या मिशनने श्री प्रल्हाद पै यांचा अमृत महोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला. दुग्धशर्करा योग म्हणजे हा सोहळा १० जुलै गुरु पौर्णिमेच्या दिवशी साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला मुंबईसह महाराष्ट्रातून आणि परदेशातून नामधारक उपस्थित होते. तब्बल २० हजाराहून अधिक लोकांची नोंदणी झाली होती तर लाखो लोकांनी ऑनलाईन हा कार्यक्रम पाहिला.

या कार्यक्रमाची सुरुवात श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या हरिपाठाने झाली. यानंतर कार्यक्रमात गुरुपूजन झाले. त्यानंतर संगीत जीवनविद्येच्या






माध्यमातून सद्गुरुंच्या चरणी संगीत पुष्प अर्पण करण्यात आलं.

या सोहळयात दोन महत्त्वाच्या आणि अधोरेखित करणाऱ्या गोष्टी ठरल्या त्या म्हणजे श्री सद्गुरु वामनराव पै यांच्या 'एकमेव - जनमनाचा असामान्य शिल्पकार' या सद्गुरु चरित्राच्या मुखपृष्ठाचे अनावरण करण्यात आले. या सद्गुरु चरित्राचे मुखपृष्ठ पद्मश्री पुरस्कृत सुप्रसिद्ध सुलेखनकार अच्युत पालव यांनी रेखाटले आहे.

अच्युत पालव यांनी या सद्गुरु चारित्राच्या मुखपृष्ठाच्या अनावरणानंतर आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी म्हटले आहे की, 'पेरुचाळ ते राष्ट्रपती भवनापर्यंतचा हा प्रवास श्री सद्गुरु वामनराव पै यांचा खूप मोठा वाटा आहे'. सद्गुरुंनी दिलेला 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' हा दिव्य संदेश मी माझ्या जीवनात तंतोतंत पाळला.

त्यानंतर श्री प्रल्हाद वामनराव पै यांच्यावर एक पुस्तक लिहिण्यात आलं आहे. 'कृतज्ञ तू कृतार्थ तू' या पुस्तकाचं प्रकाशन करण्यात आले. श्री प्रल्हाद वामनराव पै कायम कृतज्ञतेचे महत्त्व पटवून देतात. प्रल्हाद पै म्हणतात की, 'कृतज्ञता मनात, भरभराट जीवनात'. या पुस्तकाचे प्रकाशन देखील यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

श्री प्रल्हाद पै यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त वाळू शिल्पाच्या (सँड आर्ट) माध्यमातून मानवंदना देण्यात आली आहे. नितेश भारती या कलाकाराने आपल्या कलाकृतीतून प्रत्येक नामधारकाच्या भावना टिपल्या आहेत. या कलाकृतीतून प्रल्हाद दादांचा आतापर्यंतचा प्रवास मांडला आहे.

या कार्यक्रमात प्रल्हाद दादा यांचे औक्षण करुन त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला पद्मश्री अच्युत पालव, डॉ. प्रसाद प्रधान, निलेश जाधव, माजी खासदार संजीव नाईक, माजी खासदार गोपाळ शेट्टी, विजय बाविस्कर भाई गिरकर, सनदी अधिकारी

## फायनान्स कर्मचाऱ्याला चाकूचा धाक दाखवून लुटले

**मोर्शी/ प्रतिनिधीः-** शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात आलेली एका प्रायव्हेट फायनान्स कंपनीची ३१ हजार रुपयाची रक्कम बँकेत जमा करण्यासाठी जात असलेल्या फायनान्स कर्मचाऱ्याला अज्ञात चोरट्यांनी चाकूचा धाक दाखवून लुटले. ही घटना आज दि.११ जुलै रोजी दु.२:३० वाजताचे सुमारास मोर्शी-वरूड रस्त्यावर असलेल्या संकटमोचन हनुमान मंदिराजवळ घडली. पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार हैदराबाद येथील इ रजिस्ट्रीद्वारा संचालित एका प्रायव्हेट कंपनीच्या वतीने हिवरखेड परिसरातील शेतकऱ्यांना कृषी साहित्यासह पेरणीसाठी नगदी पैसे पुरविण्यात आले.त्या रकमेची परतफेड म्हणून रोहनखेड येथील फायनान्स कंपनीचा कर्मचारी निखिल जानराव तायडे (वय २९) याने शेतकऱ्यांकडून वसुल करून आणलेली जवळपास ३० हजार ८०० रुपयाची रक्कम हिवरखेड येथून मोर्शीला आपल्या मोटर सायकलने बँकेत भरण्यासाठी जात असतांना मायवाडी नजीक असलेल्या संकट मोचन हनुमान मंदिराजवळ सदर कर्मचारी लघुशंकेसाठी थांबला होता.दरम्यान दोन अज्ञात इसम तोंडाला दुपट्टा बांधून त्या ठिकाणी आले व निखिल तायडे याला चाकू दाखवून त्याच्याकडून ३० हजार ८०० रुपयाची रोकड हिसकावून घटनास्थळावरून पळ काढला.लगेच फायनान्स कंपनीचा कर्मचारी याने मोर्शी पोलीस स्टेशनमध्ये धाव घेऊन आपली फिर्याद नोंदविली. मोर्शी पोलिसांनी या गंभीर घटनेप्रकरणी ठाणेदार सुरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला असून सीसीटीव्ही फुटेज चेक करण्यात येत आहे.दहा ते पंधरा दिवस अगोदर मोर्शी शहरात भरदुपारी एका फायनान्स कंपनीचे पैसे भारतीय स्टेट बँकेत जमा करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना चाकूच्या धाकावर जवळपास १३ लाखांनी लुटल्याची घटना घडली होती.त्या आधी देखील पोलीस असल्याची बतावणी करून एका वयोवृद्ध इसमाचा सोन्याचा गोफ व अंगुठी लुटण्याचा प्रकार घडला होता.

## १ व १० वरिल उर्वरित

### बिच्छन नदी पात्राच्या डोहात दोन बालकांचा

केली. बुरडघाट हे गाव बुऱ्हानपूर जवळ आहे. त्यामुळे हा भाग कोणत्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत येतो ? याबाबत परिसरात चर्चा होती.नंतर हा भाग भैसदेही मध्यप्रदेश अंतर्गत असल्याची माहिती मिळाली. दरम्यान त्या दोन्ही मृतक लहान मुलांचे शवविच्छेदन करू नये,अशी मागणी नातेवाईकांची होती.याबाबत डॉक्टर,पोलीस आणि नातेवाईकांमध्ये बाचाबाची सुद्धा झाली.यानंतर नातेवाईकांनी शवविच्छेदन न करता दुचाकीवर दोन्ही मृत बालकांचे मृतदेह नेले. याबाबत मृतक बालकांच्या वडिलांनी लेखी सहमती पत्र दिले. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात शोककळा पसरली आहे.

### चारित्र्यावर संशय घेत पत्नीचा

ही अमानुष हत्या केली. गेल्या काही दिवसांपासून विजयलाल यांना पत्नीच्या बाबत संशय होता. त्यामुळे दाम्पत्यात नेहमी वाद व्हायचे. घटनेच्या दिवशी देखील त्यांच्यात वाद झाल्यानंतर संतप्त विजयलाल यांनी स्वयंपाकघरातील गॅस सिलेंडर उचलून पत्नीच्या डोक्यात जोरात घातले. जोरदार आघातामुळे इंद्रकलाबाई जागेवरच कोसळल्या आणि रक्तस्त्रावामुळे त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी मृत महिलेचा मुलगा अक्षय विजयलाल जयस्वाल यांनी लोहारा पोलीस स्टेशनमध्ये वडिलांविरुद्ध फिर्याद दिल्यावर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी घटनास्थळी तातडीने धाव घेऊन आरोपीस ताब्यात घेऊन पंचनामा केला. पुढील तपास सुरू आहे.

### प्रेमसंबंधातून झाला त्या महिलेचा

गुंडाळलेले एका महिलेचे प्रेत सापडले होते. तिच्या हातावर 'A M दुर्गा' आणि 'Anil' अशी नावे गोंदलेली होती. पोलिसांनी तिची ओळख पटवण्यासाठी फोटो सोशल मीडियावर व्हायरल केले. यानंतर परतवाडा येथील एका यूट्यूब पत्रकाराने ती महिला गळंकी गावातील असल्याची माहिती दिली. चौकशीत तिची ओळख दुर्गा विशाल श्रोती अशी पटली. त्यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर अधीक्षक पंकजकुमार कुमावत, सहायक अधीक्षक शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलिस निरीक्षक किरण वानखडे, सहाय्यक निरीक्षक सचिन पवार आणि त्यांच्या टीमने मिळून ही तपासाची कामगिरी पार पाडली.

### सुपर स्पेशलिटीमध्ये आरोग्य

निर्णयानुसार दैनिक भत्ता कर्मचाऱ्यांना देण्यात यावा, कंपनीचे काम बंद झाल्यावर नवीन कंत्राटदारला जुने कर्मचाऱ्यांना रेगुलर बेसिसवर चालू ठेवावे, रोजनदारी तत्त्वावर नवीन लोकांना बोलवण्याऐवजी जुन्या कर्मचाऱ्यांना प्राथमिकता द्या, कर्मचाऱ्यांना वार्षिक बोनस द्या तसेच इतर मागण्यांसाठी काम बंद आंदोलन करण्यात आले.

काम बंद आंदोलन करणाऱ्यांमध्ये प्रहार चे जिल्हाध्यक्ष गौरव ठाकरे ,दीपक शर्मा ,वैभव पाठवले, निशांत काने ,अनिकेत मानकर ,अमोल पोकले, शिल्पा मानकर, शितल पोकळे ,ज्योती राऊत ,अनिकेत तायडे ,पंकज गुडदे ,आकाश निचत ,लक्ष्मण देवगिरी, मुजम्मिल खान, रोहन साखरकर, सुजित भालेराव, योगेश महिगे, दुर्गेश अस्वार ,पवन भेंडे ,विक्रांत, ओम देशमुख, चंद्रकांत पवार, रजनी हरडे, अभिमन्यू बारे, गोविंद कोंधे,रोशन वरघट, जीवन तेलमोरे ,स्वप्निल सरोदे, चंद्रकांत देव ,कार्तिक पन्नासे ,अब्दुल अनिस, शंकर घाटे ,अतुल उईके, सागर गणोरकर ,दिलीप खंडारे, आकाश इंगळे ,वर्षा वानखडे, संगीता शेकडे, दत्ता काठोळे, सुनील गजभिये ,छाया मिश्रा, सोमेश्वर सावंत, शालिनी गावंडे, सुनील भोसले ,शैलेश वानखडे, संतोष इंगळे, रवी गोरले ,नेहा वासनीक, अतुल मोहोड, चैताली पोकळे, नरेश सोलंके, सुनिता चक्रे ,विकास जामनिक, ज्ञानेश्वर लांजेवार ,उमेश मेश्राम सह इतर आरोग्य कर्मचारी सहभागी होते.

### मालखेड रेल्वे अंडरब्रिज पाण्याने

रेल्वे अंडरब्रिज समस्यांची माहिती घेतली. या अंडर ब्रिज बांधकामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परवानगी घेण्यात आलेले नाही, जे अंडर ब्रिज चे स्ट्रक्चर तयार करण्यात आले आहे आणि बांधकाम सुरू आहे ते भविष्याच्या दृष्टिकोनातून धोकादायक आहे. त्यामुळे खा. बळवंत वानखडे यांनी १३ जुलै रोजी तिव्र आंदोलनाचा इशारा रेल्वे प्रशासनाला दिला आहे.

या संदर्भात खा. बळवंत वानखडे यांनी रेल्वे अधिका-यांसोबत दूरध्वनी द्वारे संपर्क साधला आहे. तात्काळ मार्ग संदर्भात आदेश देण्यात आले. या संदर्भात रेल्वे प्रशासना सोबत पत्र व्यवहार करण्यात आला असून रेल्वे प्रशासनाच्या अधिकारी वर्गाला विचारणा केली. यावेळी खासदार वानखडे यांनी नागरीकांच्या सुविधेकरीता काही मागण्या रेल्वे प्रशासनाकडे केल्या आहे. ज्यामध्ये अंडरब्रिजची तातडीने दुरुस्ती व पाणी निचराची व्यवस्था करावी. दुरुस्ती होत नाही तोपर्यंत पर्यायी वाहतूक व्यवस्था उभी करावी, सदर कार्यवाही दि.१२ जुलै २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात यावी असे निर्देश खा. वानखडे यांनी दिले.

या मुदतीपर्यंत योग्य ती कार्यवाही झाली नाही, तर स्थानिक नागरिकांच्या वतीने दि.१३ जुलै २०२५ पासून मालखेड रेल्वे ट्रॅकवर तीव्र आंदोलन करण्यात येईल. सदर आंदोलन शांततेच्या मार्गाने होईल, परंतु त्याची संपूर्ण जबाबदारी रेल्वे प्रशासनावर राहील असा इशाराही खा. बळवंत वानखडे यांनी रेल्वे प्रशासनाला दिला. या पाहणी दरम्यान प्रा. शैलेश गवई , गिरीश चौधरी , नबीभाई इंधलेकर माजी सरपंच इंधला व जिल्हाध्यक्ष सरपंच संघटना, रक्षणा सरदार ग्रामपंचायत सदस्य,संजय नितनवरे सरपंच भानखेडा खुर्द, ब्राह्मणे सरपंच वडगाव जिरे, चदणे,ग्रामपंचायत सदस्य , राजू पिसे माजी सदस्य पारडी, पारडी गावातील १ ते १२ पर्यंतचे सर्व विद्यार्थी, गावकरी मंडळी,शेतकरी, शेतमजूर, मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. तुकाराम चव्हाण,भानखेदा माजी सदस्य, गिरीश कराळे, इंगोले पत्रकार अंजनगावबारी , सोनार काका, ग्रामपंचायत अंजनगावबारी सर्कल मधील सर्व गावातील समस्य ,पोहरा ,भानखेड खुर्द, भानखेड बुद्रूक ठाकरे,उत्तखेद ,पारडी ,वडगाव जिरे, मोगरा येथील नागरिकांसह समस्त गावकरी उपस्थित होते. गेल्या तीन दिवसांपासून अंजनगाव बारी नजीकच्या पार्डी (देवी) भुयारी अंडरपास मार्ग जलमय झाल्याने ग्रामस्थांसह नागरिक ,विद्यार्थ्यांना येता- जाताना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. स्थानिक पार्डी ग्रामपंचायने वारंवार यांचा पाठपुरावा जिल्हा प्रशासनाकडे केला असुन त्यावर कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही. अखेर आज दि.११ जुलै रोजी खासदार बळवंत वानखडे यांनी या मार्गाची पाहणी करून रेल्वे प्रशासनाला कडक सुचना देत रेल्वे गेट ( कॉसिंग) लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी केली. त्यावर येत्या दोन दिवसात निर्णय न घेतल्यास रेल रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. लोकसभेमध्ये पार्डी येथील भुयारी मार्गाचा प्रश्न उपस्थित करणार असल्याचे पार्डी येथील ग्रामस्थांना त्यांनी आश्वासन दिले.

### बॉम्ब असल्याचा कॉल

कंट्रोल रूमला सलग दोन दिवस बॉम्ब ठेवण्यात आल्याचे कॉल मिळाले. विशेष पथक तयार करून मोबाईल नंबरचे लोकेशन ट्रेस करण्यात आले आणि त्या आधारावर सरोज चौकातील दुकान गाठून त्याला रंगेहात पकडण्यात आले.

गणेश तिवारी सात वर्षांपूर्वी अमरावतीत आला होता. शिक्षण घेताना तो विविध नातेवाइकांकडे राहिला आणि सध्या मोबाईल रिपेअरिंग शिकत होता. मात्र खोडसाळ वृत्तीने त्याचे आयुष्य आता गुन्हेगारीच्या दलदलीत ओढले गेले आहे. शहरात तणावाचे वातावरण निर्माण करणाऱ्या या कॉलमुळे प्रशासन सज्ज झाले होते. मात्र पोलिसांच्या सायबर युनिटच्या सतर्कतेमुळे केवळ ४८ तासांत गुन्ह्याचा छडा लागला. सदर आरोपीवर गंभीर स्वरूपाचे फसवणूक व भीती निर्माण करण्याचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### अचलपुर येथून देशी पिस्तूल

पोलिसांनी दुर्गेश ज्ञानेश्वर विजेकर (वय २१, रा. अब्बासपुरा, अचलपूर) यास संशयावरून अटकाव केला. झडती घेतली असता त्याच्या कमरेत देशी बनावटीचे एक पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे सापडली. पोलिसांनी शस्त्राबाबत विचारणा केली असता, आरोपी दुर्गेश विजेकर याच्याकडे कोणताही वैध परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच तो उडवाउडवीची उत्तरे देत होता. अखेर पोलिसांनी पिस्तूल व काडतुसे जप्त केली. याची एकूण अंदाजित किंमत रु. २६ हजार रुपये आहे. सदर आरोपीवर यापूर्वीही दारू विक्रीसारख्या अवैध व्यवसायांमध्ये सहभागी असल्याचे आणि शस्त्रविरुद्ध गंभीर गुन्हे नोंद असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे तो शस्त्र कशासाठी वापरणार होता, त्याने शस्त्र कुठून आणले याचा तपास सुरू आहे. या प्रकरणी सरमसपुरा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियमातील कलम ३ व २५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू असून, आरोपीचे आणखी गुन्हे उघड येण्याची शक्यता आहे. या कारवाईत पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक निलेश चावडीकर, सचिन पवार, पोलिस उपनिरीक्षक शिवचरण मंडघे, अंमलदार युवराज मानमोठे, रविंद्र वर्हाडे, स्वप्नील तंवर, सागर नाठे, शांताराम सोनोने व चालक अनिकेत पाचपोर यांनी सहभाग घेतला.

### फुटपाथवरील अतिक्रमणावर

करण्यात आली. अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे यांच्या नेतृत्वाखाली आणि राजापेठ पोलीस स्टेशनच्या सहकार्याने ही कारवाई पार पडली.

### २७ दिवसाच्या बाळाला गरम

समोर या प्रथेला संपवण्याचे मोठे आव्हान आहे.

माहितीनुसार मेघाटच्या केळी गावात एका २७ दिवसाच्या बालकाच्या पोटामध्ये दुखत असल्यामुळे त्याला गरम सलाखीने ३२ चटके देण्यात आले. यामुळे बालकाची प्रकृती बिघडला. त्याला उपचारासाठी धारणी येथील ग्रामीण रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी सांगण्यात आले होते. मात्र कुटुंबीय त्याला रुग्णालयात घेऊन गेले नाही. त्यांनी घरीच उपचार करणार असल्याचे सांगीतले. यादरम्यान हा प्रकार घडला. सध्या त्या बालकाची प्रकृती स्थिर आहे.

मेळघाटमध्ये आजही अंधश्रद्धा आहे. येथे नागरिकांमध्ये जनजागृती आणि समुपदेशन केले जात आहे कि नाही हा प्रश्न आता या घटनेमुळे पुन्हा उत्पन्न झाला आहे. गेल्या काही दिवसापासून बालकांना चटके देण्याच्या घटना एकामागून एक समोर येत आहे. यावर प्रशासनाला योग्य उपाययोजना करण्याची गरज आहे. पोटामध्ये दुखलं तर आजही येथे गरम सळाखीने चटके दिले जात आहे, किंवा नागरिक तांत्रिकाकडे बालकाला घेऊन जातात. ही आरोग्याच्या दृष्टीने गंभीर समस्या आहे. प्रशासनाला यावर लक्ष देऊन कार्यवाहीची करण्याची गरज आहे.

### तासाभरात लागला चोरीचा

गाडगेनगर पोलीसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासायला घेतले. फुटेजच्या आधारे विक्की दिलीप भोसले (वय ३०, रा. घोडगव्हाण बेलोरपूर, अमरावती) याच्यावर संशय घेण्यात आला. पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेतले. सखोल चौकशीत विक्कीने चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीला गेलेला १७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, पुढील तपास गाडगेनगर पोलिसांकडून सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपआयुक्त सागर पाटील, सहा. पोलीस आयुक्त कैलास पुंडकर आणि निरीक्षक अतुल वर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. प्रत्यक्ष कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोजकुमार मानकर आणि त्यांचे सहकारी पोहवा. निलेश जुनघरे, राजुआप्पा बाहेनकर, गजानन बरडे, सुशांत प्रधान, मतीन शेख, सिद्धार्थ श्रृंगारे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### मनपा आयुक्त सौम्या शर्मा

प्रकल्पासाठी केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांनी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. ताज्या, थंड आणि गोठलेल्या आणि मुल्यवर्धीत माशांच्या खाद्य उत्पादनांचे व्यापार, गोदाम, प्रक्रिया, वितरण आणि निर्यात यासाठी अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये मत्स्य व्यवसाय हब (फिश फूड हब) मध्ये रुपांतरीत होणार आहे.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी अधिका-यांना सांगितले की, फिशरीज हब तयार करुन सर्व आवश्यक सुविधा पुरविण्यासाठी कार्य करावे. ग्राहकांना दर्जेदार मासे उपलब्धता सुनिश्चित करावी. गुणवत्ता नियंत्रण उपकरणे आणि आवश्यकते सह फिशरीज हब प्रदान करावा. स्थानिक फिशर किंवा मासेंच्या शेतक-यांना आवश्यक असलेल्या सर्व गरजा, सुविधा आणि आधारभुत सुविधा पुरविणे गरजेचे आहे. महिलांना सशक्त करणारे ग्रामीण भागात नोकरीची संधी निर्माण करणारा हा प्रकल्प आहे. मत्स्य उत्पादकांना थंड मच्छीचे बाजारपेठ तयार करण्यासाठी आणि आइस्ड आणि गोठलेल्या मासेंच्या उत्पादनासाठी मोबाईल व्हेंडींग वाहने, इंटीग्रेटेड मोबाईल फिश व्हेंटीन्सची निर्मिती करण्यासाठी स्वयंरोजगार निर्माण करणारा हा प्रकल्प आहे. पोस्टहार्वेस्ट सुविधा जसे की आईस्कड फिश, प्रीप्रोसेसिंग, फिश ड्रेसिंग आणि मूल्यवर्धित उत्पादनांचे आणि त्यानुरुप उत्पादकांसाठी आणि ग्राहकांना गुणवत्ता उत्पादनांची पूर्तता या प्रकल्पातून होणार आहे. सदर प्रकल्प गतीमान करुन दर्जेदार करावा अश्या सुचना यावेळी मनपा आयुक्तांनी दिल्या. हा प्रकल्प मंजुर होण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात आले आहे. या प्रकल्पाचे उर्वरीत काम त्वरीत पूर्ण करुन हा प्रकल्प कार्यान्वित करावा. महानगरपालिकेचे सदर कार्य लोकांना रोजगार निर्माण करणारे असून यंत्रणेने सदर कार्य उत्कृष्टरित्या पूर्ण करावे. फिशरीज हब उभारण्याचे कार्य सुरु असून या ठिकाणी होलसेल व रिटेल फिश मार्केट तयार होत आहे. या ठिकाणी फिश ड्रेसिंग सेंटर, आईस प्लांन्ट, होलसेल शॉप ३०, रिटेल शॉप १०, चिल्ड रुम, आईस रुम तयार करण्याचे काम झाले आहे.

### बाजार चौकात महिलेवर

देता अचानक चाकूने हल्ला केला. हल्लेखोराने तोंड, पोट आणि शरीरावर सपासप वार करून त्यांना गंभीर जखमी केले. हल्ल्यानंतर आरोपी पळून गेला. परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदत करत महिलेला रुग्णालयात पोहोचवले. घटनेची माहिती मिळताच वरुड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, कांता परतेकी यांचे प्राथमिक बयान नोंदवून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हल्लेखोराचा शोध सुरू असून पुढील तपास वरुड पोलिसांकडून सुरू आहे.

### खा.अरविंद सावंत यांचा पश्चिम

वाघमारे, जिल्हा संघटिका कल्पना दरवई, माया राणे, योगिता मोहोड युवा सेना जिल्हाप्रमुख अमोल धोपेकर, संकेत ठाकरे विशाल पांडे, युवती सेना जिल्हाप्रमुख मंजुषा वानखडे, प्रगती कावळे यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन राहणार आहे.

### देशात बनविणार २१४ पाणबुड्या;

नेण्याचे उद्दिष्ट आहे.सध्या भारतीय नौदलाकडे १३० पेक्षा अधिक जहाजे आहेत. २०३५ पर्यंत १७५ जहाजांचे बलाढ्य नौदल उभारण्याचे केंद्र सरकारचे लक्ष्य आहे. सध्या ६१ नवीन जहाजांची निर्मिती सुरू आहे. या प्रकल्पांचा उद्देश केवळ संख्या वाढवणे नसून, हिंदी महासागरात भारताची सामरिक उपस्थिती आणि क्षमता वाढवणे हे आहे. चीन आणि पाकिस्तानच्या वाढत्या नौदल हालचालींचा विचार करता, भारतासाठी हे अत्यावश्यक बनले आहे.

### संजय गायकवाडविरोधात

करण्याचे संकेत दिले. पोलिसांनी या प्रकरणाची निश्चितपणे चौकशी केली पाहिजे. अशा प्रकारच्या घटनांसाठी कोणतीही औपचारिक तक्रार आवश्यक नसते. गुन्हा दखलपात्र असेल तर पोलिस स्वतःहून कारवाई करू शकतात, असे ते म्हणाले होते. मुख्यमंत्र्यांच्या या विधानानंतर मुंबईच्या मरीन ड्राईव्ह पोलिसांनी संजय गायकवाड यांच्याविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोशल मीडियातील व्हीडीओ व पोलिस कर्मचा-याच्या तक्रारीच्या आधारावर हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आता या गुन्ह्याची माहिती पोलिसांकडून विधानसभा अध्यक्षांना कळवली जाणार आहे. सेक्शन ३५२, ११५ (२) अंतर्गत ही एनसी दाखल करण्यात आली आहे. यामुळे आमदार गायकवाड यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

### ५० खोक्यातला एक खोका

आरोप झाले आहेत, हॉटेल घेण्याचा प्रयत्न जमीन ढापण्याचा प्रयत्न हे सगळे आरोप त्यांच्यावर झाले आहेत. मुख्यमंत्र्यांनी त्यांची चौकशीही लावली आहे. आता प्रश्न हाच आहे की, या गँगचे ब?स भ्रष्टनाथ मिंदे यांच्यावर कारवाई करणार का?

### दारु ड्यांना अशी शिक्षा द्या की

अशी शिक्षा करावी की, त्यांची नशा एका मिनिटात उतरायला हवी, असे वक्तव्य केले.**शिक्षेच्या तरतुदी आणखी कठोर करण्याची गरज-** दरम्यान, सुधीर मुनगंटीवार यांचे हे वक्तव्य सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे. दारू बंदी सुधारणा विधेयकाचा प्रस्ताव मांडताना ते म्हणाले की, समाजामध्ये सार्वजनिक ठिकाणी दारू पिणा-यांमुळे कायदा व सुव्यवस्था मोठ्या प्रमाणावर बिघडत आहे. यामुळे महिला वर्गामध्येही असुरक्षतेचे व असंतोषाचे वातावरण आहे. सार्वजनिक ठिकाणे, धार्मिक स्थळे आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांवर दारू पिउन अश्लीलता निर्माण करणारे प्रकार वाढत आहेत. हे असले प्रकार करण्याची हिंमत का होते, याची कारणे जाणून घेतल्यावर लक्षात येते की, सार्वजनिक ठिकाणी दारू पिणा-यांसाठी असलेल्या शिक्षेच्या तरतुदी आणखी कठोर करण्याची आवश्यकता आहे. सार्वजनिक ठिकाणी दारू पिण्याच्या मुद्द्यावर बोलताना ते म्हणाले की, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था फक्त दारूवर उभी आहे, हा समज सार्वजनिक ठिकाणी दारू पिउन धिंगाणा घालणा-यांनी करून घेउ नये. हे खरे आहे की, महाराष्ट्रात एक लाख पंचवीस हजार कोटींची दारू प्यायली जाते. महाराष्ट्राच्या उत्पन्नाच्या साधनांपैकी दारू चे उत्पन्न हे महत्त्वाचे साधन आहे, हे जरी खरे असले तरी आपल्यावर एक जबाबदारी आहे.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ शनिवार, १२ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


# पं.स.कारंजा प्रवेशद्वारा समोरील रस्त्याची दुरुस्ती प्रगतीपथावर



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

**दि. ११ जुलै रोजी दैनिक जनमाध्यम या नामांकित व जनसामान्यांच्या प्रश्नाला वाचा फोडणाऱ्या दैनिकात पंचायत समिती, कारंजा (लाड) येथील प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वारासमोरील घाणीची व गटाराची बातमी प्रकाशित झाली होती. संबंधित प्रकाशित बातमीच्या अनुषंगाने बातमी प्रकाशित होते बरोबरच संबंधित रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.**

सततच्या पावसामुळे पंचायत समिती प्रशासकीय इमारतीमध्ये प्रवेश करण्याकरीता असलेल्या प्रवेशद्वारासमोरच गढूळ पाण्याचे गटार व त्यामुळे निर्माण झालेली घाण, कचरा, गाटा याचे साम्राज्य पसरलेले होते. संपूर्ण कारंजा तालुक्यातून नागरिक त्यांच्या दैनंदिन कामाकरिता पंचायत समिती कार्यालयात ये जा करतात. त्याचप्रमाणे प्रशासकीय कार्य कर्तव्य पार पाडणे हेतू संबंधित प्रशासकीय कर्मचारी अधिकारी वर्ग याच प्रवेशद्वाराचा वापर करतात. प्रवेश करते वेळीच प्रवेशद्वारासमोर घाणीचे साम्राज्य असल्यामुळे प्रत्येक नागरिकाला, कर्मचारी व अधिकाऱ्याला नाहक त्रास सहन करून मनस्तापाला सामोरे जावे लागत होते. पंचायत समिती या ठिकाणी कार्यरत कर्मचारी व अधिकाऱ्यांकडे चार चाकी वाहन असल्यामुळे त्यांना त्या प्रमाणात त्रास होत नव्हता. परंतु सामान्य नागरिक तसेच काही प्रमाणात कर्मचारी व अधिकारी दुचाकी किंवा पायदळ आवागमन करायचे. त्यामुळे त्यांना मात्र नाहक त्रास

## प्रशासन ॲक्टिव्ह मोडवर

सहन करावा लागत होता. प्रवेश करते वेळी होणाऱ्या गैरसोयीबद्दल वृत्त प्रकाशित होताच प्रशासनाला खळबळून जाग आली. वृत्त प्रकाशित झाल्याबरोबर युद्ध स्तरावर सत्वर कार्यवाही करून संबंधित रस्ता दुरुस्तीसाठी हालचाली सुरू झाल्यात. अंध प्रशासन जागृत होऊन आवश्यक असलेले व नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीचे निर्मूलन हेतू कार्य करीत आहे. पंचायत समिती कारंजा (लाड) परिसरामध्ये येणाऱ्या नागरिक, कर्मचारी व अधिकाऱ्यांनी याबाबत समाधान व्यक्त केले. दै.जनमाध्यम या वृत्तपत्रामध्ये वृत्त प्रकाशित करून नागरिकांच्या प्रश्नाला वाचा फोडल्याबद्दल आभार मानले. परिसरातील उपस्थित नागरिक व कर्मचारी आप आपसात प्रशासना संबंधी 'नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही.' व 'वरिष्ठांकडून संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अंध दृष्टीकोनाची शस्त्रक्रिया पार पडली' या प्रकारची चर्चा करीत आहे, ऐकिवात आहे.

## कामगार भवन उभारण्यासाठी १६ कोटी ६१लक्ष रु. निधीला मान्यता

**अकोला :** राज्यातील संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी व कामगार विभागातील सर्व कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी कामगार भवन उभारण्यात येणार आहे. अकोला जिल्ह्यात नवीन कामगार भवनाचे बांधकाम करण्यासाठी १६ कोटींहून अधिक रकमेस वित्तीय व प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिली.

अकोला येथील कामगार भवन (नवीन प्रशासकीय इमारत) ८१०० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाच्या शासकीय जागेत प्रशासकीय इमारत बांधकाम व विविध सुविधांसह निर्माण होईल. इमारत प्रशस्त असून तळमजला व त्यावर तीन मजले असतील. विद्युतीकरण, आग प्रतिबंधक, पाणी पुरवठा व मलनि:सारण, संरक्षक भिंत व गेट, अंतर्गत रस्ते, भू-विकास, पार्किंग, फर्निचर आदी बाबींसाठीच १६ कोटी ६१ लाख रु. रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

## आ. सई डहाके यांनी अधिवेशनात अपुऱ्या आरोग्य सुविधांकडे वेधले लक्ष

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**



मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात कारंजा-मानोरा मतदारसंघातील आरोग्य सुविधा अपुऱ्या असल्याच्या मुद्द्यावर आमदार श्रीमती सईताई डहाके यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

त्या म्हणाल्या की, सन् २०१२ पासून उपजिल्हा रुग्णालयाची मान्यता मिळालेली असतानाही, अद्याप सीटी स्कॅन व एमआरआय यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांना अमरावती व अकोला येथे जाऊन खासगी रुग्णालयात महागडे उपचार घ्यावे लागत आहेत.

कारंजा शहराच्या जवळच समृद्धी महामार्ग असल्यामुळे वारंवार अपघात घडतात. अशा दुर्घटनांमध्ये जखमी रुग्णांवर तत्काळ उपचार करता यावेत यासाठी नविन 'ट्रामा केअर सेंटर' सुरू करण्याची गरज त्यांनी अधिवेशनात मांडली.

तसेच, उपजिल्हा रुग्णालयातील जनरल सर्जन, ऑर्थोपेडिक सर्जन व फिजिशियनच्या रिक्त पदे तातडीने भरावीत, अशीही त्यांनी मागणी केली. ब्लड बँक, आयुष विभाग व स्वयंपाकघर कार्यान्वित करण्याची आवश्यकताही त्यांनी अधोरेखित केली. याशिवाय, मतदारसंघातील कामरगाव येथील ग्रामीण रुग्णालयाची अवस्था अत्यंत जीर्ण झाली असून, जवळपास ४०-५० खेड्यांतील सुमारे २०० रुग्ण येथे दररोज उपचारासाठी येतात. त्यामुळे या रुग्णालयाची नवीन इमारत बांधावी व सुविधा वाढवाव्यात, अशी सूचना त्यांनी केली. श्रीमती डहाके यांनी विधानसभेत ठामपणे सांगितले की, परिसरात खासगी आधुनिक रुग्णालये नसल्याने नवीन ट्रामा केअर सेंटर देणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यमान आमदारांनी मतदारसंघातील आरोग्य व्यवस्थेकडे वेधलेल्या लक्षाप्रति नागरिक समाधान व्यक्त करत असून, लवकरच ह्या सुविधा मिळतील विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

## भारतीय जनता पार्टी वाशिमतर्फे गुरुपौर्णिमा उत्सव साजरा; विविध ठिकाणी गुरुजनांचे घेतले आशीर्वाद



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

गुरुपौर्णिमेच्या पावन दिवशी भारतीय जनता पार्टी, वाशिम शहराच्या वतीने शहरात विविध ठिकाणी पारंपरिक श्रद्धेने आणि भक्तिभावाने गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सूचनेनुसार, आमदार श्याम खोडे यांच्या मार्गदर्शनामध्ये तथा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तमची चितलांगे यांच्या उपस्थितीमध्ये व शहराध्यक्ष मनिष मंत्री यांच्या नेतृत्वाखाली भाजपा वाशिम शहराचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते विविध ठिकाणी आयोजित गुरुपूजन कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले.

या प्रसंगी सर्वांनी संबंधित स्थळांवर उपस्थित राहून तेथील गुरुजनांचे दर्शन घेतले, त्यांच्या आशीर्वादाचा लाभ घेतला आणि गुरू परंपरेचे स्मरण करीत त्यांना वंदन केले.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी खालील ठिकाणी कार्यक्रमांना हजेरी लावण्यात आली. बुद्ध विहार, नालंदा नगर, येथे सकाळी गुरुवंदना आणि पूजनीय भंते चा कार्यक्रम पार पडला. श्री दत्त मंदिर, इंदानी पार्क, येथे धार्मिक पूजन व आरतीसोहळा पार पडला. महंत श्री शंकर बाबा मठ, लाखाळा, येथे शिष्यांना आशीर्वाद देत महंतांनी समाजात सेवाभावाचा संदेश दिला. आचार्य विजयप्रकाश दायमा महाराज, अग्रसेन भवन येथे त्यांच्या विचारांचे दर्शन आणि गुरुपूजन झाले.

## जे.डी.चवरे विद्यामंदिरचे नऊ विद्यार्थी गुणवत्ता यादीत



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेची गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली असून यामध्ये कारंजा येथील जे. डी. चवरे विद्यामंदिरच्या इयत्ता ५ वी चे ४ तर ८ वी चे ५ विद्यार्थी असे एकूण ९ विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले आहेत.

इयत्ता पाचवीची कु. स्निग्धा राहूल आखाडे (२७ वी मेरिट) ही शाळेतून सर्वप्रथम आली असून ओवी महेश काकड (३० वी मेरीट), स्वानंद अभिजीत देशपांडे (४२ वा मेरीट), कु. यशश्री विनोद दाभाडे (६१ वी मेरीट) तसेच वर्ग ? ८ वी मधून शाळेतून सर्वप्रथम निकुंज शरद जयस्वाल (१४ वा मेरीट), लोकेश मनोज राठोड (२३ वा मेरीट), कु. खानसा फिरदोस शाहनवाझ खान (३० वी मेरीट), कु. प्रीती सचिन वानखेडे (३८ वी मेरीट), पार्थ गणेश पोहाने ( मागासवर्ग प्रवर्गातून १ला मेरीट) येऊन बाजी मारली आहे

शिष्यवृत्ती परीक्षेची पूर्वतयारी करण्यासाठी राहुल आखाडे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्याकरिता शाळेकडून विशेष वर्गाची व्यवस्था करण्यात आली होती.

## विधान परिषदेमध्ये आ.अमोल मिटकरी यांच्या आवाजाला यश
## पांगरी नवघरे-अमानी पुलाच्या उंची वाढीला तात्काळ मान्यता

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघातील पांगरी नवघरे ते अमानी या मार्गावरील धोकादायक पुलाच्या उंची वाढवण्याचा प्रश्न पावसाळी अधिवेशनात विधान परिषदेचे आमदार अमोल मिटकरी यांनी पुरवणी मागण्या मध्ये प्रभावीपणे सभागृहात मांडला. विशेष म्हणजे त्यांनी हा प्रश्न मांडताच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे यांनी तात्काळ सकारात्मक उत्तर दिले आणि पुलाच्या उंची वाढीला मान्यता दिली.

या निर्णयामुळे दोन दशके नागरिकांच्या जीवावर बेतणाऱ्या या पुलाचा प्रश्न मार्गी लागला आहे. या



संदर्भात भागवत मापारी, अमोल गायकवाड, दत्ता शिंदे, विवेक गवळी यांचे मोलाचे सहकार्य लाभले असुन अनेक वेळा पुरामुळे या पुलावरून वाहतूक ठप्प होत असे ये-जा करणाऱ्या नागरिकांना नाहकच त्रास सहन करावा लागत असे आता मात्र या निर्णयामुळे गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला असून, 'आमचा आवाज अखेर ऐकला गेला,' असे भावनिक उद्गार अनेकांनी काढले. त्यामध्ये सोनाटी, मांगुळ झनक, मसला पेन, बेलखेडा, रिठद, जोडगव्हाण, पार्डी टकमोर राज्य मार्ग क्र ३९९ वरील गावांमध्ये अनेक ठिकाणी लहान पूल आहेत. ज्यांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. त्यापैकी काहींची उंची वाढवण्याची तातडीची गरज आहे. या पार्श्वभूमीवर आमदार अमोल मिटकरी यांनी केलेली लक्षवेधी मागणी नागरिकांच्या आशा पल्लवित करणारी ठरली. पांगरी नवघरे ते अमानी रस्त्यांवरच्या लहान पूल विषयी यांना त्वरित प्रतिसाद मिळाल्याने नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे.

## क्रांतीसूर्य महात्मा फुले भाजीबाजार प्रवेशद्वार व तैलचित्र उभारण्याची मागणी



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी पाटणी चौक वाशिम येथील भाजीबाजार व व्यापारी संकुलाच्या प्रवेशद्वारावर भव्य कमान उभारावी तसेच त्या ठिकाणी महात्मा फुले यांचे पूर्णाकृती तैलचित्र लावावे, अशी मागणी सामाजिक व धार्मिक कार्यकर्ते आयु. जग्गु रामभाऊ राऊत यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

या संदर्भात त्यांनी दि. ३० जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर केले. निवेदनात म्हटले आहे की, न.प. वाशिमने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले भाजीबाजार व व्यापारी संकुलाची उभारणी १९ सप्टेंबर २००१ रोजी केली असून, समाजसुधारक महात्मा फुले यांच्या नावाने या बाजाराचे नामकरण करण्यात आले आहे. मात्र, आजपर्यंत महात्मा फुले यांची ओळख दर्शविणारे कुठलेही दृश्यात्मक चिन्ह किंवा माहिती फलक त्या ठिकाणी लावण्यात आलेले नाही.

महात्मा फुले हे जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेले थोर समाजसुधारक असून, त्यांचे कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि त्यांच्या स्मृती जपण्यासाठी भाजीबाजाराच्या प्रवेशद्वारावर त्यांचे नाव असलेली भव्य कमान उभारणे आणि पूर्णाकृती तैलचित्र लावणे अत्यंत आवश्यक आहे, असे श्री. राऊत यांनी स्पष्ट केले आहे.

तसेच, या भाजीबाजार व व्यापारी संकुलामध्ये सामाजिक सभागृह उभारावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. यापूर्वी २४ एप्रिल २०२५ रोजी नगर परिषदेकडे यासंदर्भात निवेदन दिले होते, परंतु अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या मागणीमुळे नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, महात्मा फुले यांचे कार्य व विचार पुढे नेण्याच्या दृष्टीने ही बाब महत्त्वाची ठरणार आहे.


### जाहीरनामा

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार लक्षणं केरबा पठाडे रा. तोंडगाव ता.जि.वाशिम यांनी मौजे तामसाळा येथिल गट नं. ४७/३ मधिल क्षेत्र ०.७२ हे आर हे आर या जमिनितील ७/१२ मधिल इतर अधिकारातील संरक्षित कुळ या रकान्यात विठाबा मारोती ता. जि. वाशिम हि कुळाची नोंद कमी करण्यात यावी असा अर्ज या कार्यालयात प्राप्त झाल्यावरून प्रकरण सुरु करण्यात आले.

तरी सदर प्रकरणात मौजे तामसाळा येथिल गट नं.४७/३ मधिल ०.७२ हे आर हे आर या जमिनितील ७/१२ मधिल इतर अधिकारातील संरक्षित कुळ या रकान्यात विठाबा मारोती हि कुळाची नोंद कमी करून मिळणे बाबत प्रकरणात कोणाचे आक्षेप व हरकती असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून १५ दिवसाचे आत सादर करावेत मुदतीत प्राप्त न झालेल्या आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व प्रकरणात योग्य तो आदेश पारित करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक -
ठिकाण -वाशिम

शिक्का

**सही**
**(निलेश पळसकर)**
**तहसिलदार, वाशिम**


## मंगरूळपीर शहरातील बसस्थानक आवारातील रस्ते चिखलमय!



**■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■**

शहरातील बस स्थानक आवारातील खड्डे त्रासदायक ठरत असून या खड्यांमध्ये पाणी साचल्याने डासांचे प्रमाण वाढले आहे. परिणामी नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विशेषतः खड्डयांत साचलेल्या पाण्यामुळे गाळ व घाण निर्माण होत असून त्यामुळे प्रवाशाच्या दैनंदिन जीवनमानावरही गंभीर परिणाम होत आहे.

शहरातील बस स्थानक प्रवेशद्वारासमोरील रस्ता मुख्य रस्ता असून रस्त्यावर पावसाचे पाणी थांबले आहे. तसेच बसस्थानक-जुनी वस्तीकडे जाणारा रस्ता आणि या बस स्थानकालगतचे मार्ग या ठिकाणीही पाणी साचून घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नगर परिषदेकडून या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. वेळेत रस्त्यावरील खड्डयांची दुरुस्ती न झाल्यामुळे प्रवाशाची समस्या अधिकच तीव्र झाली आहे. त्यामुळे बाहेरून ये-जा करणारे प्रवाशी हैराण झाले असून त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. रस्त्यावर साचलेले पाणी आणि त्यात वाढलेला घाण व गाळ ही समस्या दिनेंदिन वाढत आहे. विशेषतः पावसाळ्यात नागरिकांना रोजच्या व्यवहारांमध्ये खूप अडचणी येत आहेत. यामुळे स्थानिक नागरिकांचे आरोग्य समस्याही गंभीर बनत आहे.

डासांचा प्रादूर्भाव वाढल्याने मलेरिया आणि डेंग्यूसारख्या आजारांचा धोका वाढला आहे. या स्थितीमुळे नागरिक तणावात आहेत. प्रशासनाने तातडीने दुरुस्ती कार्य सुरू करून रस्त्यांवरील खड्डयांचा निपटारा करावा. अशी मागणी नागरिकात जोर धरत आहे.

## गुरु पौर्णिमा निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**वर्ग शिक्षकांचा सत्कार करून माजी विद्यार्थी झाले उत्तराई**



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

भारतीय संस्कृतीत गुरूला अनन्य साधारण महत्व आहे गुरुविना शिक्षा ही संकल्पना पूर्ण होऊ शकत नाही त्यामुळे गुरुच्या सन्मानार्थ गुरु शिष्याचे नाते अधोरेखित करणाऱ्या गुरु पौर्णिनेला वापटी कुपटी येथील जिल्हा परिषद शाळेत नुकताच कार्यक्रम संपन्न झाला. ३०,३५ वर्षांपूर्वी ज्याच्या कडून ज्ञानाचे धडे गिरवले त्या शिक्षकांना एका मंचावर बोलावून त्याचे हस्ते शाळेतील विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप आणि वृक्षारोपण करीत गुरुदक्षिणा देण्याचा अभिनव कार्यक्रम वापटी कुपटी येथील जिल्हा परिषद शाळेत गुरु पौर्णिमेनिमित्त माजी विध्यार्थ्यांनी एकत्र येत नुकताच संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अशोक टाके हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून गटशिक्षणाधिकारी श्रीकांत माने, माजी मुख्याध्यापक तथा केंद्र प्रमुख शा. ना. गावंडे, केंद्र प्रमुख प्रदीप वनारसे, माजी सरपंच अंबादास पाटील काकड, माजी सरपंच गोविंदराव कराळे, महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघांचे जिल्हा अध्यक्ष बंडूभाऊ इंगोले, काँग्रेस कमेटीचे तालुका अध्यक्ष विजय देशमुख, पोलीस पाटील गणेश निघोट, माजी सरपंच प्रल्हाद काळे प्रभारी मुख्याध्यापक गजानन मोरे आदीची प्रमुख उपास्थिती होती.

## कारंजा तालुक्यातील दोन जि.प.शाळेत शून्य पटसंख्या, शाळेला लागले टाळे

### जि. प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी पटसंख्येत कमालीची घसरण

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

पंचायत समिती कारंजा (लाड) अंतर्गत असलेल्या जि.प. प्राथमीक शाळांना विद्यार्थी पटसंख्येच्या अभावी अखेरची घरघर लागलेली आहे. कारंजा तालुक्यातील दोन जि. प. प्राथमिक मराठी शाळांमध्ये वर्ग एक ते वर्ग पाच या वर्गामध्ये शून्य विद्यार्थी पटसंख्या असल्यामुळे संबंधित शाळा बंद करण्यात आलेली असल्याचे धक्कादायक वृत्त सामोरे आले आहे. मागील शैक्षणिक सत्रांमध्येसुद्धा एका जि. प. प्राथमिक मराठी शाळेला टाळे ठोकण्यात आले आहे, हे येथे उल्लेखनीय आहे.

सविस्तर वृत असे की, पंचायत समिती कारंजा (लाड) च्या कार्यक्षेत्रा अंतर्गत कारंजा तालुक्यामध्ये एकूण १४५ जि. प. प्राथमिक शाळा कार्यरत होत्या. त्यापैकी १२६ शाळा ह्या मराठी माध्यमातून व १९ शाळा उर्दू माध्यमातून शिक्षादानाचे कार्य करीत होत्या. मागील शैक्षणिक सत्र सन २०२४-२५ मध्ये वाकी येथील मराठी माध्यमाची जि. प. प्राथमिक शाळा शून्य विद्यार्थी पट असल्यामुळे बंद करण्यात आली. तर चालू शैक्षणिक सत्र सन २०२५-२६ यावर्षी दि. १ जुलै २०२५ रोजीच्या आकडेवारी नुसार तालुक्यातील गणेशपूर व कुऱ्हाड येथील जि. प. प्राथमिक मराठी शाळेमध्ये शून्य




विद्यार्थी पटसंख्या असल्याने सदर दोन्ही शाळेला टाळे लागले आहे. १४५ जि. प. प्राथमिक शाळेपैकी सद्यस्थितीत १४२ शाळाच चालू स्थितीत आहे. चालू असलेल्या शाळेपैकी १७ शाळा तर अक्षरशः मृत्यूशय्येवर असल्याप्रमाणे अखेरची घटका मोजीत आहे. या १७ शाळेत विद्यार्थी पटसंख्या हि ०१ ते १० च्या आतच आहे. यातील १४ शाळा ह्या मराठी माध्यमाच्या असून उर्वरित ०३ शाळा उर्दू माध्यमातून शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळा आहेत. तसेच २८ शाळा व्हेंटिलेटर असल्याप्रमाणे कृत्रिम श्वास घेत आहेत. या २८ शाळेतील विद्यार्थी पटसंख्या हि ११ ते २० च्या आत आहे. यातील २४ शाळा ह्या मराठी माध्यमाच्या असून उर्वरित ०४ शाळा उर्दू माध्यमातून शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळा आहेत. याप्रकारे मराठी माध्यम ३८ शाळा व उर्दू माध्यम ०७ शाळा अशा एकूण ४५ प्राथमिक शाळेमध्ये २० विद्यार्थी संख्येच्या आतमध्ये पटसंख्या आहे.

विद्यार्थी संख्या उपलब्ध न झाल्यामुळे जि. प. प्राथमिक शाळा बंद करण्याची वेळ जि.प. प्रशासनावर का आली याबाबत सखोल अभ्यास होणे अत्यंत गरजेचे आहे. सद्यस्थितीत कार्यरत एकूण १४२ प्राथमिक मराठी व उर्दू माध्यम शाळेत मंजूर पदस्थापनेनुसार एकूण ४३० पदांची आवश्यकता आहे. त्यामध्ये मुख्याध्यापक १०, सहाय्यक शिक्षक ३१३, पदवीधर विज्ञान शिक्षक ५५, पदवीधर भाषा शिक्षक ३६, पदवीधर सामाजिक शास्त्र शिक्षक ०२ व केंद्रप्रमुख १४ याप्रकारे मंजूर पदांचा समावेश आहे. पंचायत समिती, कारंजा (लाड) शिक्षण विभागांतर्गत सध्या ४१९ पदान्वये कर्मचारी, अधिकारी कार्यरत आहेत. यामध्ये मुख्याध्यापक ०५ (रिक्त ०५), सहाय्यक शिक्षक २९४ (रिक्त १९), पदवीधर विज्ञान शिक्षक ५७ (अतिरिक्त ०२), पदवीधर भाषा शिक्षक ५२ (अतिरिक्त १६), पदवीधर सामाजिक शास्त्र शिक्षक ०६ (अतिरिक्त ०४) व केंद्रप्रमुख ०५ (रिक्त ०९) याप्रमाणे सद्यस्थितीत कार्यरत आहेत. आकडेवारीनुसार रिक्त पदांचा अनुशेष हा गौण स्वरूपातील आहे.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २२७ ■ शनिवार, १२ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

## विधानसभेत आमदार बकाने यांचा प्रश्न

# बोगस बियाणे आले अंगलट तोटावार निलंबितः भोयरकडे पदभार?

**वर्धा जनमाध्यम :** आ. राजेश बकाने यांनी शेतकऱ्यांना विकलेले बोगस बियाणे प्रकरण विधानसभेत चांगलेच उचलून धरले. अखेर, सरकारला कायदेशीर कारवाई करायला भाग पडले असून वर्धेतील कृषी अधीक्षक अधिकारी तोटावार यांच्यावर ते शेकणार असल्याचे संकेत आहेत. जे पेरले ते उगवले या नियमानुसार तोटावार यांच्यावर अधिकृत निलंबनाची घोषणा होण्याची शयता आहे. यासोबतच या प्रकरणात ज्या ज्या अधिकाऱ्याचे या प्रकरणात हात ओले झाले त्यांच्यावरही कारवाई होणार आहे.

हैदराबाद येथील 'वरुण सीडस अ?ण्ड अग्रोटेक (इंडिया) प्रा. लि. आणि सोनम सीड टेनॉलॉजी प्रा. लि. या कंपन्यांनी सोयाबीनचे बोगस व उगमक्षमतेविना बियाणे विकले. या बोगस बियाण्यांमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसान झाले आहेत. हे बियाणे म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतीची हत्या आहे. त्यामुळे या कंपन्यांवर फसवणुकीचा नाही तर थेट हत्येचा गुन्हा दाखल करा अशी मागणी आ. बकाने यांनी सभागृहात करून वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आस्थेचा आणि भविष्याचा प्रश्न आ. राजेश बकाने यांनी उपस्थित केला होता. त्यामुळे वर्धा जिल्ह्यातील प्रशासनात खळबळ उडाली होती. यावेळी कृषी अधीक्षक तोटावार यांच्यावरही कारवाई करण्याची मागणी केली होती.



शेतकऱ्यांच्या अतिशय जिव्हाळ्याच्या प्रश्नावर आवाज उठवल्यानंतर सरकाने जिल्हा कृषी अधीक्षक तोटावार यांना निलंबित करण्यावर निर्णय घेतला असल्याचे विश्वसनिय सुत्रांनी सांगितले.

दरम्यान, तोटावार यांचा प्रभार नलिनी भोयर यांना देण्यात आले आहे. बियाणे उत्पादक कंपनी सोनम सीड्स आणि वितरक कंपनीवरून सीड्स या दोन्ही कंपन्या संपूर्ण महाराष्ट्रातून ब्लॅकलिस्टेड होण्याची शयता आहे. 'यासोबतच ज्या ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्या त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई नेण्याची मागणीही आ. बकाने यांनी केली होती.

त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय होण्याची शयता आहे. आ. बकाने यांनी दोन दिवसापूर्वी बोगस बियाणे तर काल सेवाग्राम हॉस्पिटलचा प्रश्न अतिशय आक्रमकपणे उचलून धरला. विधानसभेत गेल्या २५ वर्षात प्रथमच देवळीचा आवाज गुंजतो आहे.

राज्यातील हजारो शेतकऱ्यांचे आयुष्य उध्वस्त करणाऱ्या बोगस बियाणे कंपन्यांवर कठोर कारवाई, संबंधित बियाण्यांचे परीक्षण करणारे व नोंदणी देणारे कृषी विभागातील अधिकारी, जिल्हा बियाणे निरीक्षक आणि संशयास्पद मंजुरी देणारे वरिष्ठ अधिकाऱ्यावरही कठोर विभागीय व फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी केली होती.

कारवाई न झाल्यास ही लढाई विधानसभेपासून रस्त्यावर लढवू, असा इशारा देखील आ. बकाने यांनी दिला होता. त्यानंतर सरकारने तोटावार यांच्यावर निलंबनाच्या कारवाईचा निर्णय घेतला असल्याचे सांगण्यात आले.

## सर्किट ब्रेकर'च्या माध्यमातून वीज अपघात टाळा

**वर्धा जनमाध्यम:** पावसाळ्याच्या दिवसांत विजेच्या तारा, भिंती किंवा उपकरणांतून वीजप्रवाह उतरून अपघात होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असते. अशा गंभीर विद्युत अपघातांपासून स्वतःचा आणि कुटुंबाचा जीव वाचवण्यासाठी घर, दुकान किंवा इतर आस्थापनांमध्ये सर्किट ब्रेकरचे सुरक्षा कवच बसवून घ्यावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

घरगुती वायरिंगमध्ये बिघाड, करंट लिकेज किंवा योग्य क्षमतेचे 'सर्किट ब्रेकर' आणि 'अर्थिंग' नसणे हीच या अपघातांची मुख्य कारणे असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. त्यामुळे वीज सुरक्षेला प्राधान्य देत प्रत्येक नागरिकाने खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे,

**सर्किट ब्रेकर म्हणजे काय?**

सर्किट ब्रेकर हे आपल्या घरातील किंवा व्यावसायिक ठिकाणातील विद्युत यंत्रणेसाठी एक अत्यंत महत्त्वाचे सुरक्षा कवच आहे. विजेच्या संभाव्य अपघातांपासून संरक्षण मिळवण्यासाठी आणि उपकरणे सुरक्षित ठेवण्यासाठी याचा वापर करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

एखाद्या सर्किटवर क्षमतेपेक्षा जास्त विद्युत भार (उदा. एकाच सॉकेटमध्ये अनेक उपकरणे लावणे) येतो, तेव्हा तारा गरम होतात आणि आग लागण्याचा धोका असतो. सर्किट ब्रेकर तात्काळ हा अतिरिक्त भार ओळखतो आणि वीजपुरवठा खंडित करतो, ज्यामुळे शॉर्ट सर्किट आणि आगीचा धोका टळतो. वायरिंगमध्ये बिघाड झाल्यास किंवा दोन विद्युत तारा एकमेकांना चिकटल्यास 'शॉर्ट सर्किट' होते. यामुळे अचानक प्रचंड विद्युत प्रवाह निर्माण होतो, ज्यामुळे उपकरणे जळू शकतात किंवा आग लागू शकते. सर्किट ब्रेकर हे धोकादायक शॉर्ट सर्किट होताच वीजप्रवाह बंद करतो. विशेषतः 'अर्थ लीकेज सर्किट ब्रेकर' (थ्र्ँ) किंवा 'रेसिड्युअल करंट सर्किट ब्रेकर' (ंर्णँ) हे मानवी जीवाला विद्युत धक्क्यापासून वाचवण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. जर एखाद्या व्यक्तीला विजेचा धक्का लागला किंवा विद्युत प्रवाहाची गळती (लीकेज) झाली, तर हे ब्रेकर काही मिलीसेकंदात वीजपुरवठा बंद करतात, ज्यामुळे गंभीर दुखापत किंवा मृत्यूचा धोका टळतो. फ्रिज, टीव्ही, वॉशिंग मशीन, पंखे यांसारख्या महागड्या विद्युत उपकरणांना ओव्हरलोड किंवा शॉर्ट सर्किटमुळे होणाऱ्या नुकसानीपासून वाचवण्यासाठी सर्किट ब्रेकर अत्यंत प्रभावी ठरतो. वीज अचानक बंद झाल्याने उपकरणांना नुकसान होत नाही. घरातील एखाद्या विशिष्ट भागातील वायरिंगमध्ये काम करायचे असल्यास, त्या भागातील सर्किट ब्रेकर बंद करून सुरक्षितपणे काम करता येते, ज्यामुळे संपूर्ण घराची वीज बंद करण्याची गरज लागत नाही. त्यामुळे, मिनिएचर सर्किट ब्रेकर (श्र्ण), अर्थ लीकेज सर्किट ब्रेकर (थ्र्ँ) किंवा रेसिड्युअल करंट सर्किट ब्रेकर (ंर्णँ) यांसारखे योग्य क्षमतेचे सर्किट ब्रेकर घरात बसवण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.केवळ सर्किट ब्रेकरच नव्हे, तर वीज सुरक्षा व्यवस्थेमध्ये 'अर्थिंग' हे तितकेच महत्त्वाचे आहे. घरात किंवा उपकरणांमध्ये अतिरिक्त वीजप्रवाह निर्माण झाल्यास, तो सुरक्षितपणे जमिनीखालील 'अर्थिंग'द्वारे वाहून जातो. यामुळे विजेचा धक्का बसण्याचा धोका टळतो. नवीन वास्तू बांधताना अर्थिंगसह सर्किट ब्रेकर बसवणे अनिवार्य आहे. मात्र, जुन्या इमारतींमध्ये किंवा घरात ते बसवलेले नसल्यास, ते तातडीने बसवून घेणे आवश्यक आहे. तसेच, प्रत्येक दोन वर्षांनी आपल्या घरातील अर्थिंग योग्य स्थितीत आहे की नाही, याची खात्री करून घ्यावी, असेही महावितरणने सांगितले आहे

## भद्रावतीचा दुचाकी चोरटा अमरावतीतुन अटक



**वर्धा जनमाध्यम :** स्थानिक गुन्हे शाखेच्या चमूने दुचाकी चोरट्यास अमरावती येथून अटक करून चोरीतील दुचाकी जप्त केली. गौरव उर्फ गोलू जाधव (३०) रा. वार्ड ५ आंबेडकर शाळेजवळ, भद्रावती जि. चंद्रपूर असे चोरट्याचे नाव आहे. अजिंक्य चौधरी (२४) रा. राधानगर प्रतापनगर यांच्या मालकीची एम. एच. ३२- ए. डोड. ११०१ या क्रमांकाची दुचाकी बसस्थानक समोरील कुरिअर ऑफीस समोर ठेवलेली दुचाकी चोरून नेली. तक्रारीवरून शहर पोलिसांनी गुन्हा नोंद केला.

या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेची चमू करीत होती. गौरव उर्फ गोलू मोहन जाधव याने दुचाकी चोरी केल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्या आधारे पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने दुचाकी चोरीची कबुली दिली. त्याच्या ताब्यातून ८० हजार रुपये किमतीची दुचाकी जप्त केली. ही कारवाई पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, पोलिस उपनिरीक्षक राहुल इंटेकर, पोलिस अंमलदार नरेंद्र पाराशर, चंद्रकांत बुरगे, भूषण निघोट, अमोल नगराळे, मंगेश चावरे, दीपक साठे, मिथून जिचकार आदींनी केली.

## वैद्यकीय विद्यार्थ्यांची जिल्हा व सत्र न्यायालयाला अभ्यास भेट

# वैद्यक न्यायालयीन प्रकरणांमध्ये जाणून घेतले डॉक्टरांचे महत्त्व

**वर्धा जनमाध्यम -** दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठ संचालित सावंगी येथील जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालयातील फॉरेन्सिक मेडिसिन व टॉक्सिकोलॉजी विभागाद्वारे शैक्षणिक उपक्रमांतर्गत वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी जिल्हा व सत्र न्यायालय भेट आयोजित करण्यात आली. यावेळी भावी डॉक्टरांना विविध न्यायालयांतील न्यायिक प्रक्रिया प्रत्यक्ष पाहण्याची संधी प्राप्त झाली.



या आगळ्यावेगळ्या न्यायालय भेट उपक्रमात विद्यार्थ्यांना वैद्यकीय व न्यायालयीन जबाबदाऱ्यांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. समाजात घडणारे खून, लैंगिक अत्याचार, हुंडाबळी आणि इतर गंभीर स्वरूपातील वैद्यक न्यायालयीन प्रकरणांमध्ये तज्ज्ञ साक्षीदार म्हणून डॉक्टरांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबाबत प्रत्यक्ष अनुभव घेता आला. जिल्हा व सत्र न्यायालयाच्या प्रधान न्यायाधीशांनी हा उपक्रम अत्यंत स्तुत्य व प्रभावी असल्याचे प्रतिपादन केले.

या भेटीदरम्यान सरकारी अभिवक्ता ?ड. गिरीश टाकवले, ?ड. विनय घुडे व इतर कर्मचारी वृंदाने विद्यार्थ्यांना साक्षीदार म्हणून डॉक्टरांचे योगदान आणि न्याय मिळवण्यासाठी त्यांच्या कार्याचे महत्त्व याबाबत सखोल मार्गदर्शन केले. या उपक्रमात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचाही समावेश होता. विधी सहाय्य सचिव ?ड. विवेक देशमुख यांनी लोक न्यायालय आणि इतर सेवा यांचे कार्य तसेच गुंतागुंतीचे कायदेशीर वाद स्वतःच्या अनुभवांद्वारे कसे निकाली काढले जातात, याची माहिती दिली. त्यांच्या अनुभवामुळे पर्यायी वाद निवारण प्रणालीमुळे न्याय मिळण्यात येणारा वेग व न्यायालयाची कामाची कक्षा कशी वाढते, हेही स्पष्ट झाले. तर, ?ड. प्रदीप गौतम यांनी विधी सेवा प्राधिकरणाचे उद्देश व कार्य स्पष्ट केले. हा उपक्रम फॉरेन्सिक मेडिसिन व टॉक्सिकोलॉजी विभाग प्रमुख डॉ. सुधीर निनावे यांच्या नेतृत्वात आणि वरिष्ठ प्राध्यापक डॉ. ए.जे. अंजनकर व डॉ. ए.एन. केवलिया यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आला. यावेळी डॉ. पवन वानखडे, डॉ. वेदांत लेकुरवाळे, डॉ. अभिजीतसिंग लखेरा, कोर्ट मॅनेजर एस.के. मिर्झा, ए.डी. वाडबुधे आणि यू.यू. बोटकुळे यांचे सहकार्य लाभले.

# इनरव्हील क्लब गांधी सिटीच्या नव्या कार्यकारणीत नवा उपक्रम

## -ऑर्थोपेडिक बँक सुरू

**वर्धा जनमाध्यम :** सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या महिलांच्या संघटनेत इनरव्हील क्लब गांधी सिटी वर्धा या संस्थेचा नवीन कार्यकाळ १ जुलैपासून रोहिणी सराफ यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाला. क्लबने समाजसेवेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आणि ऑर्थोपेडिक बँक सुरू केली. या बँकेच्या माध्यमातून क्लब आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींना मदत करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. बँकेत व्हीलचेअर, कॉम्बो चेअर, बबल बेड, वॉकिंग स्टिक, ?डजस्टेबल बेड, जॉइंट डायपर पाऊच इत्यादी सुविधा देण्यात आल्या आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे रोटे, महेश मोकलकर, रोटे, डॉ. प्रवीणा खेर, डॉ. किरण खेर, डॉ. रश्मी साहू, सीए नितीन मुंदडा, उपस्थित



होते. आंतरराष्ट्रीय डॉक्टर दिन आणि सीए दिनानिमित्त सर्वांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात क्लब सदस्य विजया मोहता यांनी केली आणि क्लबच्या उपाध्यक्षा सुनीता शर्मा यांनी आभार मानून समारोप केला. यावेळी रोटे, डॉ प्रविणा खेर, क्लबच्या सदस्या साधना बन्नोरे, स्मिता व्यास, रुपाली डांगे, प्रिया मुनोत, गीता राऊत, आरती काशीकर, विजया मोहता आदींसह क्लबचे ३० सदस्य, रोटरी क्लबचे १० सदस्य, तसेच इनरव्हील क्लबचे पदाधिकारी अध्यक्ष रोहिणी सराफ, उपाध्यक्ष सुनील शर्मा, सुनील पाटील आदी उपस्थित होते.श्रुती साहू, सी.सी.किरण साहू, आयएसओ मंदाकिनी चुडीवाले आदी उपस्थित होते.

# राष्ट्रासाठी मध्यस्थी याविशेष मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## -२३० प्रकरणांपैकी ५० प्रकरणे प्रशिक्षित मध्यस्थांद्वारे निकाली

**वर्धा जनमाध्यम :** न्यायालयीन प्रक्रियेत प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे परस्पर सहमतीने जलद निवारण करणे, पक्षकारांचा वेळ, खर्च व श्रम वाचविणे आणि न्यायव्यवस्थेवरील भार कमी करण्यासाठी संपूर्ण देशभरात राष्ट्रासाठी मध्यस्थी ही विशेष मोहिम ९० दिवस राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात १ ते १० जुलैपर्यंत राबविण्यात आलेल्या या मोहिमेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून २३० प्रकरणांपैकी ५० प्रकरणे प्रशिक्षित मध्यस्थांद्वारे मध्यस्थी करुन निकाली काढण्यात आली आहे.

जिल्ह्यातील न्यायालयांमध्ये ज्या पक्षकारांचे प्रकरण प्रलंबित आहेत त्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारुका केले आहे. विशेष मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी न्या.संजय भारुका यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पातळ्यांवर नियोजन करण्यात येत असून जिल्ह्यातील सर्व न्यायीक अधिकारी यांनी अधिक प्रभावीपणे न्यायालयातील प्रलंबित तडतोडीस पात्र प्रकरणे मध्यस्थी केंद्राकडे अधिवक्ता व पक्षकार यांच्या सहकार्याने पाठविण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

विशेष मध्यस्थी मोहिम राष्ट्रासाठी मध्यस्थी अंतर्गत दिनांक १ ते १० जुलै पर्यंत जिल्ह्यातील सर्व न्यायालयाकडून एकुण २३० प्रकरण मध्यस्थी करीता मध्यस्थी केंद्र, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले असून त्यापैकी ५० प्रकरण मध्यस्थी प्रक्रियेद्वारे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथील प्रशिक्षीत मध्यस्थांद्वारे मध्यस्थी करून निकाली काढण्यात आले.

सदर ५० प्रकरणांपैकी दिनांक १० जुलै रोजी एन. एम. पंचरिया, न्यायाधीश, कामगार न्यायालय यांच्या मार्फत उपदान प्रधान अधिनियम अंतर्गतचे एकुण ३८ प्रकरणे मध्यस्थी करीता मध्यस्थी केंद्राकडे पाठविण्यात आली. संपूर्ण ३८ प्रकरणे मध्यस्थांच्या मध्यस्थीने निकाली काढण्यात आले. सदर प्रकरणामध्ये एकूण रक्कम रूपये २६ लक्ष १५ हजार ७१९ धनादेशाव्दारे संबंधित अर्जदारांना वितरीत करण्यात आले. दोन्ही बाजुच्या पक्षकारांनी सकारात्मक भुमिका घेतल्यामुळे मध्यस्थी प्रक्रियेस अपेक्षित यश प्राप्त झाले, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव विवेक देशमुख यांनी सांगितले.

# चक्क.. ६ वर्षांनंतर सायगव्हान येथे पोहचली लालपरी

## ग्रामस्थांनी केले मोठ्या उत्साहात लालपरीचे स्वागत

**समुद्रपुर जनमाध्यम :** तालुक्यातील सायगव्हान येथे ६ वर्षांपासून बससेवा बंद झाल्याने वडगाव , सायगव्हान, सावंगी, लोखंडी येथील शाळकरी विद्यार्थी व गावकऱ्यांना वडगाव पाटिपर्यंत पायपीट करावी लागत होती. गावकऱ्यांनी यासंबंधी वेळोवेळी हिंगणघाट आगारासी संपर्क साधून निवेदन देऊन सायगव्हान बस सुरू करण्याच्या सूचना दिल्या होत्या.



मात्र या सुचनाची दखल घेऊन आगाराच्या वतीने शुक्रवारी ११ वाजता बस पाठविण्यात आली गावात लालपरीचे आगमन होताच गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी शाळकरी विद्यार्थी व गावकऱ्यांनी बसची विधीवत पूजा करून चालक व वाहकाचे पुष्प देऊन स्वागत केले.गावात बस सुरू झाल्याने सायगव्हान सावंगी लोखंडी वडगाव येथील गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

पुणे येथील दिवाणी न्यायाधीश / सिनियर डिव्हिजन साहेब यांचे पुणे येथे श्री. एम. पी. [illegible] कोर्टात
[illegible] अर्ज नं. [illegible]
[illegible]

**जाहिर नोटीस**

श्री. [illegible] ..... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

नोटीस देण्यात येते की, [illegible] [illegible] ह्या कोर्टाकडे [illegible] [illegible] अर्ज केलेला आहे.

[illegible] ह्या कोर्टात हजर रहावे.

आज दि. [illegible] रोजी माझे सही व शिक्यानिशी दिली.

[illegible]
सही
[illegible],
दिवाणी न्यायालय, पुणे

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर**
**महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम**
**कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा प्रकल्प विभाग, वर्धा**

**फोन नं./फॅक्स नं. ई-मेल etwode@gmail.com**
**जा.क्र. /चि.शा.निम्न वर्धा प्रकल्प/२०२५ दिनांक २०२५**

**जाहीर सूचना**

नांदगांव वितरिकेवरील अंत्य लघू कालवा च्या टेल आउटले टकम ए स्केप पासून निघणाऱ्या टेलिंग ड्रेनकरीता भूसंपादन प्रस्ताव मौजा - मनसावळी, ता.हिंगणघाट, जि.वर्धा

खालील भूसंपादन क्र.व संपादित आराजी नुसार जागा १) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग शासन निर्णय संकीर्ण क्र.०३/प्रक्र.३४/अ-२ मंत्रालय, मुंबई दिनांक १२.०५.२०१५ व २) शासन निर्णय दि.३०.०९.२०१५ आणि महसूल व वनविभाग शासन परिपत्रक क्र.एल.डी.एन.०१/२०१७/प्र.क्र./अ-२, दिनांक २५.०१.२०१७ अन्वये सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्यासाठी अनुसरावाच्या कार्यपध्दतीनुसार जिल्हाधिकारी (भूसंपादन) वि.पा.वि.मं.वर्धा यांचे कार्यालयातर्फे कार्यवाही करण्यात येत आहे. खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या जमिनीचे विवरण खालील प्रमाणे आहे.याबाबत संबंधित भूधारकाचे काही आक्षेप असल्यास ही जाहीर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपले आक्षेप अर्ज या कार्यालयात सादर करावे. अन्यथा तद्नंतर आपले कुठलेही म्हणणे एकूण घेतल्या जाणार नाही, ह्याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | मौजा | त.सा. क्र. | भूमापन क्र. | तहसील | एकुण क्षेत्र (हं.आर) | थेट खरेदी पध्दतीने घ्यावयाचे क्षेत्र (हे.आर) | जल/अजल सिंचित ७/१२ प्रमाणे | भुधारकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

**मौजा - मनसावळी, ता.हिंगणघाट, जि.वर्धा**

नांदगांव वितरिकेवरील अंत्य लघु कालवाच्या टेल आऊटलेट, कमएस्के पासून निघणाऱ्या टेलिंग ड्रेन करीता भूसंपादन प्रस्ताव मौजा - मनसावळी, ता.हिंगणघाट, जि.वर्धा येथील बांधकामाकरीता संपादित करावयाच्या जमिनीचे विवरण पत्र

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मनसावळी | ८५/१ | १.४ | ०.०८ | अजल | नायर कोलसर्व्हीसेस तर्फे संचालक संशांत सुरेश नायर |
| २. | मनसावळी | ८५/२ | २.५७ | ०.११ | विहीर/नदी | रविंद्र सौभागमलजी डुंगरवाल |

तयार करणार - सहाय्यक अभियंता श्रेणी-१,
लघु पाटबंधारे उपविभाग, क्र. १
वर्धा

कार्यकारी अभियंता,
निम्न वर्धा प्रकल्प, विभाग

क्र.जिमाका-वर्धा/८२/२०२५-२६



# निधीविना राज्यातील विकासकामे खोळंबली

## ■ 288 आमदारांचे हाल
## ■ फंडातील बहुतांश कामांना ब्रेक



**मुंबई/प्रतिनिधी :** जुलैचा मध्य येउनही आमदारांच्या मतदारसंघातील विकासकामांसाठी सरकारकडून अजूनही एक पैसाही मिळालेला नाही. त्यामुळे राज्यातील सर्वसामान्य योजनांची कामे पूर्ण ठप्प झाली आहेत. कामांमधील ही स्थगिती जनतेच्या नाराजीचं कारण बनत असून लोकप्रतिनिधींना तीव्र दबावाला सामोरे जावे लागत आहे. दरम्यान, लाडकी बहिण योजनेवरील वाढत्या आर्थिक भारामुळे इतर योजनांच्या निधीचे वितरण रखडल्याची जोरदार कुजबुज सुरू आहे.

आमदारांनी आपआपल्या मतदारसंघातील कामे सूचवून त्याला प्रशासकीय मान्यता घेउन ठेवली आहे. आता चालू पावसाळी अधिवेशनात निधीबाबत चर्चा होउन तो उपलब्ध झाल्यावरच निविदा प्रक्रिया व निधी वितरण होणार आहे. सध्या सर्व आमदारांचे अधिवेशन काळात निधी मंजूर करु न घेण्याकडे कल दिसत आहे. नव्याने सत्तेत आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने फेब्रुवारी २०२५ मध्ये नवनिर्वाचित आमदारांना सुरवातीला १ कोटी ८० लाख रुपयांचा निधी दिला होता. पण चालू आर्थिक वर्ष उजाडूनही त्यानंतरचा निधी वितरीत झालेला नाही.

दरम्यान, लाडकी बहिण योजनेसाठी सरकार दरवर्षी जवळपास ४५ हजार कोटींचा खर्च करत असल्याने, अर्थसंकल्पीय भार प्रचंड वाढला आहे. त्यामुळे काही खात्यांचा निधी लाडकी बहिण योजनेसाठी वळवण्यात आल्याची चर्चा आहे. त्यामुळे सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाचा निधी वळवल्याचे आरोप झाले. मात्र सरकारने हे आरोप फेटाळले आहेत. सामान्यतः प्रत्येक आमदाराला त्यांच्या मतदारसंघात विकासकामांसाठी दरवर्षी पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जातो.

या रकमेतून रस्ते बांधणी, समाजमंदिरांचे निर्माण, पथदिवे बसवणे, तसेच पाणीपुरवठ्याच्या सुविधा उभारणे अशा प्राथमिक गरजा पूर्ण केल्या जातात. यंदाही बहुतांश जिल्ह्यातील आमदारांनी अशाच स्वरूपाची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर केले आहेत. मात्र, निधीच न मिळाल्याने हे सर्व प्रस्ताव सध्या फाईलमध्येच अडकून पडले आहेत.

परिणामी निधीअभावी राज्यातील सर्वच २८८ आमदारांचे हाल आहेत.

**सर्वच आमदार अडचणीत-** राज्यातील सत्ताधारी व विरोधी पक्षातील सत्तेच्या कुठल्याही बाकावर असो, सगळयाच पक्षांचे आमदार सध्या निधीअभावी अडचणीत सापडले आहेत. निधी मिळत नसल्याने सर्वच आमदारांना मतदारसंघातील कामे करता येत नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.

**जनतेतून रोष-** मतदारसंघातील नागरिकांकडून कामांची विचारणा सुरू असतानाही निधी न मिळाल्याने लोकप्रतिनिधींना कुठलाच ठोस उत्तर देता येत नाही. त्यामुळे राजकीय दबाव वाढत असून परिस्थिती हाताबाहेर जात असल्याची भावना आमदारांमध्ये आहे. परिणामी, जिल्ह्याचा विकास पुन्हा रूळावर आणण्यासाठी शासनाने तातडीने निधी वितरीत करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# राज्यात पशुपालन व्यवसायाला कृषी व्यवसायाचा दर्जा

## - पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचे विधानसभेत निवेदन

**मुंबई/प्रतिनिधी :** पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात पशुपालन व्यवसायास कृषी व्यवसायाचा दर्जा देण्यात आला आहे. राज्यातील पशुपालन व्यवसायाला मोठा दिलासा देणारा हा निर्णय असून असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली.



पशुसंवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले, पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी हा क्रांतीकारी निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ७६.४१ लक्ष पशुपालक कुटुंबांना होईल. या निर्णयामुळे पशुजन्य उत्पादनातून सुमारे ७,७०० कोटी रुपये इतकी वाढ अभिप्रेत आहे. मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले, या निर्णयानुसार राज्यातील वीज दर आकारणी, कृषी इतर या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्याकरिता कृषी व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते त्याच दराने कर आकारणी करण्यात येईल. पशुपालन व्यवसायासाठी आवश्यक असणा-या खेळत्या भागभांडवलासाठी घेण्यात येणा-या कर्जासाठी पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेच्या धर्तीवर व इतर प्रयोजनासाठी घेण्यात येणा-या कर्जावरील व्याज दरात ४ टक्के पर्यंत सवलत देण्यात येईल व त्यासाठी स्वयंस्पष्ट मार्गदर्शक तत्वे व कार्यपध्दती विहित करण्यात येईल आणि कृषी प्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यात येईल.

> ■ असा निर्णय घेणारे देशातील महाराष्ट्र पहिले राज्य
> ■ ग्रामीण उद्योजक तयार होणार
> ■ पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी क्रांतीकारी निर्णय

राज्याच्या सकल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १२ टक्के आहे. कृषी क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के आहे. राज्यातील पशुजन्य उत्पन्नाचा विचार करता भारतीय आरोग्य परिषदेने दैनंदिन आहारात शिफारस केलेल्या प्रमाणाइतके अंडी व मांस उपलब्ध नाही. तसेच दुग्ध उत्पादनात राज्यातील पशुधनाची उत्पादन क्षमता इतर राज्यांच्या तुलनेत कमी आहे. याशिवाय निती आयोगाच्या सन २०२१ च्या अहवालामध्ये पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपूर्वक व शास्त्रीय पद्धतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असून त्यावर उपाययोजना करु न शेतकरी / पशुपालकांच्या आर्थिक जोखीम कमी करण्याची शिफारस केली असल्याचेही पशुसंवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले.

# राज्यात 3,367 धार्मिक स्थळांवरील भोंगे हटवले

## भोंग्यांच्या दंडातील अर्धी रक्कम तक्रारदाराला

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील सर्व धार्मिक स्थळांवरील अनधिकृत भोंगे हटविण्यात आले असून मुंबईतील एकाही धार्मिक स्थळावर सध्या भोंगा नाही. मुंबई पोलिसांनी आतापर्यंत एकूण १,६०८ अनधिकृत भोंगे हटवले असून, ही संपूर्ण कारवाई कोणताही तणाव निर्माण न होता शांततेत पार पडली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात स्पष्ट केले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आजअखेर राज्यातील ३,३६७ धार्मिक स्थळावरील भोंगे हटविण्यात आले आहेत. आता विनापरवानगी लावलेल्या भोंग्यांवरील दंडाची अर्धी रक्कम तक्रारदाराला देण्यात येईल. राज्यात कुठेही पुन्हा विनापरवानगी भोंगा लावल्यास, त्या भागातील संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिका-यावर जबाबदारी निश्चित केली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

जंगल परिसरात कोणत्याही प्रकारचे वाद्य वाजवण्यास बंदी असेल. यासाठी वन विभाग आणि पोलीस प्रशासनाला स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी सर्व पोलीस आयुक्तांच्या कार्यालयांतर्गत विशेष भरारी पथके स्थापन केली जाणार असून ते भोंग्यांविरोधात तत्काळ कारवाई करतील. भोंग्यांवर कारवाईसाठी प्रमाणित कार्यप्रणाली लागू करण्यात आली आहे. ध्वनी प्रदुषण होवू नये म्हणून ध्वनीप्रदुषणाबाबत व्यापक जनजागृती करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले. सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. यावेळी सदस्य आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, देवयानी फरांदे, जितेंद्र आव्हाड, वि श्वजीत कदम, सना मलिक यांनी चर्चेत सहभाग घेतला.

# अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी मंत्री गडकरी यांच्यासोबत संयुक्त बैठक घेणार

**मुंबई/प्रतिनिधी ::** राज्यातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करून यासंदर्भात लवकरच केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत संयुक्त बैठक घेण्यात येईल, असे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विधानसभेत सांगितले.

विधानसभा सदस्य विजयसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या दुर्दैवी अपघातात प्रवाशांचा मृत्यू प्रकरणी लक्षवेधी सूचना मांडली होती. या लक्षवेधी सूचनेस उत्तर देताना मंत्री श्री. भोसले बोलत होते. मंत्री श्री. भोसले म्हणाले, रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी रोड सेल्फी असिस्ट आधुनिक तंत्रज्ञानाधारित प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे रस्त्यावरील विविध धोकादायक ठिकाणांची प्रत्यक्ष छायाचित्रांसह नोंद घेतली जाते. तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा रस्ता सुरक्षा समिती गठीत करण्यात आली असून यामध्ये तांत्रिक अधिका-यांचा समावेश आहे. बीड जिल्ह्यातील रस्ते अपघात आणि आवश्यक उपाययोजना संदर्भात उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा रस्ता सुरक्षा

# भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केलेल्या विकासकांवरील कारवाईसाठी कायद्यात सुधारणा करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात महापालिका क्षेत्रात इमारतींच्या विकासकांना महानगर पालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असते. भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केलेल्या विकासकांवर कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र नगररचना अधिनियम कायद्यात सुधारणा करण्याकरिता अभ्यास गट स्थापन करण्यात येईल, अशी माहिती नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

भोगवटा प्रमाणपत्र न मिळालेल्या इमारतींबाबत सदस्य राजन नाईक यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेचा चर्चेत सदस्य मुरजी पटेल, स्नेहा दुबे, मनीषा चौधरी यांनी उपप्रश्न विचारत सहभाग घेतला. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, वसई - विरार महापालिका क्षेत्रात भोगवटा प्रमाणपत्र न मिळालेल्या इमारतींमध्ये नागरी सुविधांची कामे अडविली जाणार नाही. कुणालाही नळ जोडणीअभावी पाण्यापासून वंचित ठेवल्या जाणार नाही. नळ जोडणी देण्यासाठी उपाय योजना



करण्यात येतील. भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केलेल्या विकासकांच्या अन्य गृहनिर्माण प्रकल्प तसेच इमारतींना मंजुरी दिली जाणार नाही. तसेच वसई - विरार महापालिकेत भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या इमारतींमधील नागरिकांना शास्ती न लावण्याच्या सूचना देण्यात येतील. नागरिकांना मालमत्ता कर हा विकासकांकडून वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येईल. याबाबत निर्णय घेण्यासाठी संबंधित अधिकारी व विभागाची बैठक घेण्यात येईल, असेही नगरविकास राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांनी सांगितले.

# शनि शिंगणापूर देवस्थानमधील आर्थिक अनियमिततेबाबत दोषींवर फौजदारी गुन्ह्यांचे आदेश

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** अहिल्यानगर जिल्ह्यातील शनि शिंगणापूर देवस्थानमध्ये आर्थिक अनियमितता आणि गैरव्यवहार झाल्याचे धर्मादाय आयुक्तकार्यालयाकडून आलेल्या अहवालात स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी बाह्य तपास यंत्रणांची नियुक्ती करण्याचे निर्देशही दिले जातील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. सदस्य विठ्ठल लंघे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित मांडली होती. यावेळी सदस्य सुरेश धस यांनी चर्चेत सहभाग घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देवस्थानमध्ये बनावट ॲप आणि पावत्यांद्वारे देणगी वसुल करून तसेच हजारो बनावट कर्मचा-यांची नोंद




करून गैरव्यवहार झाल्याचे चौकशी अहवालातून स्पष्ट झाले आहे. चौकशी समितीच्या अहवालानुसार, संस्थानच्या विविध विभागांत २४४७ बनावट कर्मचारी दाखवण्यात आले. त्यांच्या नावाने पगाराचे पैसे काही अन्य व्यक्तींच्या खात्यांत वळते करण्यात आले. रुग्णालय विभागात ३२७ कर्मचारी दाखवले गेले, प्रत्यक्षात केवळ १३ कर्मचारी उपस्थित होते. अस्तित्वात नसलेल्या बागेच्या देखभालीसाठी ८० कर्मचारी, १०९ खोल्यांच्या भक्तनिवासासाठी २०० कर्मचारी, १३ वाहनांसाठी १७६ कर्मचारी, प्रसादालयात ९७ कर्मचारी दाखवण्यात आले होते. इतर विभागांमध्येही असेच बनावट कर्मचारी दाखवण्यात आले आहेत. देवस्थानच्या देणगी व तेल विक्री काउंटर, पार्किंगसाठी कर्मचारी, गोशाळा, शेती, वृक्षसंवर्धन, स्वच्छता, पाणीपुरवठा, विद्युत आणि सुरक्षा विभागातही बोगस कर्मचा-यांची माहिती आढळली. बनावट ॲपच्या माध्यमातून लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाला असून सायबर पोलिसांकडून याचा स्वतंत्र तपास सुरू आहे. जे ट्रस्टी लोकसेवकांच्या व्याख्येत येतात, त्यांच्या संपत्तीची चौकशी केली जाईल असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# सर्वसामान्यांची घरे वगळल्याप्रकरणी अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती

**मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत अनेक नामांकित विकासकांनी सन २०१७ पासून २०२२ पर्यंत अनेक गृह प्रकल्प उभारू न सर्वसामान्यांना परवडणारी घरे प्रकल्पातून वगळल्या. या प्रकरणी अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केली जाईल, असे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. यासंदर्भात सदस्य विक्रांत पाटील, शशिकांत शिंदे, संजय खोडके, सचिन अहिर यांनी लक्षवेधी सूचना मांडली. उद्योग मंत्री सामंत म्हणाले की, एकसंध विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली झाल्यानंतरही यासंदर्भात उचित कार्यवाही न झाल्याने या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय समितीकडून चौकशी करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# राज्यातील प्रत्येक शेताला रस्त्यासाठी समग्र योजना आणणार

## उपायोजनांसाठी समितीची स्थापना

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रत्येक शेतक-याच्या शेताला रस्ता देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. शेतात जाण्यासाठी, शेतमालाची ने - आण करण्यासाठी शेतरस्त्यांच्या निर्मितीसाठी विविध योजनांच्या निधीचा समन्वय साधून समग्र योजना शासन आणणार आहे. ही योजना संपूर्ण राज्यातील शेतक-यांच्या शेत रस्त्यांची मागणी पूर्ण करणारी असेल, ही योजना समग्र असण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेचा उत्तरात केली. शेतरस्त्यांच्या बाबत सदस्य अभिमन्यू पवार यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेमध्ये सदस्य सर्वश्री विजय वडेट्टीवार, सुमित वानखेडे यांनीही उपप्रश्न विचारत सहभाग घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेत रस्त्यांच्या समग्र योजनांबाबत गठीत समिती एक महिन्याच्या आत शासनाला उपाययोजनांचा अहवाल सादर करेल. शेत रस्ते करताना कौशल्यावर आधारित काम असल्यास यासंबंधी असलेल्या योजनांच्या समन्वयातून करणे, तसेच अन्य योजनांचा निधी एकत्रित करीत शेतरस्ते पूर्ण करण्याबाबत पडताळणी करण्यात येईल. गावांमधील रस्त्यांसाठी असलेल्या २५- १५ योजनेतील ५० टक्के निधी शेत रस्त्यांच्या निर्मितीसाठी उपयोगात आणण्याबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.



या सूचनेच्या उत्तरात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शेत रस्त्यांच्या प्रकरणांमध्ये अपील उपविभागीय अधिका-यांपर्यंत संपवण्याची व्यवस्था निर्माण करण्यात येईल. वाटप पत्रात शेतक-यांचा समावेश करणे, शेतरस्त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी लोक अदालती घेणे, रस्त्यांचे सपाटीकरण करणे, चालू वहिवाट रस्त्यांचे सर्वेक्षण, गाव नकाशात हे रस्ते घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. यापुढे शेतरस्ता कमीत कमी १२ फूट रुंदीचा करण्यात येईल. जमाबंदी आयुक्त यांच्या माध्यमातून शेत रस्त्यांना क्रमांक देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

शेतरस्ते निर्मितीबाबत रोजगार हमी योजना, ग्रामविकास व महसूल विभाग यांच्याशी चर्चा करून स्वतंत्र लेखा शीर्ष निर्माण करण्याबाबत पडताळणी करण्यात येईल. कालबद्ध कार्यक्रम राबवून शेत रस्ते पूर्ण करण्यात येतील, असेही महसूल मंत्री श्री बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

## अधिवेशनातून

# गरिबांच्या हडप केलेल्या जागा त्यांना परत मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम

## ■ महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे ■

**मुंबई/प्रतिनिधी :** गरिबांच्या जागा धाकदपट करून, जबरदस्तीने किंवा आमिष दाखवून हडप केल्या जात असल्याच्या तक्रारी आहेत. संपूर्ण राज्यात अशा जागांची तपासणी करून गरिबांच्या हडप केलेल्या जमिनी त्यांना परत मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येईल, अशी घोषणा विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. या संदर्भात सदस्य असलम शेख यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य सर्वश्री योगेश सागर, अबू आझमी यांनीही सहभाग घेतला.

प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, कल्याण तालुक्यातील मौजे गोळवली येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वारसदार यशवंत भीमराव आंबेडकर यांच्या जागेवर अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याची तक्रार प्राप्त झाली. या जागेवर ७२ सदनिका, ८ व्यावसायिक गाळ्यांचे बांधकाम करण्यात आले. हे सर्व अनधिकृत बांधकामे तोडण्यात आली असून ही जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वारसांना देण्यात आली आहे. याबाबत तत्कालीन संबंधित अधिका-यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. या इमारतीमध्ये सदनिका व गाळे घेणा-या नागरिकांचा कुठलाही दोष नाही. त्यांना मोबदला देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये झोपड्या विकल्या जात असल्या प्रकरणी महसूल विभाग संबंधित यंत्रणेच्या सहकार्याने नियंत्रण ठेवील. अशा भूमाफीयांवर कारवाई करण्यासाठी शासन गंभीर आहे. त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. शासनाच्या जमिनीवर कुठेही अतिक्रमण न होण्यासाठी संबंधित यंत्रणेने त्या जागांचे संरक्षण करावे. शासकीय जमिनींवर अतिक्रमण न होण्यासाठी कायदा करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करण्यात येईल. नागपूर शहरातील शासकीय जमिनींवरील अतिक्रमणाबाबत नागपूर, जिल्हाधिकारी यांना सूचना देउन कारवाई करण्यात येईल, असेही महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

# उच्च न्यायालयाचा निर्णय प्राप्त होताच लिपिक-टंकलेखक पदाच्या परीक्षेचा निकाल जाहीर होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या लिपिक आणि टंकलेखक पदासाठी घेतलेल्या परीक्षेसंदर्भात दाखल झालेल्या याचिकेची सुनावणी मा. उच्च न्यायालयात ९ जुलै २०२५ रोजी घेण्यात आली आहे. मा. न्यायालयाने हा निकाल राखून ठेवला असून मा. उच्च न्यायालयाचा निर्णय प्राप्त होताच या परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर केला जाईल, असे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री .आशिष शेलार यांनी विधानसभेत सांगितले.

विधानसभा सदस्य हेमंत रासने यांनी या संदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली. या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात मंत्री शेलार यांनी ही माहिती दिली. या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत सदस्य रोहित पवार यांनीही सहभाग घेतला. स्पर्धा परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांचे करिअर व हित लक्षात घेउन महाराष्ट्र लोकसेवा आयोग भरती परीक्षेत चांगले काम करत असल्याचे सांगत मंत्री शेलार म्हणाले, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये मुलाखतीपर्यंत पात्र ठरलेल्या मात्र निवड न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'प्रतिभा सेतू' हा उपक्रम जाहीर केला आहे. हा उपक्रम सामान्य प्रशासन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्यावतीने राबविण्यात येणार आहे. राज्य शासनाने १५० दिवसांच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री सेवा कर्मी कार्यक्रम घोषित केला आहे. या कार्यक्रमानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेचे निकाल विना विलंब लावणे तसेच यातील अडचणी सोडवण्यात भर दिला जाणार आहे, मंत्री शेलार यांनी सांगितले.

# धर्मांतर करून आरक्षणाचा लाभ घेत असलेल्यांवर कारवाई

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आरक्षणाचा लाभ ज्या धर्मातील प्रवर्गात घेतला आहे, त्याच धर्मात असण्याबाबत निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे उल्लंघन करून धर्मांतर करीत आरक्षणाचा लाभ घेत असलेल्यांवर कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. जबरदस्तीने धर्मांतर करण्याच्या प्रकरणाबाबत सदस्य गोपीचंद पडळकर यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेत सदस्य जितेंद्र आव्हाड यांनीही सहभाग घेतला.

बळजबरीने किंवा आमिष दाखवून धर्मांतर करणे हा गुन्हा असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, जबरदस्तीने धर्मांतर अधिक कठोर कायदा करण्यात येईल. राज्याच्या पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली समितीचा अहवाल शासनास सादर झाला आहे. या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. आरक्षणाचा लाभ ज्या धर्मात असताना घेतला आहे, त्याच धर्मात राहण्याबाबतचा सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा आदर करून शासन याबाबत कार्यवाही करेल. काही प्रकरणांमध्ये आरक्षणाच्या लाभाचा गैरफायदा घेतला जात आहे. असे आढळून आले आहे. अशा प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाचा आदेश शासन पाळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले, सांगली जिल्ह्यातील सक्तीच्या धर्मांतर प्रकरणात संबंधित धर्मगुरू यांना अटकपूर्व जामीन मिळालेला आहे. याबाबत अपील दाखल करून गुन्हा विलंबाने दाखल केल्याबाबत संबंधित पोलीस अधिका-यांचीही चौकशी करण्यात येईल. पुणे जिल्ह्यातील धर्मांतरण प्रकरणांमध्ये विशेष चौकशी समितीचा अहवाल एक महिन्याच्या आत घेउन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

# राज्यातील अनधिकृत धार्मिक स्थळांवर वर्गवारीनुसार कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील अनधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम नियमित करणे, निष्कासित करणे किंवा स्थलांतरित करणे यासंदर्भात धोरण निश्चित केले आहे. नगरविकास विभागाने दिनांक ५ नोव्हेंबर २०१६ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार अनधिकृत धार्मिक स्थळांवर कार्यवाहीसाठी स्पष्ट मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. या सूचनांच्या अधीन राहून राज्यभरातील महानगरपालिकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत धार्मिक स्थळांवर वर्गवारीनुसार कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे सामाजिक न्याय, परिवहन, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. सदस्य मंदा म्हात्रे यांनी लक्षवेधी सूचना मांडली. यावेळी सदस्य आदित्य ठाकरे, संजय केळकर, मनीषा चौधरी यांनी चर्चेत सहभाग घेतला. नगरविकास राज्यमंत्री श्रीमती मिसाळ म्हणल्या, अनधिकृत धार्मिक स्थळांची वर्गवारी करण्यात आली आहे. सन २००९ पूर्वीची नियमित करण्यायोग्य स्थळे अ वर्गात, पूर्वी अथवा नंतरची निष्कासित करण्यायोग्य स्थळे ब वर्गात, तर पूर्वीची स्थलांतरित करण्यायोग्य स्थळे क वर्गात समाविष्ट केली जातात.

# वनतळी, वन बंधा-यांमधील गाळ काढणार-वनमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** वन्य प्राण्यांना वनातच मुबलक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी वनतळी, वन बंधारे यासह पाणी साठवण तलावातील गाळ काढला जाईल, असे वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत सांगितले. विधानसभा सदस्य श्रीमती सुलभा खोडके यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी ही माहिती दिली. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य आदित्य ठाकरे, किशोर पाटील यांनी सहभाग घेतला. वनमंत्री श्री. नाईक यांनी सांगितले की, मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वन्य प्राण्यांना त्यांच्या परिक्षेत्रात पाणी मिळावे यासाठी नैसर्गिक पाणवठे ५६१, कृत्रिम पाणवठे ४३२, सोलर पंप २९३, सिमेंट बंधारे २६९, दगडी बंधारे ८९५, मेळघाट बंधारे १२३६, नीकिट बंधारे १५, माती बंधारे ६७ आणि वनतळी १२० अशी व्यवस्था करण्यात आहे. वन्य प्राण्यांपासून शेतक-यांच्या पिकांचे नुकसान होउ नये यासाठी कुंपण घालण्यास यावर्षी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. वन परिक्षेत्रातील उपक्रमांबाबत संबधित लोकप्रतिनिधींसमवेत बैठक आयोजित केली जाईल. या बैठकीसाठी या क्षेत्रातील जागतिक स्तरावरील तज्ज्ञांनाही आमंत्रित केले जाईल.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## भ्रष्टाचाराचे पूल

गेल्या काही महिन्यांपासून देशामध्ये पूल कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे पुलांची सुरक्षितता हा विषय सध्या ऐरणीवर आला. एकतर पूल अनेक वर्षे जुने असल्याने जीर्ण झालेले असतात. त्यांचा वापर करण्याची कालमर्यादा संपुष्टात आल्यावरही वापर सुरूच असतो. त्यामुळे धोकादायक अवस्थेत वापर सुरू असणाऱ्या पुलांचा अंत हा अपघातांमध्ये ठरलेलाच असतो. या पुलावरून जाणे धोकादायक आहे, हे माहीत असतानाही जीव मुठीत घेऊन वाहनचालक आपली वाहने या पुलावरून हाकतात. दुसरीकडे जुनाट पुलांची दुर्घटना समजण्यासारखी असली तरी नव्याने बांधकाम सुरू असलेले पूल कोसळणे तसेच पूल बांधून काही वर्षे अथवा काही महिनेच झालेले असताना पूल कोसळणे या घटनाही घडल्या आहेत. नवीन पूल कोसळणे म्हणजे पुलाचे बांधकाम व्यवस्थित न होणे, यातच सर्व काही आले.पुलाच्या बांधकामामध्ये निकृष्ट दर्जाचा माल वापरणे याची परिणती त्या पुलाच्या दुर्घटनेत होते. भारतात विकासकामांमध्ये होत असलेला भ्रष्टाचार ही जगजाहीर बाब आहे. ग्रामपंचायत पातळीपासून केंद्रीय स्तरापर्यंत होत असलेल्या विकासकामांमध्ये ठेकेदार, प्रशासन, लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये होत असलेला आर्थिक मनोमिलाफ ही बाब आता लपून राहिलेली नाही. १९८५ साली राजीव गांधी हे देशाचे पंतप्रधान असताना त्यांनी भारतामध्ये होत असलेल्या विकासकामांमध्ये एक रुपयांपैकी केवळ १५ पैसे विकासकामांवर खर्च होत असून ८५ पैसे हे भ्रष्टाचारात जात असल्याचे जाहीरपणे सांगितले होते. पूल दुर्घटनेमध्ये अनेक वर्षे जुने, धोकादायक अवस्थेत झालेल्या पूल दुर्घटनेला पूर्णपणे त्या त्या भागातील प्रशासनच जबाबदार असते. पुलनिर्मितीला ठरावीक वर्षांचा कालावधी लोटल्यावर त्या पुलाचे पाडकाम करून त्या ठिकाणी नवीन पुलाची उभारणी करणे हे प्रशासनाचे कर्तव्य असते. जुनाट पुलांचा वापर म्हणजे अपघातांना निमंत्रण हे समीकरण ठरलेलेच असते. दोन्ही प्रकारातील पुलांच्या दुर्घटना झाल्यावर या अपघातांची शासन जबाबदारी स्वीकारते, हे आजतागायत कधीही पाहावयास मिळालेले नाही. केवळ राजकीय नेत्यांची घटनास्थळी गर्दी, पीडितांचे सांत्वन, स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांना दमदाटी, बदली अथवा निलंबनाचे ठरलेले सोपस्कर व मृतांच्या तसेच जखमींच्या परिवाराला आर्थिक मदत हा सर्व प्रकार ठरलेलाच असतो. त्यात कोणताही बदल पाहावयास मिळत नाही. पुलाचे अपघात कोठेही घडले तरी प्रकार हाच घडत असतो. गुजरातमधील पद्रा तालुक्यातील मही नदीवर पूल कोसळल्याने जवळपास १५ जणांचा मृत्यू झाला. पूल कोसळल्यानंतर नदीत पडल्याने काहीजण जखमी झाले. काहीजणांना वाचविण्यात स्थानिक रहिवाशांमुळे शक्य झाले. या पूल दुर्घटनेची दखल पंतप्रधान मोदी यांनी घेतली. हा पूल जवळपास ४५ वर्षे जुना असून या पुलाच्या दुरवस्थेबाबत, असुरक्षितपणाबाबत अभियांत्रिकी अहवालही अनेकदा प्रकाशित झाले होते. स्थानिक राजकीय नेत्यांनीही त्या प्रकरणी आवाजही उठविला होता. पण प्रशासनाने लक्ष दिले नाही. त्यामुळे स्थानिक प्रशासनाच्या निष्काळजीपणावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविकच आहे. कारण या घटनेला सर्वस्वी स्थानिक प्रशासनच जबाबदार आहे.१९८६ मध्ये बांधलेला हा पूल मुजपूर आणि गंभीर गावांना जोडणारा होता. गेल्या काही वर्षांपासून या पुलावर दृष्यमान झीज दिसत होती. रस्ते आणि इमारत (आर अँड बी) विभागाला पाठवलेल्या पत्रांच्या प्रती समोर आल्या आहेत, ज्यात पुलाच्या खराब अवस्थेबाबत स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. ऑगस्ट २०२२ मध्ये वडोदरा जिल्हा पंचायतीचे सदस्य हर्षदसिंह परमार यांनी एक पत्र लिहून सरकारला इशाराही दिला होता. संरचनात्मक मूल्यांकन अहवालात हा पूल 'वापरासाठी अयोग्य' ठरविण्यात आला होता. तरीही, कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. पूल कोसळेपर्यंत त्यावर वाहनांची ये-जा अनिर्बंधपणे सुरू होती. या घटनेने गुजरातमधील जुन्या पायाभूत सुविधांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. गंभीर पूल दुर्घटनेने राज्यभरातील जुन्या पुलांचे आणि इतर संरचनांचे ऑडिट करण्याची मागणी तीव्र झाली. महाराष्ट्रातील पुण्यामध्येही काही दिवसांपूर्वीच कुंडमाळा येथे इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला, ज्यात काही पर्यटक वाहून गेले. हा पूल काही दिवसांपूर्वीच वापरासाठी बंद करण्यात आला होता, पण तरीही लोक त्यावर फिरत होते. या दुर्घटनेत ६ जणांचा मृत्यू झाला, तर ३२ जण जखमी झाले होते. नऊ वर्षांपूर्वी महाराष्ट्रात झालेली महाड पूल दुर्घटना अजूनही लोकांच्या स्मरणात आहे. तब्बल तेरा दिवस या दुर्घटनेतील लोकांना शोधण्याचे शोधकार्य सुरूच होते. या अपघातात महाडजवळील सावित्री नदीच्या पात्रात दोन एसटी बस आणि एक तवेरा कारही वाहून गेली होती. १८ ते २० जणांचा महाड दुर्घटनेत मृत्यू झाला होता. दुर्घटना घडल्यावर काही काळ चर्चा होते. दुर्घटना कशामुळे घडली असेल, त्यावर विचारमंथन होते. काही वेळा समिती नेमली जाते. दुर्घटनेनंतर निर्माण झालेला जनप्रक्षोभ शमविण्यासाठी काही अधिकाऱ्यांवर खापर फोडताना त्यांची बदली व वेळ पडल्यास निलंबनही केले जाते. पुढे त्या समितीचा काय अहवाल आला, काय कारवाई झाली, हे कोणालाही माहिती पडत नाही. कारण त्यानंतर इतक्या घटना घडतात की, जुन्या घटनांचे लोकांना विस्मरण होत असते. पूल दुर्घटनेबाबत ठेकेदाराला अथवा प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई काय झाली? ठेकेदाराच्या कंपनीला काळ्या यादीत टाकले का, याचेही कोणाला स्वारस्य नसते. जुन्या पुलांवरील वाहतूक शक्य तितक्या लवकर बंद करून पाडकाम न झाल्यास अपघाताच्या घटनांना आळा बसणार नाही आणि अपघातामध्ये घडणाऱ्या अपघातातील मृत्यूचे तांडवही थांबणार नाही. नवीन पूल कोसळल्यावर सदोषपणा अथवा निकृष्ट बांधकाम उजेडात येते. पण जुनाट, जीर्ण झालेल्या पुलांवर तरी तोडगा काढणे आपणास शक्य आहे. त्यासाठी जनतेमध्ये जागृती असणे आवश्यक आहे. जनसामान्यातील जनजागृतीचा रेटा वाढला की, प्रशासनालाही माघार घ्यावी लागते, निर्णय घ्यावा लागतो. जुनाट पुलावरील वाहतूक थांबविण्याबाबत शीघ्र कृती होणे काळाची गरज आहे.

# महाराष्ट्राच्या राजकारणावर बिहारी रिमोट कंट्रोल?




**आजचा भाषिक वाद असो वा सुशांत सिंह राजपूत आत्महत्येवरून रान उठवणे असो, बिहार विधासनभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राला वेठीस धरले जाते, ते कसे?**

मतदारांनी आपल्या पारड्यात मत टाकावे म्हणून काय केलं पाहिजे, हे भाजप हे नीट ओळखून आहे. 'सबका साथ' वगैरे केवळ बोलण्याच्या गोष्टी; पण बहुसंख्य भारतीय मतदार थोडीशी भावनिक चिथावणी दिली तरी एकत्र येतात आणि प्रत्यक्षात फार विकास वगैरे काही न करताही निवडणूक खिशात टाकता येते हे भाजप जाणून आहे. तसे नसते तर पुलवामाचे शहीद, राम मंदिर, मुस्लीम मंगळसूत्र हिरावून घेतील वगैरे मुद्द्यांना निवडणुकांच्या तोंडावर हवा दिली गेली नसती. महाराष्ट्रात सध्या मराठी भाषक विरुद्ध हिंदी भाषक असे जे रान उठवले गेले आहे. तोही या रणनीतीचाच भाग नसेल, असे कोणीही खात्रीने म्हणू शकत नाही. तसे नसते तर बिहार विधानसभा निवडणुकीच्या मुहूर्तावर महाराष्ट्रात भाषा, धर्म, उत्तर भारतीय अस्मिता वगैरे मुद्दे उकरून काढले गेले नसते. सध्याचा भाषिक वाद हा २०२०चा 'देजा वू' (पुन:प्रत्यय) भासावा असाच! बिहार निवडणुका तोंडावर आल्या असताना या नजिकच्या इतिहासात डोकावल्यास अनेक घटनांमागचे संदर्भ स्पष्ट होऊ लागतात.

१४ जून २०२०चा दिवस. देशभरात कोविडमुळे टाळेबंदी लागू करण्यात आली होती. वृत्तवाहिन्यांचे पडदे साथीच्या बातम्यांनी व्यापले होते. अभिनेता सुशांत सिंहच्या आत्महत्येची बातमी आली आणि माध्यमांना नवा विषय मिळाला. अन्य अनेक मुद्द्यांप्रमाणे हा मुद्दाही अल्पावधीत विरला असता, पण सुशांतची हत्याच केली गेल्याचे सिद्ध करण्याचा विडा काहींनी उचलला. कंगना रानौत, नितेश राणे प्रभृती त्यात आघाडीवर होते. मुद्दा असा की, सुशांत सिंह हा मूळचा बिहारचा. बिहारमध्ये ऑक्टोबर २०२० पासून विधानसभेसाठी मतदान सुरू होणार होते आणि त्या निवडणुकीसाठी भाजपचे प्रभारी होते महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद पुन्हा एकदा भूषवण्याच्या प्रयत्नांत अपयशी ठरलेले देवेंद्र फडणवीस.

फडणवीस आणि अन्य भाजप नेत्यांनी सुशांत आत्महत्या प्रकरणावरून रान उठवले. महाविकास आघाडी सरकार योग्य पद्धतीने तपास करत नसल्याचे आरोप करण्यात आले. या प्रकरणी पाटण्यातही एक एफआयआर नोंदवण्यात आला होता आणि त्याआधारे तपास करण्यासाठी बिहार पोलीस मुंबईत आले. तिथून आलेल्या आयपीएस अधिकाऱ्याला मुंबई पोलिसांनी विलगीकरणात राहण्यास भाग पाडले. त्यावरूनही भाजपने मविआवर टीका केली. नितेश राणे यांनी मुंबई पोलिसांनी पुरावे नष्ट केल्याचा आणि बिहार पोलिसांच्या तपासात अडथळे आणल्याचाही आरोप केला होता. सुशांत सिंहच्या आत्महत्येच्या काही दिवस आधी त्याची सहकारी दिशा सालियननेही आत्महत्या केली होती. त्या प्रकरणात तत्कालीन पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्याविषयीही संशय व्यक्त केला गेला. या साऱ्यातून भाजपने आपण एका बिहारी अभिनेत्याच्या, त्याच्या कुटुंबाच्या आणि त्या अनुषंगाने त्याच्या चाहत्यांच्याही पाठीशी ठामपणे उभे असल्याची प्रतिमा निर्माण केली.

या प्रतिमेचा वापर भाजपने बिहार विधानसभा निवडणुकीत करून घेतला. 'न भूले है न भूलने देंगे' अशा ओळी लिहिलेली आणि सुशांत सिंहचे छायाचित्र असलेली पोस्टर्स लावली गेली. भाजपने नीतिश कुमार यांच्या जनता दल युनायटेडशी निवडणूकपूर्व युती केली होती. त्यामुळे मागासवर्गीयांच्या मतांची बेगमी झाल्यात जमा होती. सुशांत सिंह हा ब्राह्मण होता आणि त्याच्या आत्महत्येचा मुद्दा हाताशी धरून भाजपने बिहारमधील ब्राह्मणांच्या पाच टक्के मतांपैकी बहुतांश मते आपल्याच पारड्यात पडावीत, यासाठी तरतूद केली.

सुशांत आणि दिशाच्या आत्महत्या प्रकरणांचे निकाल अलीकडेच लागले. त्यात ज्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यात आले होते ते रिया चक्रवर्ती आणि आदित्य ठाकरे दोघेही निर्दोष असल्याचे सिद्ध झाले. हे आता सवयीचंच झाले आहे. प्रचंड वादविवाद निर्माण करत, वाहिन्यांचे पडदे २४ तास गाजवत एखाद्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे, वर्षानुवर्षे तुरुंगात खितपत ठेवणे किंवा न्यायालयाच्या पायऱ्या झिजवण्यास भाग पाडणे, चारित्र्यहनन करणे, उदरनिर्वाहाची साधने हिरावून घेणे आणि नंतर आरोपी पुराव्यांअभावी किंवा निर्दोषत्व सिद्ध होऊन मुक्त होणे हा पायंडाच गेल्या १०-११ वर्षांत पडला आहे. यात भाजप आपला कार्यभाग मात्र साधून घेतो.

२०२० हा अपवाद किंवा योगायोग म्हणूया पण अशाच स्वरूपाच्या घटना २०१५मध्येही घडल्याचे दिसते. त्या वर्षी महाराष्ट्रात गोवंश हत्याबंदी कायदा लागू करण्यात आला. त्यावेळी केंद्रात आणि महाराष्ट्रात दोन्हीकडे भाजपचे सरकार होते. खरंतर महाराष्ट्र विधानसभेने गोवंश हत्याबंदीसंदर्भातले विधेयक १९९५सालीच संमत केले होते. पण त्याला राष्ट्रपतींची मंजुरी तब्बल २० वर्षांनी मिळाली. योगायोग असा की त्या वर्षीही बिहारमध्ये विधानसभा निवडणुका होऊ घातल्या होत्या. मार्च २०१५ ला महाराष्ट्रात हे विधेयक संमत केले गेले. बिहारमध्ये ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या सुमारास निवडणुका होणार होत्या. तिथल्या प्रचारातही भाजपने गोवंश हत्येचा मुद्दा लावून धरला. नितीश कुमारप्रणित महागठबंधनला असलेल्या अल्पसंख्य आणि आर्थिक दुर्बळांच्या पाठिंब्यासमोर हिंदू उच्चवर्णीयांची मोट बांधण्याचा हा डाव होता. मात्र २०२४ मधल्या '४०० पार'च्या नाऱ्याप्रमाणे ही रणनीती फसली. भाजप आपल्या अन्नावरही बंदी आणू पाहात असल्याची जाणीव झालेला मुस्लीम आणि मागासवर्गीय मतदार एकवटला आणि भाजपला धूळ चारली. या साऱ्याशी महाराष्ट्राचा थेट संबंध नसला, तरीही 'हिंदूहिताची धुरा वाहणारा, गोवंश हत्येवर बंदीचा पुरस्कर्ता पक्ष' ही महाराष्ट्रातली प्रतिमा इथे राहणाऱ्या बिहारींवर आणि त्याअनुशंगाने बिहार निवडणुकांवरही प्रभाव टाकेल, अशी अपेक्षा बाळगली गेली नसेलच कशावरून?

आताही बिहार निवडणुकांचे पडघम वाजू लागले असताना महाराष्ट्रात पहिलीपासून त्रिभाषा सूत्र लागू करण्याच्या मिषाने हिंदीभाषक विरुद्ध मराठी भाषक वाद उकरून काढला गेला. भाजपचे झारखंडमधले वाचाळवीर खासदार निशिकांत दुबे यांनी त्यात उडी घेत बेधडकपणे 'पटक पटक के मारेंगे,' अशी धमकी देणं, मराठी माणसाची संभावना 'हमारे पैसों पे पलने वाले,' अशा शब्दांत करणे, आणि मराठी भाषक राज्य असलेल्या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी 'त्यांचा उद्देश तसा नव्हता,' छापाचे स्पष्टीकरण देणे यात काहीच आश्चर्यजनक नाही. जी व्यक्ती या देशात धार्मिक युद्ध भडकविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाला जबाबदार धरणारे वक्तव्य करू शकते, त्या व्यक्तीच्या वाचाळपणाला काय सीमा असणार?

आपण उच्चारत असलेल्या शब्दांचा वस्तुस्थितीशी काहीएक संबंध असलाच पाहिजे, अशी निकड भाजपतील अनेक नेत्यांना वाटत नाही. भावना भडकल्या, कार्यभाग साधला, निवडणुका जिंकल्या म्हणजे झाले, अशीच धारणा दिसते. तसे नसते, तर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मंगळसूत्र, मुस्लिम, म्हैस वगैरे अवतरले नसते. दुबेंना आणि त्यांच्या पक्षाला यातून काय साधायचे आहे, हेही अतिशय स्पष्ट आहे. भाजपच्या विजयरथाला अद्याप स्वबळावर पादाक्रांत करता न आलेल्या बिहारमध्ये यावेळी कमळ फुलवायचंच, मग शेंडी तुटो वा पारंबी तुटो या निश्चयाने भाजप सर्व स्वायत्त म्हटल्या जाणाऱ्या यंत्रणांसह मैदानात उतरला आहे. बिहारच्या निवडणुकीला अवघे चार महिने शिल्लक आहेत अशा वेळी सामान्यपणे मतदार नोंदणीच्या मोहिमा हाती घेतल्या जातात. इथे मात्र निवडणूक आयोगाने १३ कोटी लोकसंख्या (त्या राज्यात २०२३ साली झालेल्या जातिनिहाय जनगणनेनुसार) असलेल्या या राज्यात मतदार याद्यांच्या सर्वंकष फेरतपासणीचा घाट घातला आहे. तो कशासाठी, कोणाच्या हितासाठी, तिथेच का, यावेळीच का, या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळालेली नाहीत.

तर अशा या राज्यातील अनेक मतदार महाराष्ट्रात नोकरी-धंदे-व्यवसायांसाठी स्थलांतरित आहेत. संविधानाने त्यांना तो हक्क दिला आहे आणि तो नाकारणे हा गुन्हाच. पण या भाषिक वादात हिंदी भाषकांच्या बाजूने उभे राहून त्यांची मते लाटणे शक्य आहे, हे भाजपसारख्या 'अतिचाणाक्ष' पक्षाच्या लक्षात न येते, तरच नवल. त्यामुळेच आगीत तेल ओतण्याची जबाबदारी या वाचाळ खासदाराला देण्यात आली असावी असे दिसते. वरील घटनाक्रम आणि महाराष्ट्रात राहणाऱ्या बिहारींचे प्रमाण लक्षात घेता तिथे लाभ मिळावा म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणावर बिहारी रिमोट कंट्रोलने नियंत्रण ठेवले जात आहे का, अशी शंका घेण्यास पुरेसा वाव आहे.

**विजया जांगळे**

# बिहारमध्ये काँग्रेसचे काय चुकले ?

बिहारमध्ये लवकरच विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांत राष्ट्रीय जनता दल प्रणित महाआघाडी आणि भाजपा प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी यांच्यात सरळ सामना होणार आहे. महाआघाडीची जागा वाटपासंबंधीची बोलणी सुरू झाली आहेत.महाआघाडीत राजद, काँग्रेस,विकासशील इन्सान पार्टी, लोक जनशक्ती पार्टी (पशुपती पारसनाथ) कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी-लेनिनवादी) सीपीआय,सीपीएम आणि झारखंड मुक्ती मोर्चा या पक्षांचा समावेश असणार आहे.

२०२० मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत राजदने १४० पेक्षा जास्त जागा लढवून ७५ जागांवर विजय मिळविला होता. काँग्रेसने ७० जागा लढवल्या मात्र त्यांना केवळ १९ जागाच जिंकता आल्या. कम्युनिष्ट पार्टी (मा.ले.)ने १९ जागा लढवल्या आणि त्यापैकी १२ जागांवर विजय मिळविला.महाआघाडीत कम्युनिस्ट पार्टी (मा.ले.) चा स्ट्राईक रेट सर्वात चांगला होता.विकासशील इन्सान? पार्टी गेल्या खेपेस रालोआ बरोबर होती. त्यांनी गेल्या खेपेच्या निवडणुकीत चार जागा जिंकल्या होत्या.

महाआघाडी मधील जागा वाटपात राजद आणि काँग्रेस यांच्यामध्ये मोठी चुरस असणार आहे. महाआघाडीत काही नवीन पक्ष सामील झाल्याने या खेपेच्या विधानसभा निवडणुकीत राजद आणि काँग्रेस यांच्या वाट्याला गेल्या खेपेपेक्षा कमी जागा येऊ शकतील.अर्थात जागा वाटपात सर्वात जास्त फटका काँग्रेसला बसण्याची शक्यता आहे. गेल्या खेपेस काँग्रेसला ७० जागा सोडण्यात आल्या होत्या,मात्र त्यांपैकी केवळ १९ जागाच काँग्रेसला जिंकता आल्याने काँग्रेसला मोठ्या प्रमाणात टीका सहन करावी लागली होती. काँग्रेसला क्षमतेपेक्षा जास्त जागा सोडण्यात आल्याचा फटका महाआघाडीला विधानसभा निवडणुकीत बसला होता.काँग्रेसला कमी जागा सोडल्या असत्या तर,त्या जागा राजदला लढवता आल्या असत्या आणि राजदचा स्ट्राईक रेट पाहता राजदला त्या जागांवर यश मिळाले असते,असे बोलले जात होते.गेल्या खेपेस महाआघाडीचा विजय थोडक्यात हुकला होता,त्याला काँग्रेसच कारणीभूत असल्याची चर्चा होती.

या पार्श्वभूमीवर या खेपेच्या बिहार विधानसभा



निवडणुकीत काँग्रेसच्या वाट्याला गेल्या खेपेच्या तुलनेत कमी जागा येण्याची दाट शक्यता आहे.काँग्रेसच्या वाट्याला या खेपेस ४० ते ४५ जागा येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. खरे पाहता काँग्रेसची बिहार मध्ये तेवढीच क्षमता आहे.काँग्रेसच्या या अवमूल्यनाला काँग्रेसच मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे.बिहारमध्ये १९८९ नंतर काँग्रेसची जी घसरगुंडी सुरू झाली ती अद्याप थांबलेली नाही.

जगन्नाथ मिश्रा हे काँग्रेसचे बिहार मधील शेवटचे मुख्यमंत्री ठरले.१९८९ नंतर गेल्या ३६ वर्षांत काँग्रेस एकट्याच्या बळावर बिहारमध्ये सत्तेच्या आसपासही फिरकलेली नाही.त्यासुमारास मंडल आयोगाच्या शिफारशी केंद्र सरकारने स्वीकारल्यानंतर, बिहार मधील राजकारण पुर्णपणे बदलून गेले. जातीवरती आधारीत राजकारण सुरू झाले आणि त्याचा मोठा फटका काँग्रेसला बसला.काँग्रेसचा पारंपरिक मतदार, काँग्रेसची साथ सोडून प्रादेशिक पक्षांकडे वळला. लालू प्रसाद यादव, नितीशकुमार, रामविलास पासवान या नेत्यांनी आपले पक्ष स्थापन केले आणि ते ज्या जातीतून आले होते,त्या जातीचा त्यांनी भक्कम पाठिंबा मिळवला.

यादव समाज मोठ्या प्रमाणात लालूप्रसाद यादव यांच्या पाठीमागे उभा राहिला. कुर्मी समाज नितीशकुमार यांच्या पाठीमागे उभा राहिला.पासवान समाज, राम विलास पासवान यांच्या पाठीमागे उभा राहिला. मुस्लिम समाज लालूप्रसाद यादव यांच्या बरोबर गेला. पुढारलेल्या जातींनी काँग्रेसची साथ सोडून भाजपाला जवळ केले. अशाप्रकारे काँग्रेसचा हक्काचा मतदार मोठ्या प्रमाणात काँग्रेसची साथ सोडून गेल्याने काँग्रेसची बिहार मध्ये मोठीच पिछेहाट झाली. त्यात पुन्हा काँग्रेसने लालूप्रसाद यादव यांच्याशी जवळीक साधल्याने काँग्रेसचे बिहार मध्ये अतोनात नुकसान झाले. लालूप्रसाद यांच्या पक्षाशी आघाडी करुन निवडणुका लढताना काँग्रेसला सदैव दुय्यम स्थान पत्करावे लागले. लालूप्रसाद यादव, निवडणुकीत जेवढ्या जागा सोडतील तेवढ्या जागांवर समाधान मानण्याची पाळी काँग्रेसवर आली. गेली काही वर्षे बिहारमध्ये काँग्रेसने मोजक्याच जागा लढवल्याने पक्षाला बिहारमध्ये दूरवर हातपाय पसरता आलेले नाहीत.

काँग्रेसची ही परिस्थिती फक्त बिहार पुरती मर्यादित नाही. असे म्हटले जाते की भाजपा प्रादेशिक पक्षांच्या सहाय्याने, एखाद्या राज्यात सत्तेपर्यंत पोहोचते आणि नंतर हळूहळू त्या प्रादेशिक पक्षांना संपवून टाकते. मात्र काँग्रेसच्या बाबतीत नेमकी उलटी परिस्थिती आहे.

काही राज्यांत प्रादेशिक पक्षांनी काँग्रेसला कमकुवत केल्याची उदाहरणे आहेत. बिहारमध्ये राजदच्या संगतीमुळे काँग्रेसची पिछेहाट झाली. तामिळनाडूत भक्तवत्सलम हे काँग्रेसचे शेवटचे मुख्यमंत्री ठरले. १९६७ साली द्रमुकने काँग्रेसचा पराभव करुन सत्ता काबीज केली त्यानंतर गेल्या ५८ वर्षांत तामिळनाडूमध्ये काँग्रेस सत्तेच्या आसपासही फिरकलेली नाही. गेली अनेक वर्षे तामिळनाडूमध्ये काँग्रेस कधी द्रमुक बरोबर तर कधी अण्णा द्रमुक बरोबर युती करून निवडणुका लढवत आहे. अशा परिस्थितीत वरील प्रादेशिक पक्ष काँग्रेसला जेवढ्या जागा सोडतील तेवढ्या जागांवरच काँग्रेस लढत असल्याने काँग्रेसने स्वतःच तामिळनाडूमध्ये आपल्या पक्ष विस्ताराचे दरवाजे बंद करून टाकले आहेत. उत्तर प्रदेशमध्ये नारायणदत्त तिवारी हे काँग्रेसचे शेवटचे मुख्यमंत्री ठरले. १९८९ मध्ये समाजवादी पक्षाने काँग्रेसचा पराभव करुन उत्तरप्रदेशची सत्ता काबीज केली. त्यानंतर काँग्रेसची उत्तरप्रदेशात जी घसरगुंडी सुरू झाली ती अद्याप थांबलेली नाही.१९८९ नंतर उत्तरप्रदेशातील राजकारण हे प्रामुख्याने सपा, बसपा आणि भाजपा या पक्षांभोवती फिरत राहिले आणि काँग्रेस उत्तरप्रदेशात कुणाच्या खिजगणतीतही राहिली नाही.

बिहारमध्ये लवकरच होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला दुय्यम स्थानच स्विकारावे लागणार आहे. गेल्या खेपेस काँग्रेसला महाआघाडीत क्षमतेपेक्षा जास्त जागा सोडण्यात आल्या होत्या. परंतु काँग्रेसची कामगिरी अपेक्षेनुसार न झाल्याने काँग्रेसकडे आता बार्गेनींग पॉवर शिल्लक राहिलेली नाही. अशा परिस्थितीत महाआघाडीचे नेते तेजस्वी यादव हे काँग्रेसला जेवढ्या जागा सोडतील तेवढ्या जागा काँग्रेसला स्विकाराव्याच लागतील कारण काँग्रेसकडे दुसरा पर्यायच शिल्लक नाही.

**अभय गोखले**

## अमेरिकेतील इस्कॉनच्या मंदिरावर हल्ला

संपूर्ण जगभरात इस्कॉनची मंदिरे आहेत. अमेरिकेत ती अधिक आहेत. स्पॅनिश फोर्क युटा येथील इस्कॉनच्या श्री राधाकृष्ण मंदिरावर नुकताच गोळीबार करण्यात आला. साधारण २० ते ३० गोळ्या झाडण्यात आल्या. हा गोळीबार रात्रीच्या वेळी झाला तेव्हा मंदिरात २५ ते ३० भाविक होते. या गोळीबारात कुठलीही जीवित हा... ली नसल्याचे इस्कॉन ने एक्स वर पोस्ट करत ... म्हटले आहे. परंतु यामुळे मंदिराच्या कमानी ... सह हजारो डॉलर्सची हानी मात्र झाली. गेल्या ... काही वर्षात अमेरिकेत मंदिरांवर वारंवार हल्ले ... आहेत. मंदिराची तोडफोड करणे, मंदिरांच्या भिंतीवर आक्षेपार्ह्य घोषणा लिहिणे इतपतच हे मर्यादित होते. परंतु आता मात्र मंदिरांवर गोळीबार करण्यापर्यंत मजल गेली. बांगलादेश,पाकिस्तानात मंदिरावरील हल्ले नवीन नाहीत. परंतु श्रीमंत,विकसित देशातही असे विकृत मनोवृत्तीचे लोक असतात याचे आश्चर्य वाटते. खरं तर भारताने या घटनेवरून अमेरिकेवर मंदिराच्या सुरक्षेसाठी दबाव आणणे आवश्यक आहे. पुन्हा अशी घटना घडल्यास त्यास अमेरिका जबाबदार असेल. तरच हे हल्ले थांबतील. अन्यथा म्हातारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावतो म्हणतात ते असे .

**माधवी पत्की, नागपूर**

## 'महाराष्ट्र राज्य महोत्सव' घोषणा स्वागतार्ह

मुंबईसह महाराष्ट्राची जगात ओळख असलेला मराठी जणांचा लाडका गणेशोत्सव यापुढे 'महाराष्ट्र राज्य महोत्सव' म्हणून अधिकृतपणे साजरा करण्यात येणार असल्याची सरकारची घोषणा स्वागतार्ह असून मन सुखावणारी आहे. या उत्सवासाठी सरकारकडून आवश्यक तेवढा निधी खर्च करण्यात येणार आहे. पारतंत्र्याच्या काळात लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी, लोकांच्या मनात स्वातंत्र्याचे स्फुलिंग चेतविण्यासाठी लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला सार्वजनिक उत्सवाचे स्वरूप दिले त्याला आता १३२ वर्षांचा दीर्घ काळ उलटून गेला आहे. मात्र काळाच्या ओघात गणेशोत्सवाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलत चालले आहे.

**-प्रदीप मोरे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## वेचक

### तुकडेबंदीचा निर्णय दिलासादायक

पिंपरी : तुकडेबंदी कायदा रद्द करण्याचा ... लाखो शेतकऱ्यांच्या अडचणी ... असे ते म्हणाले. ... अशी भावना ही त्यांनी व्यक्त केली.

### विद्यार्थ्यांना इस्रो, नासा भेटीची संधी

पुणे : विद्यार्थ्यांना 'इस्रो' आणि 'नासा' ...

### काँक्रिटीकरणाच्या कामाचा वेग वाढवा

पिंपरी : ...

### बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

मंचर (प्रतिनिधी) : ...

# पिंपरीतील २६ अभियंत्यांना नोटीस

## तीन दिवसांमध्ये लेखी खुलासा; अन्यथा कारवाईचा बडगा

◆ पिंपरी (प्रतिनिधी) :

महामेट्रोला पत्र

# बारामतीत डॉक्टरांचा बंद



◆ बारामती (प्रतिनिधी) :

# माजी उपमहापौर डब्बू आसवानी यांनी वाचला तक्रारींचा पाढा

◆ पिंपरी (प्रतिनिधी) :

## ओतूर बसस्थानकाला डबक्याचे स्वरूप

◆ जुन्नर (प्रतिनिधी) :

# शहर स्वच्छतेसाठी रात्रीचा दिवस

◆ पुणे (प्रतिनिधी) :



– संदीप कदम, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग

# भूमी अभिलेखकडून प्रमाणपत्राची मागणी

◆ कात्रज (प्रतिनिधी) :



– अरविंद शिंदे, नागरिक

– गणेश ढगे, रहिवासी

# महाराष्ट्र साहित्य परिषदेचा विलंब माफी अर्ज मंजूर

◆ पुणे (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र साहित्य परिषद

– सुनीताराजे पवार, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद

## जिल्हा पर्यटनासाठी लवकरच ॲप

◆ पुणे (प्रतिनिधी) :

# ऑनलाइन मालमत्ता कर भरा; ४ टक्के सवलत मिळवा

◆ पिंपरी (प्रतिनिधी) :

| आर्थिक वर्ष | कर भरणाऱ्यांची संख्या |
|---|---|
| २०२०-२१ | ८८ हजार ९० |
| २०२१-२२ | १ लाख ११ हजार १ |
| २०२२-२३ | १ लाख २८ हजार १५ |
| २०२३-२४ | २ लाख ९ हजार ६२५ |
| २०२४-२५ | २ लाख ६० हजार ७५७ |
| २०२५-२६ | ३ लाख ३७ हजार |



– प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

– अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

## वर्षातून एकदाच उघडते श्री त्रिशुंड गणपती मंदिराचे तळघर

# श्री त्रिशुंड गणपती मंदिराचे तळघर खुले

◆ पुणे (प्रतिनिधी) :





## संक्षिप्त



### प्लास्टिक जप्ती मोहीम

**अमरावती-** झोन क्र.२, राजापेठ अंतर्गत सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर यांच्या उपस्थितीत कॉटन मार्केट, चौधरी चौक परिसरात प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली. मोहिमेदरम्यान, परिसरातील फुलविक्रेत्यांकडून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जप्त करण्यात आले असून, संबंधित विक्रेत्यांना सक्त ताकीद देण्यात आली. तसेच, हातगाडी धारकांना डस्टबिन ठेवणे आवश्यक असल्याचे निर्देश व नोटिसा देण्यात आल्या.स्वच्छ भारत अभियानांतर्गत ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली असून, नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला.सदर मोहिमेत नोडल अधिकारी विकी जेधे, जेष्ठ स्वच्छता निरीक्षक विजय बुरे, राजु डिक्याव, स्वच्छता निरीक्षक यांची सक्रिय उपस्थिती होती.महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात येते की, प्लास्टिकचा वापर टाळावा व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखावी.

### राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी ऑनलाइन अर्ज

**अमरावती-** राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ साठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून, जिल्ह्यातील शिक्षकांनी या पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शिक्षण मंत्रालयाच्या https://nationalawardstoteachers.education.co या वेबपोर्टलवर १३ जुलै २०२५ पर्यंत स्व-नामांकन करता येणार आहे. ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १५ जुलै २०२५ पर्यंत आहे. जिल्हा परिषद, राष्ट्रीय पुरस्कार २०२५ च्या सुधारित अंमलबजावणी व वेळापत्रकानुसार ही प्रक्रिया राबवली जात असून, शिक्षकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रिया देशमुख यांनी केले आहे.जिल्हा आणि प्रादेशिक निवड समित्यांकडून शिक्षकांची निवड प्रक्रिया १६ जुलै ते २५ जुलै २०२५ या कालावधीत पूर्ण केली जाईल आणि निवडलेली यादी ऑनलाइन पोर्टलद्वारे राज्य निवड समितीकडे पाठवली जाईल. राज्य निवड समितीकडून ही यादी २६ जुलै ते ४ ऑगस्ट २०२५ पर्यंत राष्ट्रीय ज्युरीकडे पाठवली जाईल.

### 'ई-आर १' ऑनलाइन सादर करण्याचे आवाहन

अमरावती-जिल्ह्यातील सर्व खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांना आता रोजगार विषयक सेवा ऑनलाइन उपलब्ध झाल्या असून, 'ई-आर १' (ER-1) प्रपत्र ऑनलाइन सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.' ई-आर १' सादर करण्याची अंतिम मुदत ३० जुलै २०२५ आहे. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाने सुरू केलेल्या या ऑनलाइन सुविधांसाठी www.rojgar.mahaswayam.gov.in हे संकेतस्थळ विकसित केले आहे. उद्योजक आस्थापनांनी सेवायोजन कार्यालय (रिक्त पदे अधिसूचित करण्याची सक्ती) कायदा १९५९ व नियमावलीनुसार, त्रैमासिक 'ई-आर१' ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे.ऑनलाइन अर्ज करताना कोणतीही अडचण आल्यास, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती या कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा ०७२१-२५६६०६६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. 'ई-आर १' ऑनलाइन सादर न करणाऱ्या कसुरदार आस्थापनांवर विहित नियमानुसार कार्यवाही केली जाईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी कळवले आहे.

### रूग्णांकरीता मोफत उपचार

**अमरावती-** श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे गुरूपोर्णिमेचे औचित्य साधून रूग्णांचे सेवेसाठी एनएसवाय योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत भरती होणा-या रूग्णांना विशिष्ठ वैद्यकीय सेवा निःशुल्क उपलब्ध करून देण्यात येतील. सदर योजना दिनांक १० जुलै ते ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत सुरू राहील. या दरम्यान भरती होणा-या रूग्णांच्या महत्वाच्या चाचण्या, शस्त्रक्रिया व भरतीचे शुल्कासह बेड शुल्क मोफत ठेवण्यात आलेले आहेत. तसेच सुपरस्पेशालिस्ट वर्गात मोडणा-या शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत मोफत राहतील. तरी या संधीचा जास्तीत जास्त गरजू रूग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन श्री शिवाजी शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख, संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.अनिल देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ.पवन टेकाडे व प्रशासकीय अधिकारी डॉ.स्वप्नील मोहोड यांनी केले आहे.

### राज्यस्तरीय सभा शिर्डीत

**अमरावती-** येणाऱ्या १३ जुलै २०२५ रविवार रोजी सप्तपदी मंगल कार्यालय साईनगरी शिर्डी येथे सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना मुंबई -३२ची राज्यस्तरीय सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. या महत्वपूर्ण सभेस राज्यातील सर्व दिव्यांग कर्मचारी व अधिकाऱ्यांनी मतभेद विसरून मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे प्रमुख पदाधिकारी दिगंबर घाडगे पाटील, परमेश्वर बाबर साहेब, रवींद्र पाटील आणि साईनाथ पवार यांनी केले आहे.दिव्यांग कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी हा महत्वपूर्ण टप्पा असून, शिर्डी येथील सर्वसाधारण सभेला उपस्थित राहून संघटनेच्या संघर्षात सहभागी होण्याचे आवाहन दिगंबर घाडगे पाटील, परमेश्वर बाबर साहेब ,रवींद्र पाटील , साईनाथ पवार यांनी केले आहे. अशा प्रकारची माहिती अमरावती जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित व जिल्हा सचिव किशोर मालोकार यांनी दिली आहे.

# राष्ट्र आणि धर्माच्या कार्यासाठी झोकून द्या

## अतुल अरवेन्ला : हिंदू जनजागृती समितीचा गुरुपौर्णिमा महोत्सव





**अमरावती/का.प्र.**

धर्म, राष्ट्र आणि न्याय यांच्या रक्षणासाठी प्रत्येकाने स्वतःला झोकून देणे, हेच खरे गुरुपूजन ठरेल. प्राचीन काळापासून प्रत्येक वेळी धर्माच्या बाजूने उभे असणाऱ्यांपेक्षा अधर्मी आणि अन्याय करणाऱ्यांची संख्या आणि शस्त्रबळ अधिक होते; पण अंतिम विजय हा धर्माचाच झाला आहे; कारण भगवंत आणि गुरुतत्त्वाचा आशीर्वाद धर्माच्या रक्षणासाठी कार्यरत असणाऱ्यांवरच असतो. आजही गुरुतत्त्व सनातन धर्माच्या रक्षणासाठी आणि भारताच्या उत्कर्षासाठी कार्यरत आहे. त्यामुळे प्रत्येकाने राष्ट्र आणि धर्माच्या कार्यासाठी झोकून देणे आवश्यक आहे, असे आवाहन हिंदू जनजागृती समितीचे नागपूर जिल्हा संघटक अतुल अरवेन्ला यांनी केले. ते ' राष्ट्र आणि धर्म यांच्या रक्षणासाठी साधना आणि युद्धकाळातील कर्तव्ये' या विषयावर अंबा मंगलम, बडनेरा रोड सातुर्णा संपन्न झालेल्या गुरुपौर्णिमा महोत्सवाच्या प्रसंगी मार्गदर्शन करत होते. प्रारंभ श्री व्यासपूजन आणि प.पू. भक्तराज महाराज यांच्या प्रतिमापूजनाने झाला. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या संदेशाचे वाचन सनातन संस्थेच्या विभा चौधरी यांनी केले. ' सनातन राष्ट्र शंखनाद' या विषयावर प्रेरणादायी व्हिडिओ प्रक्षेपण करण्यात आले. ऑल महाराष्ट्र थांग-ता असोसिएशन चे राज्य सचिव महावीर धुळधर यांचा सत्कार श्री. गिरीश जामोदे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी,'राष्ट्र आणि धर्म' याविषयावर मार्गदर्शन करतांना श्री. महावीर धूळधर हे म्हणाले, 'हिंदुराष्ट्र ची स्थापना व्हावी, यासाठीची ऊर्जा सर्वप्रथम सनातन संस्थेद्वारे निर्माण झाली आणि ती आता संपूर्ण जगात पोहचली आहे.

सनातन संस्थेचे परात्पर गुरुदेव डॉ.जयंत आठवले यांच्या संकल्पानुसार हिंदू राष्ट्र येणारच आहे त्यासाठी प्रत्येकाने शास्त्रासह शस्त्र शिकणे गरजेचे आहे. उपस्थित महिलांना त्यांनी स्त्रियांनी स्वतःमधील दुर्गा, चंडिका जागृत करा व दृश्यांचे निर्दालन करा! असे आवाहन केले याप्रसंगी केले.यावेळी अनेक धर्म व राष्ट्रप्रेमी उपस्थित होते.यावेळी डॉ. सुरेश चिकटे, अनिता तिखिले, अनुप जयस्वाल, अॅड.सतीश पाटील, अॅड. राजेन्द्र पांडे आदीसह ३५०पदाधिकारी उपस्थीत होते.

## संध्या रायबोले यांचा सेवानिवृत्ती समारंभ



**बेलोरा-वार्ताहर**

विस्तार अधिकारी संध्या रायबोले यांचा सेवानिवृत्तीचा सहकुटुंब सत्कार समारोहाचा कार्यक्रम जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चिंचोली काळे येथे आयोजित केला होता. यावेळी चिंचोली येथील सरपंच यांनी त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. यामध्ये चिंचोली शाळेचे श्री.वसुले, श्री.लेंडे, श्री.ठाकूर, श्री.पखाले यांचे विशेष योगदान लाभले. त्यासोबतच केंद्रातील श्रीमती कडू, श्रीमती देशमुख, श्री.बागडे, श्री.चिमणकर, श्री.सोयल, श्री. भाकरे, श्री.पांडे, श्री.चव्हाण यांनीही यामध्ये विशेष सहभाग घेत पुढे आम्ही अशीच कार्य चालू ठेवू अशी ग्वाही देत त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याचे वचन दिले. त्यांनी आपली ही धुरा यशस्वीरिते सांभाळून आमच्या केंद्राला लाभलेल्या उत्तम केंद्रप्रमुख श्रीमती धंदर यांच्याकडे आपला कारभार सोपवीत बेलोरा केंद्राला माझे सदैव योगदान राहील असे शब्द देत सर्व केंद्राचे कौतुक केले.

प्रास्ताविक केंद्राच्या केंद्रप्रमुख श्रीमती धंदर यांनी केले तसेच श्री.चिमणकर, कुमारी साबळे यांनी आपले विचार व्यक्त करीत त्यांच्या यशस्वी शैक्षणिक कार्याचा यथोचित सत्कार केला. सोबतच शिक्षक हा उत्तम शेतकरी सुद्धा असू शकतो याचे ज्वलंत उदाहरण देणाऱ्या आमच्या श्री. लेंडे यांचा सत्कार श्रीमती रायबोले यांनी केला. असेच अगदी प्रेमाने आणि हक्काने काम करून घेणारे अधिकारी आम्हाला मिळावेत अशी आशा व्यक्त केली.

## लॉयन्स क्लब अध्यक्षपदी जितेंद्र चौधरी तर सचिव मोहन राऊत



### गोव्यात पार पडला शपथग्रहण सोहळा

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, क्रीडा, आरोग्य सह विविध क्षेत्रात नेहमी योगदान देणाऱ्या लॉयन्स क्लब (एलिट) च्या अध्यक्षपदी जितेंद्र चौधरी तर सचिव मोहन राऊत खजिनदार विशाल खडसे यांची निवड करण्यात आली हा शपथग्रहण सोहळा गोव्यात पार पडला.

लॉयन्स क्लब (एलिट) च्या वतीने दरवर्षी नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात येते गोव्याचे लॉयन्स क्लबचे प्रांतपाल वासुदेव वलवलकर यांच्या अध्यक्षतेखाली येथे हॉटेल कॅलक्स जोईया दो मार येथे शपथग्रहण सोहळा पार पडला यावेळी प्रमुख अतिथी सेवा सप्ताह प्रमुख लॉ विलास बुटले यांची उपस्थिती होती लॉयन्स क्लबचे कार्य हे केवळ महाराष्ट्रात नसून २१८ देशात आहे सदस्यांनी सामाजिक उपक्रमात अधिक सहभाग घेण्याचे आवाहन प्रांतपाल वासुदेव वलवलकर यांनी केले. यावेळी मावळते अध्यक्ष लॉ नरेंद्र गुल्हाने, सचिव लॉ विनय शिरभाते, खजिनदार लॉ चेतन कोठारी यांनी नवनियुक्त अध्यक्ष लॉ जितेंद्र चौधरी, सचिव लॉ मोहन राऊत, खजिनदार लॉ विशाल खडसे यांच्याकडे पदभार दिला. मागील एक वर्षात केलेल्या विविध कार्याचा आढावा माजी अध्यक्ष लॉ नरेंद्र गुल्हाने यांनी यावेळी मांडला. लॉ विक्रम बुधलानी,लॉ विजय देशमुख, लॉ राजाभाऊ टेंभरे, लॉ अंकित पोळ, लॉ मंगेश सव्वालाखे, लॉ सुमित बोराखडे, लॉ प्रमोद कुचेरिया, लॉ दिलीप दगडकर, लॉ विशाल जयस्वाल, लॉ विनोद तलवारे, लॉ प्रशांत बन्नोरे, लॉ देवेंद्र वानखडे, लॉ अजय हरवानी, लॉ सागर ठाकूर यांची उपस्थिती होती.

# माळवेशपुरा येथील 'तो' पूल ठरत आहे जीवघेणा

## लहान-मोठे अपघात नित्याचेच

**अचलपूर/वार्ताहर**

नगर परिषद बांधकाम विभागाचा मनमानी कारभारामुळे अचलपूर शहरातील माळवेशपुरा येथील प्रस्तावित डी. पी रस्त्याची दुरावस्था झाली आहे.यामुळे सिमेंटचा रस्ता पूर्ण गायब झाला असून जागोजागी असलेले खाड्डे,चिखल,पाण्याचा डबक्यातून नागरिकांना प्रवास करावा लागतो. यात काशीकर फटाका सेंटर यांच्या घराजवळ पुलाच्या समोर मोठा खड्डा हा नागरिकांसाठी जीवघेणा ठरत आहे.गेल्या काही दिवसापूर्वी एक तरुण चारचाकी वाहन टर्न करीत असताना त्या वाहनाचे चाक हे खड्ड्यात अडकले.यामुळे हा रस्ता पूर्वीच अरुंद असून बाजूला भव्य



नाला आहे.आता चारचाकी वाहन चालवायचे तरी कसे? असा प्रश्न निर्माण झाला आहे. पण या तरुणाचा समय सुचकतेमुळे कोणतीही अनुचित घटना घडली नाही. यामुळे अचलपूर नगर परिषद बांधकाम विभागाने तत्काळ या खड्ड्यांची दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.तसेच माळवेशपुरा येथील श्याम मेहाडीया यांच्या घरापासून काशीकर फटाका सेंटर यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिटीकरण कामाला तत्काळ सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा नागरिक आंदोलन पुकारण्याचा तयारीत आहे.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासंदर्भात तहसीलदारांना निवेदन

**अचलपूर/वार्ताहर**

अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे संत्रा, केळी पिकांचे मोठे नुकसान झाले झाले असून सोबतच बोगस बियाण्याचा सुळसुळाटमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. तातडीने या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी युवा स्वाभिमान पक्षाद्वारे अचलपूर चे तहसीलदार संजय गरकल यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांना सुद्धा या निवेदनाची प्रत देण्यात आली.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,रायायनिक खतांची टंचाई मोठया प्रमाणात



निर्माण झाली असुन शेतक-यांचे यामुळे मोठे नुकसान झालेले असुन त्वरीत रासायनिक खते उपलब्ध करुन देण्यात यावे. यानंतर नैसर्गिक आपत्ती मुळे संत्रा व केळी पिकांचे झालेले नुकसानाचे सर्वे करुन नुकसान भरपाई देणे, ज्वारी व रब्बी पिके मोठया प्रमाणात उत्पादन झालेले असून त्वरीत शासकीय खरेदी सुरु करण, सोबतच तालुका अंतर्गत मोठ्या प्रमाणात बोगस बियाणांचा सुळसुळाट झाला असून अनेक ठिकाणी बियाणे उगवलेच नाही व शेतक-यांना आत्महत्या करण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

तरी शेतक-यांना संपुर्ण पिकांच्या आर्थिक वर्षाची नुकसान भरपाई देणे या विविध मागण्यांचा समावेश आहे.

यावरील शेतकऱ्यांचा हक्काच्या मागण्याची दखल न घेतल्यास तिव्र आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे.यावेळी युवा स्वाभिमान पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष उपेन बछले, रविंद्र गयई तालुकाध्यक्ष, तमीज शाह तालुका कार्याध्यक्ष, अॅड.संतोष ठाकुर, बबलू वाजपेयी, निखील दुरतकर, बबलु वानखडे, राम नंदवशी, सुमित मोहोड, शिला अवसरमोल, माया धवणे, प्रिता देऊळकर आदी उपस्थित होते.

## उपजिल्हा रुग्णालयाचा परिसरातील पथदिवे सुरू

**अचलपूर/वार्ताहर**

शहरातील उपजिल्हा रुग्णालयाचा परिसरातील पथदिवे बंद असल्याने नागरिकांना भेडसावत असणाऱ्या विविध समस्या चे वृत्त दैनिक जनमाध्यम मध्ये प्रकाशित झाले होते. याची तत्काळ दखल घेत अचलपूर उपजिल्हा रुग्णालयाचा परिसरातील नवीन पथदिवे तत्काळ सुरु झाले. यामुळे रुग्णाच्या नातेवाईकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. एकीकडे अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी गर्भवती महिला अचलपूर तालुक्यातून नव्हे तर मेळघाट सह संपूर्ण जिल्ह्यातून येतात. यामुळे या परिसरात रुग्णाचा नातेवाईकांची मोठी गर्दी असते.पण या





परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून पथदिवे बंद होते. यामुळे संध्याकाळी संपूर्ण परिसर अंधारमय व्हायचे. आमच्या प्रतिनिधीने या भागाची पाहणी केली असता त्यांना हा गंभीर प्रकार समजला. यासंदर्भात दैनिक जनमाध्यम मध्ये वृत्त प्रकाशित झाले. याची तत्काळ पाहणी संबाधित विभागाकडून करण्यात आली. या परिसरात नवीन भव्य दिव्य पथदिवे लावण्यात आले.

# समग्र शिक्षा अंतर्गत नियतकालिक मूल्यांकन चाचणी

**अमरावती/का.प्र.**

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन चाचणी - १ व संकलित मूल्यमापन चाचणी - २ अशा तीन नियतकालिक चाचण्यांचे नियोजन करण्यात येणार आहे. नियतकालिक मूल्यांकन चाचणी अंतर्गत पायाभूत चाचणीचे आयोजन ६ ते ८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत करण्यात येत आहे.या राज्यस्तरीय चाचणी अंतर्गत प्रथम भाषा, गणित व तृतीय भाषा (इंग्रजी) या विषयांच्या इयत्ता दुसरी ते आठवीतील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व शाळा तसेच खाजगी अनुदानित शाळातील विद्यार्थ्यांची चाचणी होणार आहे.अशी माहीती संचालक राहुल रेखावार यांनी दिली आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्तानिहाय अपेक्षित अध्ययन संपादणूक प्राप्त केली आहे किंवा नाही याची पडताळणी होऊन अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ होण्यास या चाचणीमुळे शिक्षकांना मदत होईल. सदर चाचण्या इयत्ता १० वी व १२ वी बोर्ड परीक्षेप्रमाणे नाहीत, यामुळे विद्यार्थ्यांना याचा अतिरिक्त ताण देऊ नये. चाचण्यांचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांनी अध्ययन निष्पत्ती किती प्रमाणात प्राप्त केलेल्या आहेत हे शिक्षकांनी लक्षात घेऊन गरजेनुरूप अध्ययन अध्यापन प्रक्रियेत मूलभूत सुधारणा करणे व कृती-



## वर्ग २ ते ८ च्या विद्यार्थ्यांचा समावेश

कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे हा आहे.

अध्ययनाचे मूल्यमापन या तत्वाकडून अध्ययनासाठी मूल्यमापन या तत्वाकडे वळणे, विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पती संपादणूक पडताळणे व त्यामध्ये वाढ करणे,अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ होण्यास मदत करणे,राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणमधील संपादणूक वाढविण्याच्या दृष्टीकोनातून मदत होईल,अध्ययनात मागे असणा-या विद्यार्थ्यांना पुढे नेण्याच्या दृष्टीकोनातून कृतिकार्यक्रम तयार करणे व अंमलबजावणीस दिशा देणे, इयत्ता व विषयनिहाय अध्ययन निष्पत्तीमधील राज्याची संपादणूक स्थिती समजण्यास मदत होणे.

नियोजनानुसार दिलेल्या वेळेत सर्व नमूद इयत्तांची चाचणी होईल याप्रमाणे नियोजन करण्याची जबाबदारी शाळेच्या मुख्याध्यापकांची असेल. तथापि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन काही तारखांमध्ये बदल करायचे असल्यास संबाधित शिक्षणाधिकारी यांनी या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेवूनच बदल करावा. आपल्या अधिनस्त शाळा मुख्याध्यापक, शिक्षक यांचेपर्यंत पायाभूत चाचणीच्या अनुषंगाने योग्य त्या कार्यवाहीसाठी सूचना द्याव्यात.पायाभूत चाचणीचे गुण हे विद्या समीक्षा केंद्र येथे नोंदवण्यात येणार आहे. त्याकरिता संबंधित शाळेच्या शिक्षकांनी चाचणी तपासून त्याचे गुण विद्या समीक्षा केंद्र यांचे मार्फत उपलब्ध पोर्टलवर भरायचे असून याबाबतच्या सविस्तर सूचना यथावकाश देण्यात येतील.सबब सर्व चाचण्या प्रामाणिकपणे घेवून विद्यार्थ्यांचे गुणदानही त्याच पद्धतीने करून त्याची माहिती विद्या समीक्षा केंद्र Chatboat वर भरावी. या माहितीचा उपयोग केवळ विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या अध्ययनविषयक गरजा शोधून प्रभावी उपाययोजना करण्यासाठीच होईल याची प्रकर्षाने सर्वांनी नोंद घ्यावी. असे आवाहन राहूल रेखावार भा.प्र.से, संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी सर्व जिल्हाला दिले आहे.

# युवकांची शेतीकडे पाठ

**केवळ शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, आर्थिक मदत, अनुदानातून शेतीतील युवकांचा सहभाग वाढेल असे समजणे अनाठायी आहे. अन्य व्यवसायांप्रमाणे ती लाभप्रद, किफायतशीर बनल्याशिवाय युवकांच्या मनोभूमिकेत बदल होणे अशक्य आहे. त्यासाठी सरकारला आपल्या ग्राहकधार्जिण्या धोरणांचा त्याग करून शेतकरीधार्जिण्या धोरणांचा स्वीकार करावा लागेल. जिथे पोट भरत नाही तिकडे पाठ फिरते हे वैश्विक सत्य आहे आणि शेतकरी त्याला अपवाद कसा असेल?**

शीर्षकातील मता विषयी बहुतेक जण सहमत होतील. गाव, शेतीशी संबंध असणा-यांसाठी त्यांच्या रोजच्या बघण्यातील असल्याने त्यांच्यासाठी त्यात नावीण्य असे काही नाही. तसे हे सामाजिक वास्तव वेगवेगळ्या रूपांत प्रकटही होत असते. आपल्याकडील विवाह संस्था हे त्याचे उत्तम उदाहरण. वय उलटून गेले तरी शेतकरी मुलांची लग्ने न होणे, शेतकरी म्हणून नाकारले जाणे हे त्याचेच प्रकट वास्तव. अलीकडेच एका इंग्रजी वर्तमानपत्राने केलेल्या सर्वेक्षणातून या मताला पुष्टीच मिळाली आहे. शेतमालाचे पडलेले भाव व त्यातून पालकांचे वर्षानुवर्षे होणारे आर्थिक हाल बघून शेतक-यांच्या मुलामुलींनी या व्यवसायातून बाहेर पडून शहरात नोकरी, कामधंदा करण्याचा निर्णय घेतला असल्याचे हे सर्वेक्षण सांगते.

महात्मा गांधी 'खेडय़ाकडे चला' म्हणून सांगून गेले, परंतु आपल्याकडील सरकारची धोरणे मात्र 'चलो बॅग भरो और शहर निकल पडो' म्हणून सांगताहेत. आपल्याकडील शेतक-यांचे सरासरी वय ५० वर्षांच्या वर गेले. युवकांनी पाठ फिरवल्यामुळे येत्या काळात ते आणखी वाढणार यात शंका नाही. शेतक-यांच्या पहिल्या शिकलेल्या पिढीने चालून आलेली सरकारी नोकरी नाकारून 'गडय़ा आपला गाव बरा' म्हणत पिढीजात व्यवसाय करणेच पसंत केले. त्या काळात गरजाही



मर्यादित होत्या आणि त्या भागवण्या इतपत उत्पन्न शेतीतून मिळतही होते.म्हणूनच 'उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी' अशी लोकभावना त्या काळी झाली होती. आता 'उत्तम नोकरी, मध्यम व्यापार, कनिष्ठ शेती' अशी ती झाली आहे. ही किमया गेल्या सहा-सात दशकांत झालेल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक बदलांनी घडवून आणली आहे. नव्वदच्या दशकातील आर्थिक सुधारणा कार्यक्रमाने (शिथिलीकरण, खासगीकरण, जागतिकीकरणाचे धोरण) तर समाज जीवनात प्रचंड उलथापालथ घडवून आणलीय.

साध्या राहणीची जागा उच्च राहणीने घेतल्याने गरजा वाढल्या, परंतु अस्मानी, सुलतानी संकटामुळे शेतक-यांच्या उत्पन्नाला गळती लागली. शिवाय ते बेभरवशाचे बनत गेले. त्यामुळे उत्पन्नाची हमी देणा-या नोकरीचे त्यातही सरकारी नोकरीचे आकर्षण शेतक-यांसह सर्व समाज घटकांमध्ये वाढत गेले. आरक्षणाच्या मागणीला मिळणारा वाढता पाठिंबा ही त्याचीच अभिव्यक्ती.

खरे तर रोजगाराच्या दृष्टीने युवकांची शेतीला असलेली नापसंती केवळ भारतापुरती मर्यादित नसून ती अमेरिका, युरोपातील देश व इंडोनेशिया, आफ्रिकेतील देशांना व्यापणारी आहे. युरोपातील ५.६ टक्के शेतकरी ६५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे आहेत. चीनमधील ३४.६ टक्के, इंडोनेशियातील २.० टक्के शेतकरी अनुक्रमे ५० व ६० वर्षांपेक्षा अधिक वयाचे असल्याचे आढळून आलेय. २४ विकसनशील देशांतील ग्रामीण युवकांना शेतावर काम करणे आवडत नसल्याचे एक अभ्यास सांगतो. अशा बुडत्या नावेत आपल्याबरोबर इतरही सहप्रवाशी आहेत, यात समाधान मानणे भारतासाठी आत्मघातकीपणाचे ठरू शकते. वरकरणी भारत आणि इतर देशांतील युवकांच्या मानसिकतेत साम्य दिसत असले तरी तपशिलात फरक आहे. उद्योग, सेवा क्षेत्रातील अधिक वेतन, शहरी झगमगाटी जीवनाचे आकर्षण, शेती व्यवसायातील अल्प मोबदल्याविषयीची नाराजी या बाबी दोन्हीकडे आहेत. भारतातील ग्रामीण युवकांची नाराजी मुख्यत्वे सरकारच्या ग्राहकधार्जिण्या धोरणाविषयी आहे. सोयाबीन, कांदा असो की अन्य शेतमाल, सरकारच्या अशा धोरणामुळे दर कोसळतात आणि आपल्या आई-वडिलांचे श्रम वाया जातात अशी त्यांची पक्की धारणा झाली आहे. सत्तेवरील सरकार बदलले तरीही सरकारच्या भूमिकेत तसूभरही फरक पडत नसल्याचे लक्षात आल्यानेच त्यांनी शेतीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतलाय. तोकडे धरणक्षेत्र, भूगर्भातील खालावत चाललेली पाणी पातळी, वाढते तापमान, नैसर्गिक आपत्ती, प्रक्षोभक बाजारपेठ, यामुळे उत्पन्नाची न उरलेली हमी, दुस-या बाजूला कुटुंबाचा वाढता निर्वाह खर्च हीदेखील कारणे आहेतच. प्रगत देशातील ग्रामीण युवकांची सरकारच्या शेतमालाच्या किमतीविषयक धोरणाबद्दल कुठलीच तक्रार किंवा नाराजी नाही. त्यांचा रोष नव्याने शेती व्यवसाय करू इच्छिणा-या शेतक-यांना तोंड द्याव्या लागणा-या अडचणी संदर्भात आहे. जमीन, भांडवल, अन्य शेती संसाधने सहज उपलब्ध होत नसल्याने युवकांना इच्छा असूनही शेती करता येत नाही. पर्यायाने ते शेतीपासून दुरावतात, शिवाय शेती करणाराला समाजात प्रतिष्ठा नसणे, अन्य व्यवसायांच्या तुलनेत अल्प मोबदला हीदेखील कारणे आहेतच.


वातावरणातील बदल, नैसर्गिक आपत्ती, प्रक्षोभक बाजारपेठ अशा एक ना अनेक समस्यांनी भारतासह जगभरातील शेती धोक्यात आलेली असताना युवा शक्ती दुरावण्याच्या समस्येची त्यात भर पडणे या क्षेत्राच्या भवितव्याच्या दृष्टीने घातक ठरू शकते. नवीन तंत्राचा वापर, आधुनिकीकरण असो की नवप्रवर्तन, ते घडवून आणण्याचे श्रेय युवा वर्गाकडेच जाते. नैसर्गिक, सेंद्रिय, तंतोतंत शेती, संसाधनांचा कार्यक्षम वापर यांसारख्या कल्पना युवकांच्या सहभागाविना प्रत्यक्षात येणे कठीण आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे यातून देशाची अन्न सुरक्षा धोक्यात येऊन ग्रामीण विकास रोजगारावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतक-याचे वय व उत्पादकतेचा घनिष्ठ संबंध असल्याचे एका अभ्यासात दिसून आलेय. ज्येष्ठांच्या वाढत्या संख्येबरोबर उत्पादकता घटत जाणार हे उघड आहे म्हणूनच की काय युवकांचा सहभाग कसा वाढवता व टिकवून ठेवता येईल यावर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चासत्रे, परिषदा, मेळाव्यांचे आयोजन केले जात आहे. काही प्रगत देशांनी यासंदर्भात मोठी आघाडीही घेतलीय. अमेरिकेत युवा शेतक-यांना सर्वोपरी मदत करण्यासाठी एका स्वतंत्र संघटनेची स्थापना करण्यात आलीय. मदतीबरोबर ही संघटना युवकांच्या सहभाग वाढीसाठी धोरणात्मक उपायही सुचवते. युरोपियन संघातील देशांकडून युवा शेतक-यांच्या मदतीसाठी अनेक आकर्षक प्रेरणादायी योजना सुरू करण्यात आल्या आहेत.

४० वर्षांपेक्षा कमी वयाच्या शेतक-याला भांडवली गुंतवणुकीच्या ५० टक्के अनुदानाच्या रूपाने मदत सरकारकडून केली जाते. शिवाय अवजारे, शेतीविषयक प्रशिक्षण सल्ला, मार्गदर्शन दिले जाते. युवा शेतकरी उत्पादक संघटनेचा होऊ शकतो. ज्यामुळे त्याला बाजारपेठेची हमी मिळते. पूरक उत्पन्न आधार योजनेंतर्गत वर्षाला केल्या जाणा-या एकरकमी मदतीमुळे शेतक-याला उत्पन्नाची हमी मिळते. ज्यामुळे शेतीचा त्याग करण्याचा विचार त्यांच्या मनात डोकावत नाही. युरोपियन संघाकडून हा सगळा खटाटोप सदस्य देशांच्या अन्न सुरक्षेला बाधा येऊ नये तसेच त्यांच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्थानाला धक्का पोहोचू नये यासाठी केला जातो.

प्रगत देशांपेक्षा भारतातील या प्रश्नाची तीव्रता अधिक आणि स्वरूप भिन्न आहे. सरकारी पातळीवर अजूनपर्यंत या प्रश्नाची दखल घेतल्याचे दिसत नाही. केवळ शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, आर्थिक मदत, अनुदानातून शेतीतील युवकांचा सहभाग वाढेल असे समजणे अनाठायी आहे. अन्य व्यवसायांप्रमाणे ती लाभप्रद, किफायतशीर बनल्याशिवाय युवकांच्या मनोभूमिकेत बदल होणे अशक्य आहे. त्यासाठी सरकारला आपल्या ग्राहकधार्जिण्या धोरणांचा त्याग करून शेतकरीधार्जिण्या धोरणांचा स्वीकार करावा लागेल. जिथे पोट भरत नाही तिकडे पाठ फिरते हे वैश्विक सत्य आहे आणि शेतकरी त्याला अपवाद कसा असेल? त्यामुळे हमीभावाची घोषणा करण्याबरोबर तो शेतक-याच्या पदरात पडेल अशी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. देशाची अन्न सुरक्षा, आत्मनिर्भरता, ग्रामीण विकास ही उद्दिष्टे युवकांचा सहभाग वाढल्याशिवाय साध्य होणार नाहीत, हे लक्षात घेऊन सरकारने त्या दिशेने पावले उचलणे आवश्यक आहे.

**प्रा. सुभाष बागल**

## महाराष्ट्रात आता गणेशोत्सव राज्योत्सव



चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा अधिपती अर्थात आपल्या लाडक्या गणरायांचे आगमन यंदा २७ ऑगस्ट रोजी होत असून आता यापुढे गणेशोत्सव महाराष्ट्रात राज्योत्सव म्हणून साजरा केला जाईल यासंबधी लवकरचं राज्य शासन घोषणा करेल अशी माहिती महाराष्ट्राचे संस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत दिल्याचे वृत्त आहे निश्चितच हि बातमी स्वागतार्ह म्हणावी लागेल सामाजिक बांधिलकी, एकोपा, सगळ्यांनी संघटीत तसेच सामाजिक, धार्मिक, देशभक्तीपर सजिव देखाव्यांच्या माध्यमातुन समाज प्रबोधन व्हावे हा उद्देश ठेवून बाळ गंगाधर टिळक यांनी सन १८९३ मध्ये गणेशोत्सवाचा प्रारंभ केला हा गणेशोत्सव भारतीयांसाठी आकर्षण ठरला असून हा महोत्सव पहाण्यासाठी देशविदेशातील भक्तांमध्ये क्रेझ निर्माण झाली आहे गणेशोत्सव भारतासह आंतरराष्ट्रीय स्तरावर देखिल मोठ्या दिमाखाने साजरा केला जातो जगभरातील १७० देशांमध्ये गणेशोत्सव साजरा करत असल्याचे बोलले जाते अशा गणेशोत्सवाला महाराष्ट्र राज्य उत्सव म्हणून मान्यता मिळत असल्याने अनेक लहान मोठ्या उद्योगांना उभारी मिळणारं आहे गणपती बाप्पा सर्वच भक्तांचे श्रद्धास्थान आहे कोणत्याही मंगल कार्याची सुरुवात गणरायांना वंदूनचं होते महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा केला जात असला तरी त्याला आता शासनाचे अधिकृत पाठबळ मिळणारं आहे त्यामुळे आगामी काळात हा गणेशोत्सव महाराष्ट्रात राज्योत्सव म्हणून निश्चितच पुढे येईल.

**राजू जाधव**

# तरुणांचा देश...



बालशिक्षणाची थोर परंपरा असलेल्या महाराष्ट्रात आज मात्र काही घटना अशा घडत आहेत की, ज्यामुळे समाज म्हणून आपण कुठे चाललो आहोत, अशी चिंता निर्माण झाली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील 'विद्यादीप' बालसुधारगृहातील अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराची समोर आलेली घटना गंभीर आहे. बालसुधारगृहाची सुरक्षा व्यवस्था भेदून नऊ अल्पवयीन मुलींनी पलायन केले. त्यापैकी सात मुलींचा पाठलाग करून पोलिसांकडून त्यांना ताब्यात घेतले गेले. या घटनेने बालसुधारगृहाच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बालसुधारगृह हा तुरुंग वाटत असेल किंवा तेथे गैरप्रकार घडत असतील, तर त्याचे पर्यवसान अशा घटनांत होत असते. या सुधारगृहातील उघड झालेल्या घटनांनी सारा महाराष्ट्रच हादरला. सुधारगृहात मुलींचे साधे पोट दुखले, तरी प्रेग्नन्सी टेस्ट केली जाते. दुखणे कुठलेही असो, एक पांढरी गोळी उपचारासाठी दिली जाते. यातून काही मुलींना जंतुसंसर्गही झाला, असे सांगण्यात येते. दुखणे फारच गंभीर असेल, तर मुलींच्या अंगावर म्हणे 'पवित्र पाणी' शिंपडले जाते आणि कपाळावर क्रॉस काढले जाते. न ऐकल्यास मुलींना जबर मारहाण केली जाते.

एका मुलीला तर तोंडातून रक्त येईपर्यंत मारझोड करण्यात आली. झोपण्याच्या खोलीत कॅमेरे लावल्यामुळे, कपडेही कॅमे-यासमोरच बदलावे लागतात, अशा तक्रारी आहेत. त्यामुळे हे बालसुधारगृह म्हणायचे की छळछावणी? असा प्रश्न निर्माण होतो. अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, जिल्हा महिला बालविकास अधिका-याला तत्काळ निलंबित करण्यात येईल, चौकशी समितीचा अहवाल येताच सर्व दोषींवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत केली आहे. याप्रकरणी चौकशीसाठी तीन वरिष्ठ महिला पोलिस निरीक्षकांच्या समितीची स्थापना केली असून, त्यांनी ८० मुलींशी संवाद साधला आहे. महिला पोलिसांजवळच या लहान मुली दुःख प्रकट करू शकतील. ज्या मुली गप्प बसून सर्व सहन करत होत्या, त्याही कदाचित बोलू लागतील. संबंधित संस्थेच्या मान्यतेची मुदत संपली असेल, तर ती पुन्हा देण्यात येणार नाही आणि मान्यता असेल, तर रद्द करण्यात येईल, हा सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे. धक्कादायक म्हणजे मुलींना जबरदस्तीने धर्मांतरासाठी भाग पाडले जात असल्याच्या तक्रारी असून, त्याची गंभीर दखल घेण्याची गरज आहे. त्यासाठी जबरदस्ती करणाऱ्या महिलेवर गुन्हा दाखल करा, अशी मागणी विधान परिषदेत करण्यात आली आहे.

सरकारने त्यात प्राथमिक तथ्य आढळल्यास या मागणीची अवश्य पूर्तता केलीच पाहिजे. २०१७ साली देखील नागपूरमधील शासकीय बालसुधारगृहातून १४ अल्पवयीन मुले पळाली होती. फरार मुलांमधील बहुतेक मुले परराज्यांतील होती. शहापूर येथील एका नामांकित शाळेत स्वच्छतागृहामध्ये रक्त सांडल्याचे आढळून आल्यानंतर, सव्वाशे विद्यार्थिनींची गणवेश काढून तपासणी केल्याची भयंकर घटना घडली. मुख्याध्यापकांच्या आदेशावरून, कोणाची मासिक पाळी आली आहे हे शोधण्यासाठी सहावी ते दहावीच्या विद्यार्थिनींची गणवेश उतरवून तपासणी करण्यात आली. विशेष म्हणजे शाळेमध्ये पाण्याचा अभाव असल्याने, मुलींनी भिंतीला पुसलेल्या रक्ताचे डाग प्रोजेक्टरमधून सर्व विद्यार्थ्यांना दाखवले गेले आणि विद्यार्थिनींच्या बोटांचे ठसे घेतल्याचा आरोप पालकांनी केला आहे. अर्थातच या प्रकारामुळे विद्यार्थिनी भेदरलेल्या असून, त्यांच्या मानसिक स्थितीवर गंभीर परिणाम झाला आहे. मुख्याध्यापिकांवर कारवाई झाली असली, तरी संस्थाचालक काय करत होते, असा प्रश्न पडतो. बदलापूरमध्ये गेल्या वर्षी चिमुकल्यांवर अत्याचार झाला, तेव्हाही संस्थाचालकांची बेपर्वाईच त्यास कारणीभूत ठरली होती.

उमलत्या वयातील मुलींना फुलांप्रमाणे जपणे आवश्यक असते. त्यांची काळजी घेण्याचे सोडून शारीरिक तपासणी करण्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. विद्यार्थिनींना अंतर्वस्त्रे उतरवण्यास भाग पाडणाऱ्या मुख्याध्यापिकेस आणि सफाई कामगार महिलेला पोलिसांनी अटक केली असून, संस्थाचालकांसह चार शिक्षकांवर 'पोक्सो'अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

पण यासाठी संतप्त पालकांवर आंदोलन करण्याची वेळ आली, हे लक्षात घेतले पाहिजे. २०२३ मधील एका अहवालानुसार, पुण्याच्या बालसुधारगृहात अवघ्या दोन वर्षांत जवळपास ७०० मुले दाखल झाली होती. शिक्षणाचा अभाव आणि व्यसनाधीनतेमुळे बालगुन्हेगारी वाढत चालली आहे.

येरवड्यात मध्यंतरी किरकोळ कारणावरून चार अल्पवयीन मुलांनी एकाला कोयत्याने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. वाईट संगत, गुन्हेगारीचे आणि झटपट पैसे मिळवण्याचे आकर्षण, पालकांच्या दुर्लक्षामुळे बालगुन्हेगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

अल्पवयीन मुलांना अटक करता येत नसल्याने पुढील कायदेशीर कारवाई होत नाही आणि त्यांची रवानगी सुधारगृहात केली जाते. याचा गैरफायदा उचलून विविध गुन्ह्यांत अल्पवयीन मुलांचा वापर आणि सहभाग वाढला आहे. अनेक मुलांवर खून, बलात्कार, मारामारी यांसारखे गंभीर गुन्हे असतात. त्यांना बालसुधारगृहात ठेवल्यानंतर वेगवेगळे छंद, खेळांत गुंतवणे, अभ्यासात मग्न ठेवणे आणि कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे आवश्यक असते. याबाबत राज्यातील महिला व बाल शिक्षण विभागाची जबाबदारी देखील मोठी आहे. लहानपणीच मुले चुकीच्या मार्गाला लागल्यास त्यांच्या व कुटुंबीयांच्या आयुष्याचा सत्यानाश होतो. बालसुधारगृहात पाठवलेली मुले तिथे सुधारतील, त्यांना ती संधी दिली जाईल, त्यांचे समुपदेशन केले जाईल, अशी आशा असते. राज्यातीलच नव्हे तर देशभरातील बालसुधारगृहांमधील वास्तव भयावह असून त्याबाबत सरकार, समाजसेवी संस्था आणि लोकप्रतिनिधी, समाजसेवकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. कारण जेथे विशेषतः महिला आणि मुले सुरक्षित असतात, तोच समाज प्रगती करत असतो हे ध्यानात घेण्याची गरज आहे.

**सचिन अडसूळ**

# प्रश्न सत्ताधा-यांचा नाही...




**( फोटो : जनसुरक्षा विधेयकाला विरोध करताना मुंबईतील प्रमुख पत्रकार संघटना)**

जनतेचा आवाज बंद करण्यासाठी त्यांना जे शक्य आहे ते करीत राहणारच..

ज्यांना आम्ही सपोर्ट करतो ते विरोधक काय करतात हा कळीचा मुद्दा आहे..

१२-१३ कोटींची लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रातून जनसुरक्षा विधेयकाला विरोध करणारया फक्त १२०० हरकती?

त्यातही आम्ही म्हणजे पत्रकारांनी पाठविलेल्या किमान ५०० हरकती..

१०-५ हजार हरकती पाठवू शकतील एवढीही ताकद राज्यात विरोधकांची उरली नाही?

समितीत नाना पटोले, जितेंद्र आव्हाड होते..

त्यांनी तिथे काय दिवे लावले ?

याचा खुलासा त्यांनी करायला हवा..

सभागृहात विरोधक गप्प का बसले?

त्यांनी विधेयकास विरोध का केला नाही?

पत्रकार संघटनांनी एकत्र येत मुंबईत आंदोलन केले, यावेळेसही विरोधकांनी पत्रकारांना पाठिंबा देणारे साधे पत्रकही काढले नाही.. का?

जनसुरक्षा कायदयाची चर्चा सुरू झाल्यापासून विरोधक अलिप्त का आहेत?

संशय घेता येऊ शकेल असे प्रश्न अनेक आहेत

कोण करणार या सारया शंकांचे निरसन?

या कायद्यातले धोके विरोधकांना कळले नाहीत की,

हा विषयच त्यांना फार महत्वाचा वाटला नाही..?

की सारी मिलिभगत आहे?

असेही प्रश्न विचारता येऊ शकतात..

या कायद्याचा धोका राजकीय पक्षांपेक्षा चळवळीतल्या कार्यकर्त्यांना, संविधान रक्षणासाठी लढणा-यांना, चौथ्या स्तंभाचं स्वातंत्र्य अबाधित राहिलं पाहिजे यासाठी लढणारया पत्रकारांना अधिक आहे मग आपण का याला विरोध करायचा असा प्रश्न विरोधकांना पडला का ?

नेमके काय झाले..कळत नाही..

देशातील विरोधकांचा अवसानघातकीपणा, जनहिताच्या प्रश्नापासून अलिप्त राहण्याची वृत्ती हेच भाजपचे बलस्थान आहे..

विरोधक अडचणीत असतात तेव्हा त्यांना सामाजिक संघटना, पत्रकारांची मदत हवी असते, मात्र जेव्हा सामान्यांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न होतो तेव्हा विरोधक मूग गिळून गप्प असतात..

का?

हरकत नाही..

तेही राजकारण करतात.. करू द्या..

पण ज्यांचा या कायद्याला विरोध आहे अशा समविचारी कार्यकर्त्यांनी एक तातडीची बैठक बोलावून त्यावर मंथन केले पाहिजे.. कायद्याच्या विरोधातली ही लढाई रस्त्यावर उतरून करायची की न्यायालयात? यावर चर्चा होऊन निर्णय झाला पाहिजे..

कायद्यातील तरतुदींचं गांभीर्य सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे..

विरोधकांकडून आता फार अपेक्षा कोणी करू नयेत..

**एस.एम.**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवच



# तहसील अधिका-याची लटकवली खुर्ची!

## संजय गांधी श्रावण बाळ योजनेच्या अनुदान थकले; प्रहारचा एल्गार





■ प्रतिनिधी | अकोला ■

संजय गांधी श्रावण बाळ योजनेतून लाभ मिळविणाऱ्या गरजू नागरिकांना सातत्याने होणारा त्रास, डिबीटी पोर्टलवरील गैरसोय व कार्यालयीन अडथळे या संदर्भात शुक्रवार, दि. ११ जुलै रोजी प्रहार जनशक्ती पक्षाच्या महानगर अध्यक्ष मनोज पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकडो लाभार्थी व पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन देत जोरदार आंदोलन केले.

यावेळी मनोज पाटील यांनी तहसील प्रशासनाला अनेक मुद्द्यांवर धारेवर धरले. डिबीटी पोर्टलवर नोंदणी केल्यानंतरही लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा होत नाही, मंजूर क्रमांक असूनही कार्यालयात डेटा उपलब्ध नसतो, अशा अनेक समस्यांकडे त्यांनी लक्ष वेधले.

'तहसील कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागणाऱ्या वृद्ध लाभार्थ्यांची हेळसांड का होते?' असा थेट सवाल करत त्यांनी अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणावर टीका केली. मंजूर झाल्यानंतर लाभार्थ्यांचा डेटा कार्यालयात का उपलब्ध नसतो? आणि पासबुकवरील मागील एन्ट्री ग्राह्य धरली जात नाही, यामागचं कारण काय? हे तहसीलदारांनी स्पष्ट करावं, अशी मागणी त्यांनी केली. शहरी आणि ग्रामीण लाभार्थ्यांमध्ये होणाऱ्या भेदभावावरही त्यांनी संताप व्यक्त केला. राशन कार्ड ग्रामीण भागाचे असून इतर कागदपत्रे शहरी भागातील असतील तर लाभ नाकारला जातो, हा अन्यायकारक निर्णय असून हे शक्य नाही, कारण राशन कार्ड हे केवळ महाराष्ट्रातील रहिवासाचा पुरावा आहे, असे त्यांनी नमूद केले. नवीन तहसील कार्यालयाचे उद्घाटन होऊनही ते कार्यान्वित का झालेले नाही? आणि ते नेमके कधी सुरू होणार? या प्रश्नावरही त्यांनी ठाम भूमिका घेतली. गेल्या ६-७ महिन्यांपासून लाभार्थ्यांच्या कोणतीही बैठक घेण्यात आलेली नसल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

या आंदोलनात उपस्थित अनेक लाभार्थ्यांनी उत्पन्नाचा दाखला प्राप्त करूनही त्याची वैधता संपल्यामुळे केस रखडल्याची तक्रार केली. संजय गांधी श्रावण बाळ योजनेतील ७० टक्के लाभार्थी अशिक्षित असून त्यांना योजनेबाबत योग्य माहिती मिळत नाही, उलट कर्मचारी त्यांच्याशी असंवेदनशील वर्तन करतात, असा आरोपही यावेळी करण्यात आला. या आंदोलनादरम्यान प्रहार पक्ष सत्तेत नसतानाही नागरिकांच्या हक्कासाठी कटिबद्ध आहे, हे अधोरेखित करत मनोज पाटील व मोईन अली यांनी आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व लाभार्थ्यांचे आभार मानले.

# शिर्ला ग्रामपंचायत परिसर अतिक्रमणाच्या विळख्यात

## जिल्हाधिकारी तहसीलदार यांच्या आदेशाला केराची टोपली

■ प्रतिनिधी | पातूर ■

शहराचा अर्धा परिसर हा शिरला ग्रामपंचायत हद्दीमध्ये येत असून या परिसरातील मुख्य रस्त्यावर प्रचंड प्रमाणात अतिक्रमण झाले असून गाळे धारकांना व्यवसाय करणे कठीण झाली आहे. पातुर बाळापूर महामार्गावरील अतिक्रमण महामार्गाच्या कडेला लागून झाल्याने या ठिकाणी वाहतुकीची नेहमी प्रचंड प्रमाणात कोंडी होत आहे याबाबत स्थानिक व्यापाऱ्यांनी जिल्हाधिकारी, पंचायत समिती, तहसील कार्यालय, ग्रामपंचायत शिरला यांना वेळोवेळी निवेदन दिले या निवेदनाची दखल घेऊन जिल्हाधिकारी यांनी अतिक्रमण काढण्याचे आदेश पारित

### स्थानिक राजकारणातून तोंडी दबाव टाकून अतिक्रमण काढण्यास जाणून-बुजून विलंब

करूनही स्थानिक ग्रामपंचायत हे स्थानिक राजकारणाच्या दबावामुळे येऊन अतिक्रमण काढण्यास विलंब करीत आहे. अतिक्रमण धारकाच्या पाठीमागे राजकीय पाठबळ असल्याने व पावसाचे निमित्त दाखवून काही अधिकारी अतिक्रमण काढण्यास विलंब करीत असल्याचे नागरिकात बोलले जात आहे या अतिक्रमणामुळे पातुर शहरात मोठा अपघात किंवा जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही याबाबत सदर अतिक्रमण काढण्याची मागणी होत आहे.

# पोलीस प्रशासन उद्योजक व व्यापाऱ्यांच्या पाठीशी

## पोलीस अधीक्षक अर्चित चांडक

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यातील उद्योजक व व्यापाऱ्यांनी शासनाच्या नियमांचे पालन करीत आपले उद्योग व्यवसाय प्रामाणिकपणे सुरू ठेवावेत व सामाजिक मूल्यांचे रक्षण करण्यासाठी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी केले.

यंग इंडिया बिझनेस क्लबची वार्षिक आमसभा गुरुवारी वेलकम इन सभागृहात उत्साहात पार पडली, त्यावेळी ते सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन करत होते. या



कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून लेबेन इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ज्येष्ठ उद्योजक हरेश शाह उपस्थित होते. यावेळी मंचावर क्लबचे संचालक शार्दुल दिगंबर, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष निकेश गुप्ता, क्लबचे अकोला अध्यक्ष निलेश बियाणी, सचिव श्रीराम पांडे, कोषाध्यक्ष योगेश तिवारी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था याविषयी माहिती देत सांगितले की, 'ऑपरेशन प्रहार' उपक्रमाच्या माध्यमातून व्यसनाधीन होत चाललेल्या युवकांवर प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात येत आहेत व त्याला समाजाचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. 'कर्म हीच पूजा' हे ब्रीदवाक्य ठेवून प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व मान्यवरांच्या सन्मानाने झाली. प्रारंभी ?ड देवेंद्र अग्रवाल यांनी प्रास्ताविक करत क्लबच्या वर्षभरातील रचनात्मक उपक्रमांची माहिती दिली. निकेश गुप्ता व शार्दुल दिगंबर यांनीही मनोगत व्यक्त करत तरुणांनी पारंपरिक उद्योगासोबत नवे उद्योगही सुरू करावेत असे आवाहन केले. ज्येष्ठ उद्योजक हरेश शाह यांनी स्वतःच्या शून्यातून उभारलेल्या औषध उद्योगाचा प्रेरणादायी प्रवास मांडला.

# बाल विवाह टाळा, कायद्याची अंमलबजावणी करा

## डॉ. बळीराम गाढवे जिल्हा आरोग्य अधिकारी

■ प्रतिनिधी | अकोला ■

२६ वा जागतिक लोकसंख्या दिन ११ जुलै २०२५ रोजी अकोला जिल्ह्यात विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला .अनिता मेश्राम मुख्य कार्यकारी अधिकारी व डॉ कमलेश भंडारी उपसंचालक आरोग्य सेवा यांचे मार्गदर्शनाखाली डॉ बळीराम गाढवे जिल्हा आरोग्य अधिकारी अकोला व डॉ तरंगतुषार वारे जिल्हा शल्य चिकित्सक यांनी नियोजन करून जिल्ह्यात जागतीक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे निमित्ताने शाळा, महाविद्यालये ,रुग्णालये



तसेच गाव पातळीवर आरोग्य सेवा सत्राचे ठिकाणी, गट सभेच्या माध्यमातून विद्यार्थी ,शिक्षक ,ग्रामस्थांना एकत्रीत करून लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम, उदभवत असलेल्या समस्या, लोकसंख्या नियंत्रणासाठी चे उपाययोजना, संतती प्रतिबंधासाठी चे साधन उपलब्धता त्याचे फायदे वापर शासकीय आरोग्य संस्थेत याबाबत असलेल्या योजना जसे की पुरूष नसबंदी शस्त्रक्रिया केल्यानंतर १४५० रु लाभार्थी ना मिळतात, शस्त्रक्रिये करीता वाहन व्यवस्था ईतर सर्व साधनांबाबत माहिती देण्यात आली विद्यार्थी रॅली काढून घोषणा देऊन जनजागृती करण्यात आली.वृत्तपत्र लेख, मोबाईल सोशल मीडिया वापर करून जनजागृती करण्यात आली. याकरिता लोक प्रतिनिधी ना सहभागी करून त्यांचे माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. विविध स्पर्धा चे आयोजन करण्यात आले. याकरिता जिल्ह्यातील सर्व आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, अधिकारी यांनी पुढाकार घेऊन कार्यक्रम राबविण्यात आले. या वर्षी (२०२५) चे जागतिक लोकसंख्या दिनाचे घोषवाक्य आई होण्याचे योग्य वय तेंव्हा शरीर व मनाची तयारी जेंव्हाआहे याचा अर्थ प्रमाणे बाल विवाह टाळा योग्य वयातच मुलीचे १८वर्षे व मुलाचे २१ वर्षे नंतर लग्न करा कायद्याची अंमलबजावणी करा असा संदेश डॉ बळीराम गाढवे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिला.

# मोबाईलच्या व्यसनावर डॉ. भावे यांचे व्याख्यान



■ प्रतिनिधी | अकोला ■

आजच्या काळात मोबाईलमुळे प्रत्येक साधनाचा जसा उपयोग होतो तसा दुरुपयोग पण असतो. तो मोबाईल अनेक बाबतीत अति प्रमाणात झाला आहे.आजकाल च्या पिढीला तर मोबाईलचे व्यसनच लागले आहे त्यामुळे याचे दुष्परिणाम जोमाने वाढले आहे. यासाठी आयएमएच्या वतीने मोबाईलचे दुष्परिणाम यावर व्याख्यानचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयएमएचे अध्यक्ष डॉ.संतोष कुमार सोमाणी यांनी दिली.

आयएमएच्या वतीने डॉक्टर दिन निमित्ताने आयोजित पत्रकार परिषदेत या उपक्रमाची माहिती देण्यात आली. यावेळी आयएमएचे सचिव डॉ प्रदीप अग्रवाल,प्रकल्प प्रमुख डॉ अनुप कोठारी,डॉ कमलकिशोर लढ्ढा उपस्थित होते.रविवार दिनांक १३ जुलै सकाळी ११ वाजता स्थानीय प्रमिलाताई ओक हॉल येथे विद्यार्थी व नागरिकांसाठी आयोजित व्याख्याना त नागपूर येथील मानसपोचर तज्ञ डॉ सुधीर भावे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. डॉ भावे हे विद्यार्थी व नागरिकांना मोबाईलच्या दुष्परिणामवर व्याख्यान सादर करून काही मोजक्या प्रश्नाचे समाधान ही करणार आहेत.आज समाजात मोबाईल चे चलन वाढले आहे.मोबाईल मुळे बेचेनी, चिडचिडेपणा, खूप वेळ मोबाईलवर असल्यामुळे झोप न लागणे,थकवा जाणवणे, नर्वस होणे, जीव घाबरणे. मोबाईलचा अतिवापर केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर कामावर सामाजिक आणि पारिवारिक जीवनावर वाईट परिणाम होत असतात. मोबाइल एडिक्शनसाठी उपचाराची किंवा समुपदेशनाची गरज आहे.

**Change In Name**

I HAVE CHANGE MY NAME SUM SPELLING MISTEK MY OLD NAME **(NASEHA ANJUM ASIF KHAN)** AND MY CORRECT NAME SPELLING **(NASIYAANJUM ASIF KHAN)** DATE OF BIRTH CORRECTION WRONG DATE OF BIRTH (19-04-1979) MY RIGHTE DATE OF BIRTH (19-08-1978) PASSPORT NUMBER: J6013151 FILE NUMBER: NGPZ05090810.

# जिल्ह्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी अर्ज करावे -जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | अकोला ■

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय येथे इयत्ता सहावीत प्रवेश मिळविण्यासाठी प्रवेश चाचणी परीक्षा होणार असून, त्यासाठी दि. २९ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. या विद्यालयात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम शिकवला जात असून, हे संपूर्ण निवासी व अद्ययावत शिक्षण सुविधांनी परिपूर्ण विद्यालय आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज करून प्रवेशाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी केले आहे.

नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीत

### जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी अर्ज सुरू

प्रवेशासाठी चाचणी परीक्षा दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. या चाचणीला बसण्यासाठी 'सीबीएसई आयटीएमएस. आरसीआयएल. जीओव्ही.इन' या संकेतस्थळावर दि. २९ जुलैपूर्वी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. विद्यार्थी २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पाचवीत शिकत असावा. तो अकोला जिल्ह्याचा रहिवाशी व या जिल्ह्यातील शासनमान्य शाळेत शिकत असावा. विद्यार्थ्याचा जन्म दि. १.५.२०१४ ते ३१.७.२०१६ दरम्यान झाला असावा. विद्यालयात मुलींसाठी ३० टक्के जागा राखीव आहेत, अशी माहिती प्राचार्य कविता चव्हाण यांनी दिली.

या विद्यालयात संगणक, इंटरनेट, सुसज्ज प्रयोगशाळा, ग्रंथालय, मैदान, राहण्यासाठी कक्ष, नाश्ता, भोजन, स्वच्छ पेयजल आदी सुविधा विनामूल्य उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना प्रवेशावेळी युनिफॉर्म, बूट, शैक्षणिक साहित्य विनामूल्य दिले जाते. विद्यालयात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम, राष्ट्रीय विद्यार्थी सेना व इतर उपक्रम राबवले जातात. त्याचप्रमाणे, व्यायाम, योग व इतर कलांचे प्रशिक्षणही दिले जाते.

# भारतीय सेनादलातर्फे सागर येथे रिलेशन भरती

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारतीय सेनादला तर्फे युनिट हेडक्वार्टर मध्यप्रदेशातील सागर येथील महार रेजिमेंट सेंटर येथे दि. २१ जुलै ते २६ जुलै युएचक्यू कोट्यातून रिलेशन आणि स्पोर्टस् भरती रॅली राबविण्यात येत आहे.

भरतीत माजी सैनिक, दिवंगत सैनिक, सेवारत सैनिक यांचा मुलगा, तसेच सेवारत सैनिकाचा भाऊ यांना सहभागी होता येईल. अग्निवीर जनरल ड्युटी, अग्निवीर ट्रेडसमेन (८वी व १०वी) व अग्निवीर एसकेटी/ लिपिक (क्लार्क) ही पदे भरली जातील. सहभागासाठी उमेदवाराकडे रिलेशन सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. भरतीमध्ये पायोनियर क्रॉप्ससाठी ६० जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. भरती प्रक्रियेतील प्रवेशासाठी तारीख मिळण्यासाठी उमेदवारांनी मो. क्र ८८७११८०३०५ किंवा ९६३०१४१२८९ या क्रमांकावर एसएमएसद्वारे नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात संपर्क करावा किंवा ९६३०१४१२८९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# जागतिक मानव संसाधन विकास परिषदेमध्ये महावितरणला सहा पुरस्कार; सीएमडी लोकेश चंद्र यांना दोन पुरस्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■

जागतिक मानव संसाधन विकास परिषदेमध्ये 'उत्कृष्टतेसाठी राष्ट्रीय पुरस्कार २०२५' अंतर्गत उत्कृष्ट कामगिरीसाठी महावितरण सहा पुरस्कारांचे मानकरी ठरले. यामध्ये महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांचा वैयक्तिक गटात दोन पुरस्कारांनी गौरव करण्यात आला.

मानव संसाधन विकासाला चालना, कर्मचारी क्षमता, कौशल्य व ज्ञानाचा विकास, नवीन संकल्पना, एआय तंत्रज्ञान तसेच हरित ऊर्जेचा वापर व योजना आदींवर मुंबई येथे गुरूवारी (दि. १०) एक दिवसीय जागतिक मानव संसाधन विकास परिषद झाली. देशभरातील खासगी व सरकारी कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी या परिषदेला उपस्थित होते. यावेळी महावितरणकडून कर्मचारी प्रशिक्षण, विद्युत



सुरक्षा मोहीम, एआय तंत्रज्ञानाचा वापर, हरित ऊर्जेवरील विविध योजनांची माहिती देण्यात आली.

या परिषदेच्या दुसऱ्या सत्रात 'उत्कृष्टतेसाठी राष्ट्रीय पुरस्कार २०२५' अंतर्गत विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले. यात महावितरणला सहा पुरस्कारांनी गौरवण्यात आले. सांघिक गटामध्ये, शेतकऱ्यांचे दिवसा वीजपुरवठ्याचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'बेस्ट इनोव्हेशन इन पॉवर/ एनर्जी', मानव संसाधन विभाग अंतर्गत कर्मचारी कौशल्य विकास, क्षमतावाढ प्रशिक्षण व विद्युत सुरक्षेचे उपक्रम यासाठी 'अवार्ड फॉर एक्सलेन्स इन ट्रेनिंग', पुणे येथील हरित ऊर्जेवरील राज्यात पहिल्या विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनसाठी 'बेस्ट एनवायरनमेंट फ्रेंडली प्रोजेक्ट' हे तीन पुरस्कार प्रदान करण्यात आले.महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांना वैयक्तिक गटात 'सीएमडी ऑफ द इयर' व 'लिडरशिप एक्सलेन्स इन टेक्नोलॉजी इनोव्हेशन' हे दोन पुरस्कार तर संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांना 'प्राईड ऑफ द प्रोफेशन' पुरस्कार जाहीर झाला.

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**पाणी पुरवठा विभाग**

**निविदा सुचना क्र. ०७, सन २०२५-२६**

अकोला महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग, अकोला मनपा निधी अंतर्गत दि. ११/०७/२०२५ रोजी निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असुन या कामासंबंधीत सविस्तर तपशिल खालील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
(संपर्क- ७७०९०४९३५१)
संकेतस्थळ www.amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगरपालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/पापू/ १७३/२०२५
पाणी पुरवठा विभाग,
अकोला महानगरपालिका, अकोला दिनांक : ११/०७/२०२५

जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२०४/२०२५ प्रोसेस नं.१०५३२/२०२५
चौ.ता. ०८/०८/२०२५ दिनांक : ०५/०७/२०२५

**अर्जदार :** १. वैष्णवी अक्षय देशमुख २. आध्यवी अक्षय देशमुख ३. कल्पना संजयराव देशमुख सर्व रा फ्लॅट क्र ४०५, नितीन रेसिडेन्सी, न्यु तापडिया नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अक्षय संजयराव देशमुख
**पत्ता :-** रा. फ्लॅट क्र ४०५, नितीन रेसिडेन्सी, न्यु तापडिया नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अक्षय संजयराव देशमुख यांचे दि.०५/०५/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ०८/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११४६/२०२५ प्रोसेस नं.१०८२९/२०२५
चौ.ता. १८/०८/२०२५ दिनांक : ०९/०७/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती. शिला राजेश मालिये २. मयुर राजेश मालिये ३. कोमल राजेश मालिये ४. श्रीमती कमलाबाई मनोहर मालिये अर्जदार क्र. १ ते ४, रा. शिवाजी शाळेच्या समोर, हरीहरपेठ, दसेसरा नगर, अकोला. ता. जि. अकोला ५. सौ. काजल केतन दैनीवाल रा. रामटेकपूरा, अकोट ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजेश मनोहर मालिये
**पत्ता :-** रा. शिवाजी शाळेच्या समोर, हरीहरपेठ, दसेसरा नगर, अकोला. ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजेश मनोहर मालिये यांचे दि. ०६/११/२०१४ रोजी मेन हॉस्पिटल अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १८/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रक. रची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११५१/२०२५ प्रोसेस नं.१०२३०/२०२५
चौ.ता. १३/०८/२०२५ दिनांक : ०७/०७/२०२५

**अर्जदार :** १. स्नेहल बाबुराव देशमुख २. वनमाला बाबुराव देशमुख रा. विवेकानंद कॉन्व्हेंट जवळ, जुने खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : बाबुराव दादाराव देशमुख
**पत्ता :-** रा.विवेकानंद कॉन्व्हेंट जवळ, जुने खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत बाबुराव दादाराव देशमुख यांचे दि. २८/०२/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १३/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २२७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# साहूर आरोग्य केंद्राची इमारत झाली शिकस्त

## रुग्णासह कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात, इमारत डिसमेंटल करून पुनर्बांधणी कडे दुर्लक्ष

**साहूर / जनमाध्यम**

४० वर्षांपूर्वी साहूर आरोग्य केंद्राची इमारत उभारण्यात आली होती, मात्र त्यावेळी संबंधित ठेकेदाराकडून इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याने इमारतीला अल्पावधीतच तडे गेले अनेक ठिकाणी स्लॅबही गळतो सदर आरोग्य केंद्राची इमारत भगनावस्थेत असून अत्यंत धोकादायक असल्याने ही इमारत डिसमेंटल करून पुनर्बांधणी करणे गरजेचे आहे त्यामुळे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे लक्ष देऊन इमारत डीसमेंटल करून इमारतीची तात्काळ पुनर्बांधणी करावी अशी मागणी रुग्णासह नागरिकाकडून करण्यात येत आहे.

येथील प्राथमिक आरोग्य केंद्राने आरोग्य सेवा सुविधेच्या बाबतीत जिल्ह्यात उच्चांक गाठला होता या आरोग्य केंद्राला अनेक पुरस्कार सुद्धा मिळाले आहेत, मात्र गाव पुढारी व वरिष्ठ जबाबदार व निष्क्रिय अधिकाऱ्यांमुळे या आरोग्य केंद्राला सध्या समस्यांचे ग्रहण लागले आहे.पंधरा दिवसापूर्वी वृत्तपत्रात बातमी प्रकाशित करताच आरोग्य केंद्राच्या इमारतीमधील ओपीडीसह इतर साहित्य बाजूच्या इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात हलवण्यात




आले.मात्र भगनावस्थेत व धोकादायक असलेल्या आरोग्य केंद्राची इमारत अद्यापही डिसमेंटल न केल्याने व सध्या पाऊस सुरू असल्याने ही इमारत पत्त्याच्या इमारतीप्रमाणे केव्हा धाडकन येऊन पडेल याची शाश्वती नाही.

दरवर्षी पावसाळ्यात या आरोग्य केंद्राच्या धोकादायक इमारतीचा प्रश्न ऐरणीवर येतो आरोग्य केंद्राकडून सातत्याने इमारत डिसमेंटल करण्याबाबत सूचना दिल्या आहेत मात्र त्याकडे गाव पुढारी व वरिष्ठ जबाबदार अधिकाऱ्याकडून दुर्लक्ष केल्या जात असून या इमारतीची दुरावस्था अधिकाधिक होत आहे.

समाजात जीर्ण इमारती व शासकीय इमारती कोसळण्याच्या घटना अनेक घडल्या आहेत, यामध्ये बऱ्याच वेळा जीवित हानी सुद्धा झालेली आहे कारण पावसाळ्यात वाऱ्यामुळे व जोरदार पावसामुळे अशा इमारती कोसळण्याचा धोका कायम असतो भिंतीवर ठीक ठिकाणी तडे गेले असून शेताचे प्लास्टरही गळून पडले आहे, त्यामुळे लोखंडी सळाखा हाच छताचा आधार आहे.

पावसाळ्यात पावसाचे पाणी थेट खोल्यात साचून राहते या आरोग्य केंद्रासाठी मंजूर झालेला सहा कोटी रुपयांचा निधी इतरत्र वळविल्याने जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा आरोग्य प्रशासन उदासीन असल्याचे दिसून येत आहे तेव्हा सतत सुरू असलेल्या पावसामुळे ही इमारत कोसळण्याच्या आधी ही इमारत डिसमेंटल करून ताबडतोब आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीचे बांधकाम करावे अशी मागणी येथील रुग्णासह गावकऱ्यांनी केली आहे.

# लोकसंख्या नियंत्रणासाठी सुजाण नागरिकांचा संकल्प महत्त्वाचा



## जागतिक लोकसंख्या दिन

**देवळी/ जनमाध्यम**

जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त 'लोकसंख्या वाढ एक आवाहन' या विषयावर स्थानिक एस एस एन जे महाविद्यालयातील एनसीसी भवन येथे भाषण स्पर्धा संपन्न झाली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनिता सोनारे तर प्रमुख अतिथी म्हणून एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. जगदीश यावले, विद्यार्थी प्रतिनिधी लक्ष्मी कावळे व युवराज डफरे उपस्थित होते.भाषण स्पर्धेचे प्रथम पारितोषिक साक्षी परिसे तर मयुरी पेटकर व कल्याणी लिखार यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय पुरस्कार प्राप्त केली निशा कांबळे, त्रिशा विरपाते, प्राप्ती मांढरे, गायत्री पदीले व शीतल अष्टकार यांनी प्रोत्साहनपर पुरस्कार पटकाविले.कार्यक्रमाचे संचालन कुंदन कावळे तर आभार सलोनी अजमीरे हिने आभार मानले. कार्यक्रमाची सांगता लोकसंख्या वाढ कमी करण्याकरिता तरुणांची जबाबदारी यावर शपथ घेऊन झाली.

# अवैध दारू वाहतूक करणाऱ्यां विरोधात पोलिसांची कारवाई

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

शहर पोलिस ठाण्याच्या डिबी पथकाने शाहलंगडी परीसरात अवैध दारू वाहतूक करणाऱ्या विरोधात कारवाई ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती ११ जुलै रोजी १० वाजता पोलिसांकडून प्राप्त झाली आहे.

१० जुलै रोजी सायंकाळी ६ वाजताचे सुमारास शाहलंगडी परिसरात ऋषिकेश महाकाळकर, अतुल शंभरकर) समीर शेख हे क्रमांक MH 32 AU 4221 मोपेडने अवैध दारूची वाहतूक करणार असल्याचे माहिती वरून पोलिसांनी नाकाबंदी करून सदर दारूची गाडी पकडून त्यांचे ताब्यातून ४ प्लास्टिक पन्नीतून ६० लीटर गावठी मोहा दारू किंमत ६०००/, Sk tvs कंपनीची जुपिटर किंमत ६०,०००/ एक vivo कंपनीचा अँड्रॉइड मोबाईल किंमत १०,०००/ असा एकूण ७६,०००/. चा माल जप्त करण्यात आला.हि कारवाई ठाणेदार देवेंद्र ठाकूर याचे मार्गदर्शनात डिबी पथकाचे गणेश वैद्य, दिपक हाके, राजेंद्र ढगे, कृष्णा माने, संतोष लोहटे यांनी केली आहे.



## ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

### लोकसहभाग आर्थिक मदतीमुळे

# सोफियाचे उच्च शिक्षणाचे स्वप्न होईल पूर्ण

**वर्धा / जनमाध्यम**

स्थानिक मसाळा साईनगर येथील स्वाभिमानी आणि महापुरुषांच्या विचाराने प्रेरित झालेले कुटुंब भाऊराव देशभ्रतार यांची मुलगी सोफियाची घरची अत्यंत हलाखीची परिस्थिती असताना अमरावती वरून बायोटेक्नॉलॉजी मध्ये बी. टेक. पूर्ण केले.

वडीलाचा भाजीपाला विकण्याचा व्यवसाय तर आई भांडी घासण्याचे काम करतात. सोफियाने उच्च शिक्षणासाठी एम.टेक. आय.आय.टी करिता स्पर्धा परीक्षा दिली. त्यात ती यशस्वी झाली. तिची एम. टेक बायोटेक्नॉलॉजी आय.आय.टी करिता हिमाचल प्रदेश मधील मंडी येथे निवड झाली. परंतु अत्यंत हुशार असणाऱ्या सोफिया करिता उच्च शिक्षणासाठी पैशाची अडचण निर्माण झाली. अशावेळी बुद्ध टेकडी मित्र परिवाराच्या वतीने राजूभाऊ थुल, सुनील ढाले,प्रभाकर भगत, प्रवीण जंगले,शालिक भस्मे,,प्रणोज बनकर मुकुंद नाखले यांनी पुढाकार घेत लोक सहभागातून आर्थिक मदत गोळा केली. त्या मदतीतून सोफियाचे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण होणार आहे. लोकसभागातून प्राप्त झालेले रक्कम ५२७०२/- साईनगर येथील दिनांक १० जुलै रोजी सोफियाच्या घरी पोहोचून सोफियाचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य समाज भूषण पुरस्कार प्राप्त राजू थुल, सामाजिक कार्यकर्ते सुनील ढाले, मुख्याध्यापक मुकुंद नाखले, मसाळातील उपसरपंच संदेश किटे, प्राचार्य संजय वानखेडे, आंतरराष्ट्रीय सुप्रसिद्ध गायिका सोनाली वानखेडे, यशवंत भाले, वडील भाऊराव देशभ्रतार आई प्रज्ञा देशभ्रतार, पटवारी संघटनेचे राजू झामरे,राज देशभ्रतार, सविता ताकसांडे , हस्त लिखितकार धनंजय नाखले, इत्यादी उपस्थित होते. लोकसभागातून प्राप्त झालेले आर्थिक रक्कम ५२७०२/- माझ्यासाठी लाखमोलाचे असून अनमोल आहे. माझे उच्च शिक्षण पूर्ण झाल्यानंतर समाजऋण फेडण्याचा मी नक्की प्रयत्न करीन. असे विचार सोफीयाने यावेळी व्यक्त केले.



## बुद्ध टेकडी मित्रपरिवाराचा उपक्रम

# वर्धा जिल्हा गवळी समाज संघटनेचा मेळावा रविवारी

## गुणवंत विद्यार्थी सन्मान सोहळा

**वर्धा / जनमाध्यम**

गवळी समाज संघटनेच्या वतीने १३ जुलै रोजी सकाळी साडेअकरा वाजता दादाजी धुनिवाले सभागृह येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहिर तसेच सोलापूरचे पोलीस निरीक्षक अमोल गवळी, पोलीस उपनिरीक्षक भावना कुंदन वैद्य, महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष हिरामण आप्पा गवळी, माझी प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब गलाट, यांची उपस्थिती राहील तसेच प्रदेश उपाध्यक्ष गोपाळ अवथळे, उद्धव गाडेकर, प्रदेश सचिव अशोक मंडले,माजी प्रदेश उपाध्यक्ष आनंदराव कालोकर, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष वैशाली अवथळे , प्रवीण दादा हुंडीवाले,उत्तम काळे,सदाशिव खडके, नारायण फुलाते, यांच्यासह मान्यवरांची उपस्थित राहणार आहे.

या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी वर्धा जिल्हा गवळी समाज संघटने कडून वर्धा जिल्ह्यातील तमाम गवळी समाज संघटनेचे अधिकारी पदाधिकारी तसेच विद्यार्थी आघाडी,युवा आघाडी, महिला आघाडीच्या सदस्यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# वीज चोरांविरोधातील मोहीम अधिक तीव्र होणार

**वर्धा**- घरगुती वीज वापराकरिता लावण्यात आलेल्या मीटरची गती कमी करणे किंवा बंद करणे यासारख्या नवनवीन पद्धतींचा वापर उघडकीस आला आहे. त्यामुळे वीजवितरण कंपनी वीजचोरांविरोधातील मोहीम अधिक तीव्र करणार असल्याचे कळते. वीजवितरण कंपनीच्या वतीने पथक तयार करून शहराच्या काही विशिष्ट भागात तपासणी मोहीम राबविण्यात आली. त्या मोहिमेत वीज चोरीचे गंभीर प्रकार पुढे आले. आता महावितरणने वीजचोरांविरोधातील मोहीम अधिक तीव्र करण्याचा निर्धार केला आहे. याअंतर्गत, सदोष मीटर तसेच सरासरी वीज बिल असलेल्या सर्वच ग्राहकांच्या मीटरची कसून तपासणी सुरू करण्यात आली आहे. यासोबतच, थकबाकीमुळे कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित केलेले आणि सवलत देऊनही अभय योजनेत सहभागी न झालेल्या ग्राहकांविरोधात कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशा सर्व ग्राहकांच्या प्रत्यक्ष तपासणीला सुरुवात झाली आहे. वीजचोरीच्या अनधिकृत विद्युतभारामुळे वीजवाहिन्या आणि रोहित्रांवर क्षमतेपेक्षा जास्त ताण येतो. यामुळे रोहित्र निकामी होणे, शॉर्टसर्किट होऊन वीजपुरवठा खंडित होणे यासारख्या समस्या उद्भवतात. याचा नाहक त्रास नियमितपणे वीज बिल भरणाऱ्या प्रामाणिक ग्राहकांना सहन करावा लागतो आणि महावितरणलाही मोठा आर्थिक फटका बसतो. वीजपुरवठा खंडित झाल्यास ग्राहकांच्या रोषालाही सामोरे जावे लागते.

त्यामुळे, सर्व नागरिकांनी अधिकृत वीज मीटर घेऊनच विजेचा वापर करावा आणि वापरलेल्या विजेच्या बिलांचा नियमित भरणा करावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.



### इसमाची आत्महत्या

**वर्धा**- विहिरीत उडी घेऊन इसमाने आत्महत्या केली. करंजी (भोगे) शेतशिवारात शिवारात ही घटना घडली. भास्करहेडाऊ(वय ५०) रा. आलोडी वर्धा असे मृतकाचे नाव आहे. भास्करहेडाऊ यांनी ऑटोकरिता कर्ज काढले होते. मात्र कर्जाचे हप्ते परतफेड करणे शक्य होत नसल्याने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याचे सांगण्यात आले.

**नावात बदल**

माझे मार्कलिस्ट वरील नाव **TANVEER AHMAD ABDUL GHAFFAR** असे नाव होते.माझे पासपोर्ट नंबर **M5345016** हा असून, त्या पासपोर्ट वरील **TANVIR AHMED** हे नाव नमूद आहे. वरील नाव पासपोर्टे वर नमूद करावे.

-: पत्ता :-
दत्त मंदिर महादेवपुरा
वर्धा,४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी **AFSANA KADAR MANSURI** असे नाव होते.माझ्या आधार कार्ड वरील नाव **AFSANA ABDUL KADAR JILANI MANSURI** हे नाव नमूद आहे. वरील नाव नमूद करावे.

-: पत्ता :-
वृंदावन नगर
सिंदी मेघे,
वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर **K5422509** वरील माझे नाव **ZIYAAN KHAN** असे नाव होते.माझ्या आधार कार्ड वरील IYAAN SHER KHAN नाव हे नाव नमूद आहे. वरील नाव पासपोर्ट वर नमूद करावे.

-: पत्ता :-
म्हसाळा
वर्धा,४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी **KHER KHAN** असे नाव होते.माझ्या आधार कार्ड वरील नाव **SHERK HAN BABUKHAN** हे नाव नमूद आहे. वरील नाव नमूद करावे.

-: पत्ता :-
म्हसाळा,
वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी **SABA ANJUM KHAN** असे नाव होते.माझ्या आधार कार्ड वरील **SABA SHER KHAN** नाव हे नाव नमूद आहे. वरील नाव नमूद करावे.

-: पत्ता :-
म्हसाळा,
वर्धा ४४२००१

# संक्षिप्त

## विजेचा स्पर्श झाल्यामुळे चार जनावरांचा मृत्यू

**पुलगाव**- वीज प्रवाहाने चार जनावरांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना लक्ष्मीनारायण या गावात घडली. या दुर्घटनेत सुमारे २.५ ते ३ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.शेख आशिक शेख रशीद यांचा हेला व जर्सी जातीचा कारवड, तसेच मारोती अभिमान नागपुरे यांची एक म्हैस आणि एक जंगली डुक्कर या जनावरांचा करंट लागून मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची विद्युत तार तुटून जमिनीवर पडली आणि त्याला स्पर्श झाल्यामुळे वरील जनावरे करंटला बळी पडली. या घटनेने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट पसरली असून, विद्युत विभागाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक प्रशासन आणि महावितरणकडून पंचनामा करून योग्य नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे.

## विदेशी दारू वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई

**आर्वी**- पोलीस स्टेशन, आर्वी येथील गुन्हे प्रगटीकरण पथकास मिळालेल्या माहीतीवरुन वर्धा टि-पॉईंट येथे नाकेबंदी केली. एमएच ३२ एएच १२५२ क्रमांकाची कार तळेगाव येथून आर्वी शहराकडे येत असताना थांबवित चालक रवींद्र नरेश मसराम (२८) रा. बुरड मोहल्ला, वर्धा याला ताब्यात घेतले. त्याच्या गाडीची पाहणी केली असता, तीन खरड्याच्या खोक्यात ४५ हजार ५०० रुपये किमतीच्या १३० सिलबंद शिश्या, विदेशी दारूने भरलेल्या २४ हजार रुपये किमतीच्या ९६ सिलबंद शिश्या, १४ हजार रुपये किमतीच्या ४८ सिलबंद शिश्या पोलिसांना आढळून आल्या. या दारूसाठ्या सोबत चार लाख रुपये किमतीची एमएच ३२ एएच १२५२ क्रमांकाची कार पोलिसांनी ताब्यात घेतली. जप्ती पंचनामा कारवाई करुन जप्त करण्यात आली. आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन, आर्वी येथे महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये व मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेण्यात आलेला आहे. ही कारवाई आर्वीचे ठाणेदार सतिश डेहणकर यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनात गुन्हे प्रगटीकरण पथकाचे पोलीस अधिकारी संतोष चव्हाण, जमादार योगेश चन्ने, अंकुश निचत, प्रवीण सदावर्ते, सुरज रिठे, सागर पाचोळे, भुषण इखार, संजय बोकडे व इतरांनी केली आहे.

## स्मशानभूमीत आढळला मृतदेह

**पुलगाव**- येथील सिताघाट स्मशानभूमी परिसरात अज्ञाताचा मृतदेह आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. ही घटना उघडकीस आली. सिताघाट स्मशानभूमी परिसरातील उघड्या खोलीत अनोळखी इसमाचा मृतदेह असल्याचे लक्षात येताच पोलिसांना माहिती देण्यात आली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. शिवाय मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविला. याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

## रेल्वेस्थानकाच्या लिफ्टजवळ आढळले नवजात बाळ

**वर्धा- श**हराबाहेरील सेवाग्राम रेल्वेस्थानका वरील लिफ्टजवळ रेल्वे सुरक्षा बलाच्या कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे आणि संवेदनशीलतेमुळे नवजात बाळ आढळून आले. त्याला वाचविण्यात यश आले आहे.फलाट क्रमांक १ वर गस्त घालत असताना मुस्ताक शेख, योगेश लेकुरवाले यांना लिफ्टजवळ बाळाच्या रडण्याचा आवाज आला. त्यांनी जवळच्या शेडमधील बेंचखाली पाहिले असता कापडात गुंडाळलेले एक नवजात बाळ दिसले. त्यांनी परिसरात बाळाच्या आईचा शोध घेतला. बाळाची आई किंवा पालक मिळून आले नाहीत. नंतर उपनिरीक्षक बी. एस. बघेल यांना कळविण्यात आले. त्यांच्या सूचनेनुसार चाइल्ड लाइन, वर्धाला माहिती देण्यात आली. सुमारे ४ ते ५ दिवसांपूर्वी जन्मलेल्या या बाळाला प्रथम स्टेशनच्या प्रतीक्षा कक्षात आणण्यात आले. जिथे त्याची प्राथमिक आरोग्य काळजी घेण्यात आली. त्यानंतर, चाइल्ड लाइन वर्धाचे प्रतिनिधी रेल्वेस्टेशनवर पोहोचले. त्यांच्या पुढाकाराने बाळाला आरोग्य तपासणीसाठी सरकारी रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी तपासणीअंती बाळाची प्रकृती सामान्य असल्याचे सांगितले, तेव्हा पुढील कारवाई करिता ताब्यात घेतल्याचे सांगण्यात येते.

## कोपरा ग्रामपंचायत कार्यालय येथे नागरिकांना सनदपत्रिकेचे वाटप

### भुमिअभिलेख कार्यालयाचा सहभाग

**सोमेश ठाकरे / चानकी कोपरा**

काही दिवसा अगोदर ड्रोन द्वारे संपूर्ण तालुक्यातील गावांचे सर्वे झाले होते. त्या सर्वेच्या अहवालानुसार भूमी अभिलेख कार्यालय सेलू यांच्यामार्फत कोपरा ग्रामपंचायत येथे नागरिकांना या सानप पत्रिकेबाबत माहिती देऊन त्यांना ते वाटप करण्यात आले हे महत्त्वाचे कागदपत्र मानले जात असून यामुळे प्रॉपर्टी कार्ड बनवून नागरिकांचे खरेदी विक्रीचे व्यवहार सुलभ होणार आहे. त्याचबरोबर गावातील जमिनी विषयाचे वाद हे आता संपुष्टात येणार असल्याची माहिती भूमी अभिलेख यांच्या कर्मचाऱ्यांनी नागरिकांना सांगितले यावेळी उपरा ग्रामपंचायत कार्यालय येथे भूमी अभिलेख कारल्याचे सुधीर गंजीवाले उदय डोंगरे कोपरा येथील सरपंच आरती मसराम ग्रामसचिव ज्योती दुधबळे यांच्यासह गावातील महिला पुरुषांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १३अंक २२७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल**- atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## मेळघाटात वन्यप्राण्यांचा अधिवास धोक्यात

# वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धनासाठी आ. सुलभा खोडकेंचा अधिवेशनात प्रश्न

**अमरावती/प्रतिनिधीः-** मेळघाटातील वन्यजीवांचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी शासनाने जवळपास २५ वर्षापूर्वी ज्याकाही उपाययोजना निर्माण केल्यात, त्या आता पूर्णतः नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. पाणवठे कोरडे पडून खस्ताहाल झालेत तर बंधारे सुद्धा नष्ट होत असल्याने मेळघाटात वन्यजीवांकरिता पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भात ठोस उपाययोजना करण्याची गरज असून त्याबाबतची परिस्थिती जाणून घेण्यासाठी वन विभाग व जलसंधारण विभागाची बैठक घेऊन एक समिती स्थापन करणार का ? व मेळघाटात प्रत्यक्ष भेट देऊन व पाहणी करीत वन्यजीवांच्या संवर्धनासाठी प्रभावी उपाययोजना करणार का ?असा प्रश्न आ. सुलभा संजय खोडके यांनी राज्याच्या पावसाळी अधिवेशनामध्ये उपस्थित केला.

आज शुक्रवार दि.११ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र विधानसभेच्या कामकाजादरम्यान प्रश्नोत्तराच्या तासामध्ये प्रश्न क्रमांक ७ वर बोलतांना आ. सुलभा खोडके यांनी मेळघाटातील वन्यजीवांच्या संवर्धनाच्या बाबतीत निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीबाबत सभागृहाला अवगत केले. त्यांनी सांगितले कि, अमरावती जिल्ह्यातील मेळघाटचा भाग हा नैसर्गिक वनसंपदेने नटलेला भाग असून त्याठिकाणी विविध प्रजातींच्या वन्यजीवांच्या अधिवासाबाबतीत पोषक स्थिती आहे.




म्हणूनच शासनाने वर्ष १९७४ मध्ये मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची स्थापना केली. त्याठिकाणच्या वन्यजीवांना पाण्याची मुबलकता व्हावी म्हणून वर्ष १९९२-१९९३ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या काळात जलसंधारण समिती गठीत करण्यात आली व त्या माध्यमातून मेळघाटात पाणवठे व बंधारे साकारण्याचे काम वर्ष १९९९ पर्यंत पूर्ण करण्यात आले. मात्र हि कामे २५ वर्ष जुनी झाली असल्याने त्याठिकाणच्या सर्वच कामांची दुरावस्था होऊन ते मोडकळीस आले असल्याने त्याठिकाणी चांगल्या नवीन सुधारणा करणे सुद्धा आवश्यक झाले असल्याची बाब आमदार महोदयांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.

मेळघाटात खंडू , कापरा , गडगा,सिपना नदी वाहत असून पुढे या नद्यांचे पाणी मध्यप्रदेशातील तापी नदीला येऊन मिळते. मेळघाटातून वाहणाऱ्या नद्यांचे पाणी हे साठविण्यासाठी जी बंधारे व पाणवठे तयार करण्यात आली ते जुने व खस्ताहाल झाल्याने सद्यस्थितीत पाणी साठवता येत नाही. परिणामी उन्हाळ्यातील मे महिन्यात पाणवठे कोरडे पडल्याने वन्यजीवांची भटकंती होऊन अनेक अपघात घडले आहेत. पाण्याची सोय नसल्याने मेळघाटात वन्यजीव , पक्षी , सरपटणारे जीवांचा अक्षरशः मृत्यू होत असून त्यांचे जीवनच धोक्यात आले आहे. मेळघाटात वन्यजीवांचे रक्षण करण्यासाठी नैसर्गिक पाणवठे , कृत्रिम पाणवठे , सोलर पंप, सिमेंट बंधारे, माती बंधारे अशी कामे जलसंधारणाच्या माध्यमातून नव्याने करणे नितांत गरजेचे असल्याचे सुद्धा आमदार महोदयांनी सांगितले.यावर उत्तर देतांना राज्याचे वनमंत्री ना. गणेश नाईक यांनी मेळघाटात वन्यजीवांच्या संवर्धनाबाबत असलेल्या उपयोजनासंदर्भात सभागृहात माहिती दिली. ज्याकाही कृत्रिम व नैसर्गिक पाणवठ्यामध्ये दुरवस्था निर्माण झाली आहे, तेथे गाळ काढणे व अन्य दुरुस्तीची कामे करण्यात येईल . तसेच मेळघाटात चांगल्या सुविधा निर्माण करण्यासाठी आगामी काळात बैठक घेऊन प्रत्यक्ष भेट देणार असल्याचे वनमंत्री ना. गणेश नाईक यांनी मान्य केले.

# आदिवासी आश्रम शाळांमध्ये शिक्षकांना कंत्राटी पद्धतीने नियुक्ती द्या-जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अमरावती/प्रतिनिधीः-** आदिवासी विकास विभागातील शासकीय आश्रम शाळांमधील क्रीडा, कला व संगणक शिक्षकांची कंत्राटी पद्धतीने निवड करावी अशी मागणी आदिवासी संघटनांच्यावतीने आज गुरुवार १० जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनातून करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, आदिवासी आश्रम शाळाचे रिक्त पद कंत्राटी पद्धतीने भरतेवेळी मेळघाट मधील पेसा क्षेत्रातील बेरोजगार पात्र बीपीएड कला,संगणक, उमेदवारांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. मेळघाटातील शासकीय आश्रम शाळा,जिल्हा परिषद मध्ये पेसा बाहेर उमेदवाराची नियुक्ती करण्यात येऊ नये अशी विनंती देखील करण्यात आली. पेसा क्षेत्रामधील सर्वसाधारण उमेदवारांना ११ महिन्याची नियुक्ती पुनश्च देऊ नये. पेसा क्षेत्रातील पात्र उमेदवारांची यादी निवेदना सोबत जोडण्यात आली.पेसा क्षेत्राबाहेरील उमेदवारांची नियुक्ती किंवा निवड केल्यास तीव्र आंदोलनचा इशारा देखील देण्यात आला.

निवेदन देतेवेळी योगेश कासदेकर, रमेश पटोरकर, किशोरीलाल धुर्वे, रामदास डिमरेकर ,रमेश कासदेकर ,दशरथ पटोरकर, राजेंद्र धुर्वे ,सुनील जांबेकर, प्रेमलाल जांबेकर ,निलेश जांबेकर, पुष्पा सावलकर ,रोहित भिलावेकर, विनोद मावस्कर, राजा ठाकरे, सुभाष पटेल, संतोष वलके, भुरेलाल बैठेकर, शंकर धुर्वे, रामबाबू कासदेकर सह आदी शिक्षक उपस्थित होते.

# डॉ.पंजाबराव देशमुख रूग्णालयात भरती होणा-या रूग्णांकरीता मोफत उपचार

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे गुरूपोर्णिमेचे औचित्य साधून रूग्णांचे सेवेसाठी एनएसवाय योजना दि. ७ जुलै २०२५ पासून सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत भरती होणा-या रूग्णांना विशिष्ठ वैद्यकीय सेवा निःशुल्क उपलब्ध करून देण्यात येतील. सदर योजना दि. १० जुलै ते ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत सुरू राहील. या दरम्यान भरती होणा-या रूग्णांच्या महत्वाच्या चाचण्या, शस्त्रक्रिया व भरतीचे शुल्कासह बेड शुल्क मोफत ठेवण्यात आलेले आहेत. तसेच सुपरस्पेशालिस्ट वर्गात मोडणा-या शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत मोफत राहतील.



तरी या संधीचा जास्तीत जास्त गरजू रूग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन श्री शिवाजी शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे व प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्नील मोहोड यांनी केले आहे.

---

पुणे येथील दिवाणी न्यायाधीश / सिनियर डिव्हिजन साहेब यांचे पुणे येथे श्री. एम. पी. [illegible] कोर्टात
किरकोळ अर्ज नं. [illegible]/२०२५
[illegible]

### जाहिर नोटीस

श्री. [illegible] मधुसुदन मोडे ..... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

नोटीस देण्यात येते की, [illegible] अर्जदार [illegible] बॉम्बे रेग्युलेशन ८ - १८२७ अन्वये या कोर्टाकडे [illegible] मधुसुदन मोडे मृत्यू दि. [illegible] [illegible] सर्टिफिकेट मिळण्याकरिता अर्ज केलेला आहे.

ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत [illegible] असेल, [illegible] तारीख [illegible] रोजी सकाळी [illegible] वाजता स्वतः किंवा वकिलामार्फत या कोर्टात हजर रहावे.

आज दि. [illegible] रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
हुकूमावरून
सही
अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, पुणे

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.४३८/२०२५ ने.ता. २१.०८.२०२५

**अर्जदार :**
१) **कांता प्रल्हाद धुर्वे,** वय ८८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.ब्राम्हणवाडा पाठक, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२) **सुशिला वासुदेवराव मलगाम,** वय ६२ वर्षे, धंदा -घरकाम
रा. उदखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
३) **शांता रामराव वटटे,** वय ५९ वर्षे, धंदा - घरकाम
रा. प्रवरा बिल्डींग रुम नं.०५, दुर्गा मंदिर जवळ, एम ए सी बी कॉलनी नवी मुंबई, येरोली ठाणे
४) **निर्मला वासुदेवराव उईके,** वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
रा. नवबागपुरा, अचलपूर सिटी, ता.अचलपूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मय्यत प्रल्हाद सिताराम धुर्वे यांचा मृत्यू दि.०५/०९/१९७४** रोजी **रा.ब्राम्हणवाडा पाठक, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.तसेच मय्यत दिलीप प्रल्हादराव धुर्वे यांचा मृत्यू १७/०५/२००२ रोजी रा.ब्राम्हणवाडा पाठक, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.**

अर्जदारांना मयताचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. **त्याकरिता विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.४३८/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०९.०७.२०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
**आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

**वि.श्रीमती एन.सी.सोरटे ७ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - १२२४/२०२५
श्री दादाराव अधिक सहा विरुध्द निरंक
पुढील तारीख ०४.०८.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
१. **दादाराव शामराव उके,** वय ७९ वर्षे, धंदा - निरंक
रा.बोरगाव धर्माळे, ता.जि.अमरावती
२. **माणिक शामराव उके** (मयत) तर्फे वारस
२-अ. **ज्ञानेश्वर माणिकराव उके** ,वय ६४ वर्षे, धंदा - शेती
रा.व्दारा हिरामण झोडपे, भांडेवाडी रोड, प्रबुध्द विहार जवळ, भांडेवाडी नागपूर, ता.जि.नागपूर
२-ब. **काशिनाथ माणिकराव उके** ,वय ५९ वर्षे, धंदा - शेती
रा.व्दारा हिरामण झोडपे, भांडेवाडी रोड, प्रबुध्द विहार जवळ, भांडेवाडी नागपूर, ता.जि.नागपूर
२-क. **एकनाथ माणिक उके** ,वय ५८ वर्षे, धंदा - शेती
२ व ३ रा. सुकळी,ता.जि.अमरावती
२-ड. **कुसुम प्रल्हाद हुमने** ,वय ६३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.धामणगाव रेल्वे, ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती
३. **बापुराव शामराव उके,** वय ७४ वर्षे, धंदा - शेती
रा.सावंगा विठोबा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत शामराव रामजी उके हे दि.०२/०९/२०१४ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे व मयत गंगुबाई रामराव उके हया दि.२८.०१.१९६० रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार दादाराव व अधिक सहा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री दादाराव अधिक सहा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०४.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
वि.श्री.एस.टी.सहारे, २५ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११४१२०२५
श्री.कमल अधिक तीन विरुध्द निरंक
पुढील ता.१९.०७.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Kamal Ambadas Tirmare, Age 77 Yrs. Occu.: Household
2. Ravindra Ambadas Tirmare, Age 46 Yrs. Occu.: Labour
3. Rajendra Ambadas Tirmare, Age 44 Yrs. Occu.: Labour
` Appli.No.1 to 3 R/o. Campaspura, Old Town Badnera, Tq.Dist.Amravati.
4. Sau.Rashmi Subhashrao Babre, Age 43 Yrs. Occu.: Houehold
R/o.Kanfodi, Tq.Bhatkuli Ganojadevi, Maharashtra-444602

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अंबादास चंद्रभान तिरमारे** हे दिनांक 14.04.2023 रोजी Amravati येथे मयत झाले. अर्जदार **कमल अधिक तीन विरुध्द निरंक 01** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कमल अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३.०६.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.४४०/२०२५ ने.ता. २१.०८.२०२५

**अर्जदार :**
१) **सुनिता बाबूरावजी काळे,** वय ६४ वर्षे, धंदा - घरकाम
२) **शिवाजी बाबूरावजी काळे,** वय ४५ वर्षे, धंदा - शेती
३) **जिवन बाबूरावजी काळे,** वय ४४ वर्षे, धंदा - शेती
४) **अश्विनी सुनिलराव ठाकरे,** वय ३८ वर्षे, धंदा - घरकाम
अर्जदार क्र.१ ते ३ रा.चिंचोली काळे, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार क्र.४ रा.हिवरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मय्यत बाबूरावजी रामराव काळे यांचा मृत्यू दि.१०/०५/२०२५** रोजी **रा.चिंचोली काळे, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.**

अर्जदारांना मयताचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. **त्याकरिता विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.४४०/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०९.०७.२०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
**आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

**वि.श्री.एस.एस.बिंगरदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज -१२७९/२०२५
श्रीमती मधुराबाई अधिक दोन विरुध्द निरंक
पुढील तारीख १३.०८.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1) **Madhuibai Yadavrao Sardeshpande**
Age 87 yrs., Occu.- Household
R/o. Kaloti Nagar, Near Dastur Nagar, Amravati.
2) **Vivek Yadavrao Sardeshpande** , Age 59 yrs., Occu.- Service
R/o. Kaloti Nagar, Near Dastur Nagar, Amravati.
3) **Mohini Kamlakar Nandedkar** , Age 51 yrs., Occu.- Household
R/o Kanchan Wadi, Paithan Road, Aurangabad (Sambhaji Nagar)

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत यादव दत्तात्रय सरदेशपांडे** हे **दि.०७.०१.१९७२** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार मधुराबाई अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती मधुराबाई अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०५.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**(Jt. C.J.J.D.) मा.सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१७४/२०२५** **ने.ता.१३.०८.२०२५**

**लक्ष्मण--वि--निरंक**

**अर्जदार :**
१. **लक्ष्मण किसनरावजी मेश्राम**
रा.शिवणी रसुलापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. **श्रीमती देवकाबाई नामदेवराव खंदार**
रा.शिवणी रसुलापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. **सौ.कांताबाई आत्माराम मेश्राम**
रा.गौरखेडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. **रमेश किसनराव मेश्राम**
रा.शिवणी रसुलापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
५. **शंकर किसनराव मेश्राम**
रा.शिवणी रसुलापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
६. **महादेव किसनराव मेश्राम**
रा.शिवणी रसुलापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत किसन जंगलू मेश्राम यांचा मृत्यू दि.३०.१०.२००९ रोजी शिवणी रसुलापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती तसेच मयत सुमित्राबाई किसन मेश्राम यांचा मृत्यू दि.१४.११.२०१२ रोजी शिवणी रसुलापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला आहे.** दोघांचे मुळगाव संग्रामपुर हे आहे. अर्जदार हे मयत यांचे मुले व मुली आहेत. **अर्जदार हेच मयत** यांचे कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १० जुलै २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

No.2
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF Shri R.B.Raja
14th Jt.Civil Judge Sr. Dn. Amravati.

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES
(0.5, R 1, 5)**

Spl.C.S.144/2019
**Vanmala Shridharrao Bagde Vs
Gangaram Vanduji Bagde**
NEXT DATE 14.07.2025

To,
Ranjana Ramesh Chavhan
Vidyut Nagar, Amravati.
2nd Address Plot No.13, Mohan Nagar, Nawasari Naka Amravati. Tq.Dist.Amravati (Maharashtra)

Whereas **Vanmala Shridharra Bagde** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some person able to answer all such questions, on the 14.07.2025 at 11.00 o'clock in the forenoon, to answer the claim, and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to on the 12.03.2025 at 1.00 o'clock in the forenoon, to answer the claim, and further directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance of the day before mentioned, the suit will be heard and determined in your abasence.

Given under my hand and the seal of the Court, this 11.07.2025.

शिक्का
REGISTRAR,
Family Court, Amravati.

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.४२९/२०२५ ने.ता. ०८.०८.२०२५

**अर्जदार :**
१) **पांडूरंगजी हरिजी बागडे,** वय ७६ वर्षे, धंदा - निरंक
२) **प्रविण पांडूरंग बागडे,** वय ४१ वर्षे, धंदा - मजुरी
दोन्ही रा. कुरणखेड, पो.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मय्यत सूर्यकांताबाई पांडूरंग बागडे यांचा मृत्यू दि.०५/१०/२००० रोजी रा.कुरणखेड, पो.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.**

अर्जदारांना मयताचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. **त्याकरिता विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.४२९/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**११.०७.२०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
**आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

---

**(Jt. C.J.J.D.) मा.सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१७५/२०२५** **ने.ता.१२.०८.२०२५**

**गोलसागर --वि--निरंक**

**अर्जदार :** **गोलसागर संध्या भोसले**

**// वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत संध्या मुलकाजी उर्फ मुळकुजी भोसले यांचा मृत्यू दि.०४.०३.१९८८ रोजी जगतपुर, पो.सालोड कसबा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला आहे.** तेच त्यांचे मुळगाव सुध्दा आहे. अर्जदार हा मयत यांचा मुलगा आहे. **अर्जदार मयत** यांचे कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १० जुलै २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

**वि.श्री.पी.के.धोंडगे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - १३१३/२०२५
श्रीमती कमलाबाई अधिक दोन विरुध्द निरंक
पुढील तारीख १२.०८.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
१. **कमलाबाई काशिनाथ जामनिक,** वय ७९ वर्षे, धंदा - गृहिणी
२. **समाधान काशिनाथ जामनिक,** वय ४७ वर्षे, धंदा - मजुरी
दोन्ही रा.नवसारी, व्हिएमव्ही, अमरावती, ता.जि.अमरावती
३. **पदया गजानन इंगळे,** वय ४२ वर्षे, धंदा - गृहिणी
रा.देगुरखेडा, पो.शिंगणापुर, ता.भातकुली, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत काशिनाथ किसन जामनिक हे दि.२७/०१/२०१९ रोजी अमरावती,ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार कमलाबाई अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती कमलाबाई अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०८.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१२४२/२०२५
प्रज्ञा व ईतर -वि- चंदाबाई
पुढील ता.१४.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. प्रज्ञा प्रविण वानखडे, वय ६१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. श्रेयांश प्रविण वानखडे, वय ६१ वर्षे, व्यवसाय - नाबालीक.
सर्व रा.कठोरा गांधी कठोरा खुर्द, पो.सलोरा खुर्द, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** **चंदाबाई विनायकराव वानखडे,
वय ६५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.**कठोरा गांधी कठोरा खुर्द, पो.सलोरा खुर्द, ता.जि.अमरावती

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **प्रविण विनायकराव वानखडे** हे अनुकमे दिनांक 13.05.2025 रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **प्रज्ञा प्रविण वानखडे व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रज्ञा प्रविण वानखडे व ईतर** विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१२४१/२०२५
वैशाली व ईतर -वि- निरंक
पुढील ता.१३.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. वैशाली सुधाकरराव हरणे
वय ५५ वर्षे, व्यवसाय - घरकाम.
रा.म्हाडा कॉलनी, अकोली रोड, साईनगर, अमरावती ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** **निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अमित सुधाकरराव हरणे** हे अनुकमे दिनांक 23.04.2025 रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **वैशाली सुधाकरराव हरणे** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वैशाली सुधाकरराव हरण** विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### जाहीर नोटीस

अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-२, न्यायाधीकरण यांचे न्यायालय
किरकोळ अर्ज क.२९७/२०२३ ने.ता.०४.०९.२०२५

**अर्जदार -** १. जय सेवालाल कृषी केंद्र

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** **श्री.पेस्टीसाईड ॲण्ड केमिकल्स**

APPLICATION FOR CONDONATION OF DELAY U/S 5 OF LIMITATION ACT

ज्याअर्थी वरील अपिलार्थी जय सेवालाल कृषी केंद्र प्रोप्रा.गणेश सुभाषराव जाधव, वय ३० वर्षे, व्यवसाय - व्यापार, रा.सुकळी, ता.आर्णी, जि.यवतमाळ व सत्र न्यायाधीश-२, अमरावती यांचे न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी रिस्पांडंट श्री.पेस्टीसाईड ॲण्ड केमिकल्स तर्फे भागीदार श्री.विनीत अरुण श्रीराव, वय ४५ वर्षे, व्यवसाय - व्यापार, यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी अर्जाच्या सुनावणीसाठी दिनांक ०४.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-२ अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलमार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक २५.०२.२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

अमरावती
दिनांक २५.०२.२०२५
शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (न्यायिक विभाग)**
जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक ३०७
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

### सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी

# अमरावती जिल्ह्यातील प्रकल्पांकरीता आ.संजय खोडके यांनी केली भरीव निधीची मागणी

**अमरावती/का.प्र.**

शेता,उद्योग आणि पाणीपुरठा योजना अशा शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी शासनाच्या वतीने सिंचन प्रकल्प निर्मिती व विकासावर जोर दिला जात असतांना अमरावती विभागात सिंचनाचा मोठा अनुशेष वाढला आहे. वर्ष २००७ साली स्थापन झालेले सिंचन प्रकल्प अजूनही पूर्णत्वास न आल्याने अमरावती भागात मोठ्या प्रमाणात मागासलेपण दिसून येते. याबाबत राज्य विधिमंडळात कारणमीमांसा करतांना आ.संजय खोडके यांनी अमरावती भागातील सिंचन प्रकल्प पूर्णत्वास आणण्यासाठी प्रभावी मनुष्यबळ उपलब्ध करण्यासह प्रकल्पाच्या रखडलेल्या कामांना टप्पाटप्याने निधी न देता भरीव निधी देण्याची मागणी अधिवेशनात केली.

राज्यविधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात शुक्रवार ११ जुलै २०२५ रोजी वरिष्ठ सभागृहातील कामकाजा दरम्यान प्रशोत्तराच्या तासामध्ये आ.संजय खोडके यांनी अमरावती विभागातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासंदर्भात आवश्यक उपाययोजनात्मक बाबींकडे सभागृहाचे लक्ष वेधले. त्यांनी सांगितले कि. कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे सिंचनाचे प्रकल्प पुढे जात नाही. सिंचन प्रकल्पांवर अनेक तांत्रिक बाबीतून काम करण्यासाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. त्यामुळे नव्याने प्रत्येक जिल्ह्याच्या बाबतीत कर्मचाऱ्यांना आकृतिबंध तयार करण्याची गरज असल्याने अमरावती विभागातील आकृतीबंधामध्ये बदल करणार का ? असा प्रश्न आ. संजय खोडके यांनी उपस्थित केला.



तसेच अमरावती जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प निधी अभावी रखडले असल्याचे त्यांनी सांगतांना याबाबत सभागृहाला विस्तृत माहिती दिली. अमरावती जिल्ह्यातील पांढरी, वासनी, लोअर पेढी, बोर्डीनाला प्रकल्प , पेढी बॅरेज अशा प्रकल्पांचे काम जवळपास वर्षे २००७ पासून सुरु आहे.मात्र या प्रकल्पांच्या कामांना तुकड्या-तुकड्यात निधी मिळत असल्याने प्रकल्पांची कामे पूर्ण झाली नाहीत, अनेक प्रकल्प रखडले असल्याने आता एका-एका प्रकल्पाला भरीव निधी देणे गरजेचे आहे.त्यामुळे रखडलेल्या सिंचन प्रकल्पासाठी एक पूर्ण प्रकल्प गृहीत धरून निधी देणार का? असा प्रश्न उपस्थित करून आ. संजय खोडके यांनी विधानपरिषदेचे ध्यानाकर्षण केले. तसेच मुख्यत्वे नदी जोड प्रकल्पातून अमरावती विभागात सिंचनाची भरपूर सोय होणार असल्याने अमरावती विभागातील दुष्काळी अवर्षणग्रस्त जिल्ह्यामंध्ये पाण्याचे समसमान नियोजन करण्याची त्यांनी सभागृहाला सूचना केली.

यावर उत्तर देतांना राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले की, मनुष्यबळाबाबतीत नोकरभरतीचा विषय आहे. त्यामुळे याबाबतचा आकृतिबंध अंतिम टप्प्यात असून चार महिन्यापर्यंत आकृतिबंध पूर्ण झाल्यावर नोकरभरती घेण्यात येणार असल्याचे ना. गिरीश महाजन म्हणाले. तसेच दुष्काळी भागात सिंचनाची सोय व्हावी म्हणून राज्यशासनाने नदी जोड प्रकल्प हाती घेतला आहे. प्रकल्पाची आखणी करतांनाच सिंचनासाठी मुबलक पाणी देण्याचे धोरण आहे. त्यामुळे विदर्भातील सर्वच दुष्काळी अवर्षणग्रस्त जिल्ह्यांमध्ये मुबलक पाणी देऊ असे स्पष्टीकरण सुद्धा मंत्रीमहोदयांच्या वतीने देण्यात आले. त्याचबरोबर अमरावती जिल्ह्यातील सर्व रखडलेले सिंचन प्रकल्प आगामी २०२७ पर्यंत पूर्णत्वास आणण्याचा शासनाचा प्रयत्न असून सिंचन प्रकल्पांची कामे मार्गी लावण्यासाठी कुठलाही निधी कमी पडू देणार नाही. जिथे निधीची आवश्यकता आहे तिथे निधी देऊ , असे सुद्धा जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन यांनी सभागृहात उत्तर देतांना सांगितले.

## शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी वर्षभर मोहीम

### जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे निर्देश



**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही, यासाठी शाळाबाह्य, अनियमित आणि स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आता वर्षभर विशेष मोहीम राबवली जाणार आहे. या संदर्भात, शाळाबाह्य विद्यार्थी जिल्हा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची बैठक नुकतीच पार पडली.

मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्यासह जिल्हा पोलीस अधीक्षकांचे प्रतिनिधी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, महिला व बालविकास अधिकारी, समाज कल्याण अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, समग्र शिक्षाचे जिल्हा समन्वयक, तसेच माध्यमिक व प्राथमिक शिक्षणाधिकारी यावेळी उपस्थित होते. प्रत्येक घरोघरी, बस स्थानके, रेल्वे स्थानके, हॉटेल्स, खानावळी, सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठा, वीटभट्ट्या आणि शेतशिवारात जाऊन शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घ्यावा. स्थलांतरित होणाऱ्या प्रत्येक मुलाला शाळेने शिक्षण हमी कार्ड द्यावे आणि ते मूल जिथे स्थलांतरित होईल, तेथील जवळच्या शाळेत त्याला प्रवेश द्यावा. मुख्याध्यापकांनी स्थलांतराची संभाव्य जागा आणि प्रवेशाची माहिती दप्तरी नोंदवून ठेवावी. या सर्वेक्षणात स्वयंसेवी संस्थांनी मदत करावी, तसेच माध्यमिक विभागाने १८ वर्षांपर्यंतच्या मुलींना शिक्षण प्रवाहात ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. सर्वेक्षण केवळ ठराविक कालावधीत न करता, वर्षभर ही प्रक्रिया चालू ठेवावी, जेणेकरून एकही मूल शिक्षणाविना राहणार नाही, असे निर्देश जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिले.

## रुग्णांच्या सोयीसाठी ५०० कॅरी बॅग्ज प्रदान

### रोटरी क्लब ऑफ अमरावती इंद्रपुरीचे उपक्रम

**अमरावती/का.प्र.**

रोटरी क्लब ऑफ अमरावती इंद्रापुरीच्या नवीन कार्यकारिणीच्या स्थापनेनंतर त्यांचा पहिला उपक्रम म्हणून पीडीएमसी मेडिकल कॉलेजच्या रक्तपेढीतील रुग्णांच्या सोयीसाठी रक्ताच्या पिशव्या वाहून नेण्यासाठी ५०० कॅरी बॅग्ज प्रदान करण्यात आल्या.



रोटरी क्लब ऑफ अमरावती इंद्रापुरीने त्यांच्या दुसऱ्या उपक्रमात वृक्षारोपणाच्या पहिल्या टप्प्याचा भाग म्हणून, भातकुली येथील ज्ञानज्योती पब्लिक स्कूलच्या परिसरात विविध प्रकारच्या ५० रोपांची लागवड केली. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी देवराई संस्थेचे डॉ. राजेश शेरेकर यांच्यासह पर्यावरणप्रेमी मिलिंद तट्टे यांचे विशेष सहकार्य मिळाले. डॉ. प्रल्हाद राऊत, ज्योती राऊत, ज्ञानज्योती शाळेचे वेदांत राऊत यांच्यासह उपक्रमाचे प्रमुख श्रीकांत राऊत, चैताली राऊत, क्लबचे अध्यक्ष ओमप्रकाश लालवाणी, सचिव गिरीश गगलानी, रोटरी क्लब ऑफ अमरावती इंद्रपुरीचे सदस्य सचिन देशमुख, सचिन सरोदे, प्रशांत व्यास, सुरज प्रभातकर, सुरज तारेकर, डॉ. लालवाणी, पूर्वी गगलानी, शुभांगी तारेकर, सरिता उमक, शैलजा लालवाणी, चारुल लालवाणी शाळेचे कर्मचारी यांनीही पूर्ण सहकार्य केले. तसेच इर्विन रुग्णालयात आधार बहुराष्ट्रीय संस्थेच्या सहकार्याने एचआयव्ही बाधित ३०विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. उपक्रमाचे प्रमुख सूरज तारेकर,माजी अध्यक्ष सागर बुटे यांच्यासह क्लबच्या अध्यक्ष व सचिव, प्राची ललवाणी, पूर्वी गगलानी आणि आधार बहुराष्ट्रीय संस्थेच्या अध्यक्षा विद्या तायडे, अंजली देशमुख, दीपिका फुलाडी, प्रतिभा थोरात, अक्षय गोहाड, अनिल माहोरे, लोकेश आवारे, राहुल भोरगडे यांनी आपले मोलाचे योगदान दिले.

## बेलोरा केंद्राची प्रथम शिक्षण परिषद



**बेलोरा/वार्ताहर**

बेलोरा केंद्राची शैक्षणिक सत्र २०२४ २५ मधील प्रथम शिक्षण परिषद जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळा चिंचोली काळे येथे अतिशय उत्साहात पार पडली.या शिक्षण परिषदेमध्ये गावातील ग्रामपंचायत सरपंच तसेच माजी विस्तार अधिकारी संध्या रायबोले यांनी आपली विशेष उपस्थिती दर्शविली यावेळी केंद्राच्या केंद्रप्रमुख विजया धंदर यांनी शिक्षण परिषदेची आवश्यकता आणि त्यातून होणारे फायदे याबद्दल समर्पक असे विवेचन करून शिक्षण परिषदेला सुरुवात झाली.

शिक्षण परिषदेच्या पहिल्या सत्रात पुस्तक,गणवेश वाटप यु-डायस बद्दल माहिती तसेच निपुण अंतर्गत शिक्षकांनी करावयाची वाटचाल अशा विविध विषयावर मार्मिक चर्चा झाली.शिक्षण परिषदेच्या दुसऱ्या सत्रात चिंचोली काळे येथील मुख्याध्यापक लेंडे यांनी परिसर व भौतिक सुविधा यावर उत्तम असे मार्गदर्शन करीत परसबाग या विषयावर विशेष चर्चासत्र आयोजित केले.एकंदरीत विचार करता आजची झालेली शिक्षण परिषद ही शैक्षणिक दृष्ट्या फार सफल झाली.या शिक्षण परिषदेला केंद्रातील शंभर टक्के शिक्षकांनी उपस्थिती दर्शविले तसेच दुपार सत्रात माननीय गटशिक्षणाधिकारी वकार खान यांनी शिक्षण परिषदेला भेट देत विद्यार्थ्यांची प्रगती कशी होईल यासाठी शिक्षकांनी कोणते प्रयत्न करावे याबद्दल विशेष मार्गदर्शन केले.प्रास्ताविक ठाकूर यांनी आभार प्रदर्शन पखाले यांनी केले.

## राष्ट्रीय विद्यालयात अवतरले पंढरपूर

### वारकरी चिमुकल्यांच्या ग्रंथ दिंडीतून सामाजिक एकतेचे दर्शन

**अचलपूर/वार्ताहर**

शहरातील पब्लिक वेल्फेअर सोसायटी द्वारा संचालित राष्ट्रीय विद्यालयातील चिमुकल्यांनी महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय संस्कृतीचे दर्शन घडवून सामाजिक एकतेचा संदेश दिला. यावेळी विठू माऊलीचा गजर करीत भव्य दिव्य दिंडीने परिसर पंढरीमय झाले होते.



सद्यास्थितीत राज्यभरात वारकरी भक्तांना विठू माऊलीच्या दर्शनाचे एकच वेड लागले आहे. गाव गावातून पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकरी भक्तांची रीघ लागली आहे. राज्यात सगळीकडे सुख शांती लाभो,शेतकरी, शेतमजूर बांधवांना भरभराटी लाभो अशी विठुरायांच्या चरणी प्रार्थना करून शालेय चिमुकल्यांनी टाळ मृदुंगाचा गजर केला. राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक सर्वेश राठी यांनी सुरुवातीला ग्रंथ पूजन करून दिंडीला हिरवी झेंडी दाखविली. रिंगण सोहळा, पारंपारिक फुगडी, लेझीम आणि टाळ मृदुंगाच्या गजराने वातावरण अगदी भारावले होते.यावेळी मुख्याध्यापक सर्वेश राठी, प्र.पर्यवेक्षिका सौ.स्वाती सवाई , शिक्षक प्रतिनिधी नेहा ठाकूर, प्र .पर्यवेक्षक प्रकाश भगत,सचिन घवळे,सांस्कृतिक सचिव दिलीप बोबडे,शिक्षिका श्यामल नाथे , ऋतुजा गावंडे शिक्षकेत्तर प्रतिनिधी कैलाश गायकवाड समस्त राष्ट्रीय हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज चे समस्त शिक्षक - कर्मचारी वृंद उपस्थितीत होते .

## प्लास्टिक बंदीची कठोर अंमलबजावणी

### १५० किलो प्लास्टिक बॅग जप्त; दुकान सील

**अमरावती/का.प्र.**

शहरात प्लास्टिक बंदीच्या अंमलबजावणीत महापालिकेने मोठी कारवाई करत कडक संदेश दिला आहे. उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभाग व बाजार परवाना विभागाच्या विशेष पथकाने सक्करसाथ येथील शनी मंदिराजवळील जय ट्रेडर्स या दुकानावर धाड टाकून सुमारे १५० किलो प्रतिबंधित प्लास्टिक कॅरीबॅग जप्त केल्या. कारवाईदरम्यान संबंधित दुकान सील करण्यात आले.



या धाडीत सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी प्रशांत मेहरे, स्वच्छता निरीक्षक विकी जेधे, पोलीस अधिकारी व इतर कर्मचारी सहभागी होते.महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, राज्य शासनाने लागू केलेल्या प्लास्टिक बंदीचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई अनिवार्य आहे. पर्यावरणाच्या रक्षणासाठी ही बंदी अत्यंत आवश्यक असून, नियमांचे पालन करणे सर्व नागरिकांचे कर्तव्य आहे. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले, 'प्लास्टिक बंदी केवळ व्यापाऱ्यांसाठीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकासाठी आहे. अमरावती शहराचे पर्यावरण व भविष्यासाठी आपण सर्वांनी एकत्र यावे, प्लास्टिक ऐवजी कापडी, कागदी किंवा इतर पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करावा.' महानगरपालिकेने नागरिकांना आवाहन केले की, नियम तोडणाऱ्यांची माहिती तात्काळ प्रशासनाला द्यावी. शहरातील प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबवली जाणार असून, नियम तोडणाऱ्यांवर कोणतीही दयामाया न ठेवता कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## किशोरवस्था परिषदेत अमरावतीच्या बालरोगतज्ज्ञांचा सहभाग

**अमरावती/का.प्र.**

पुणे स्थीत डी वाय पाटील मेडिकल कॉलेज मध्ये आयोजीत किशोरावस्था परिषदेत शहरातील वरिष्ठ बालरोगतज्ञ डॉ सतीश अग्रवाल यांनी 'पर्यावरणाचे किशोरांच्या आरोग्यावर होणारे परिणाम' विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी नमूद केले की,दैनंदिन जीवनात प्रयुक्त कृत्रीम रसायनांचा किशोरांच्या प्रजनन अवयव, एंडोक्राइन सिस्टम, रोगप्रतिकारक शक्ती सह पूर्ण आरोग्यावर विपरीत परिणाम होते. डॉ अग्रवाल यांनी सर्वांना नैसर्गिक जीवनपद्धतचे अवलंब करण्यास आवाहन केले.



परिषदेत डॉ ढेकणे, डॉ तिवारी, डॉ पांढरीकर आदींनी मार्गदर्शन केले. कॉन्फरंसच्या सफलतार्थ डॉ शैलजा माने, डॉ संगीता लोढा, डॉ चित्रा कुलकर्णी, डॉ तृप्ती महात्मे, डॉ निशिकांत कोतवाल इ नी परिश्रम घेतले. यावेळेस केंद्रीय आईएपीच्या आगामी अध्यक्ष डॉ नीलम मोहन, सचिव डॉ योगेश पारेख, कोषाध्यक्ष डॉ अतनु भद्रा, किशोरावस्था समूहाच्या अध्यक्ष डॉ हिमाबिंदू सिंह, डॉ रुचिरा गुप्ता, डॉ स्वाती भावे, डॉ शमिक घोष, डॉ संजय पाखमोडे, डॉ सुलभा व अमोल पवार, डॉ गीता पाटील, डॉ संजय लालवानी, डॉ अभिजित भारद्वाज, डॉ संजय रत्नपारखी, डॉ प्रमोद जोग, डॉ संजय मराठे, डॉ राजेंद्र पाटील, डॉ स्वाती वाघमारे, डॉ राम भरत, डॉ मंगेश गाधारी, डॉ अर्चना व हेमंत जोशी, डॉ सुचित तांबोळी, डॉ राजेश कुळकर्णी, डॉ रेणू बोराळकर, डॉ नेहा सिंह, डॉ शिल्पा दूधगावकर, डॉ आनंद देशपांडे, डॉ संजय चव्हाण, डॉ सुधीर माळवडे, डॉ बाळकृष्ण गरुड, डॉ ऋचा चौरसिया इ उपस्थित होते. या उपलब्धीबद्दल आयएपी अमरावती शाखेचे अध्यक्ष डॉ शैलेश जायस्वाल, उपाध्यक्ष डॉ प्रतिभा काळे, सचिव डॉ नीलेश पाचकवडे, कोषाध्यक्ष डॉ ऋतुराज देशमुख, प्रचार प्रमुख डॉ आदित्य टांक, सहसचिव डॉ अमित रुद्रकार सहित सर्वांनी अभिनंदन केले.

## संक्षिप्त

### डॉ. पंजाबराव देशमुख रूग्णालय येथे वातविकार तज्ञ उपलब्ध

**अमरावती-**श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे वातविकार तज्ञ डॉ. परिक्षीत सगदेव हे ओपीडी क्रमांक ०३ येथे दुस-या व चौथ्या गुरुवारी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत उपस्थित राहणार आहेत. ज्या रूग्णांना प्रचंड वेदना देणारे व जीवनशैलीवर प्रभाव पाडणारे आमवात, गठीयावाता सारखे विकार औषधांनी पूर्ण नियंत्रणात येतात व वेदनायुक्त जीवण शक्य आहे. शिवाय ॲन्किलोजिंग, स्पॉन्डिलायटिस, सोरायटिक आर्थरायटिस, लुपस, गाऊट आणि असे अनेक प्रकारचे वातविकार आधुनिक औषध व उपचारांनी नियंत्रणात राहतात आणि वेळेत वातविकार तज्ञांचा सल्ला घेतला तर व्यंगही टाळणे शक्य आहे. त्यामुळे कुठल्याही प्रकारचे सांध्यांचे दुखणे अंगावर काढू नका, असे आवाहन करण्यात येत आहे.जिल्ह्यातील व बाहेरील वात आजाराने ग्रस्त रूग्णांनी या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन श्री शिवाजी शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, व प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्नील मोहोड यांनी केले आहे.

### रोटरी क्लब तर्फे वृक्षारोपण



**अचलपूर-**विविध सामाजिक उपक्रमात सदैव तत्पर राहणारी रोटरी क्लब तर्फे यावर्षीही शहरातील प्रसिद्ध सैतुतबाग हनुमान मंदिराच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.यामध्ये विविध प्रकारचे एकूण ५१ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.यापूर्वी ही आरोग्य शिबिर, वृक्षारोपण, साफसफाई अभियान, गरजू मुलांना पुस्तके वाटप असे विविध उपक्रम रोटरी क्लब तर्फे राबविल्या जाते. यावेळी रोटरी क्लब चे अध्यक्ष गौरव बंसल यांनी निसर्गाचे संतुलन ठेवण्यासाठी वृक्षारोपण सह संवर्धनसाठी परिसरात वृक्षारोपणाचा मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले.यावेळी रोटरीचे अध्यक्ष गौरव बंसल, सचिव ऋषी शाह, डॉ प्रीती खोजरे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच सदस्य निलेश गावंडे, दीपक गुल्हाने, आकाश भंसाली, पंकज मालवीय, राम ककरणीया, संतोष नरेडी, कमल केजडीवाल, महेंद्र राठी, पंकज गुप्ता, मुकेश चौधरी, पंकज अग्रवाल, सुरेंद्र बरडिया, संजोग वैष्णव, विवेक लष्करी, मनीष खंडेलवाल, ललित राठी, राजकुमार बारडिया, श्याम मालू, संदीप गुप्ता,अश्लेष लोढ़े,आदेश बरडीया आदी उपस्थित होते.

### स्व.लक्ष्मीकांत पसारकर मूकबधिर विद्यालयात गुरुपौर्णिमा

**अमरावती-**स्थानिक श्री बळवंतराव पसारकर शिक्षण संस्थेद्वारा संचालित स्व. लक्ष्मीकांत पसारकर मूकबधिर विद्यालय, बुधवारा येथे गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रसंगी कार्यक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष सुभाषजी गावपांडे व सचिव भाऊसाहेब पसारकर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विवेक कलोती उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन मुख्याध्यापिका भावना पसारकर यांनी केले. तसेच अध्यक्ष गावपांडे यांचे स्वागत पुनम मडावी यांनी केले. सचिवांचे स्वागत भावना पसारकर यांनी केले. यानंतर गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून स्थायी समिती सभापती विवेक कलोती यांनी भावना पसारकर यांचा सत्कार केला. यानंतर त्यांनी शाळेला शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केला. कार्यक्रमाला विद्यार्थी वर्ग व कर्मचारी वर्ग मुकुंद पकडे उपस्थित होते.

### सहकार व्यवस्थापन पदविका (डि.सी.एम.) प्रवेश सुरू

**अमरावती-**महाराष्ट्र शासन सहकार विभाग यांच्या वतीने प्रसिध्द केलेल्या परिपत्रकानुसार सहकारी संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास सहकारी व्यवस्थापन पदविका (डि. सी.एम.) अनिवार्य केले आहे. त्यामुळे राज्यातील सहकारी संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचे कामकाज सांभाळुन हा अभ्यासक्रम दुरुस्थ शिक्षण पध्दतीने पुर्ण करता यावा तसेच राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरूणांना सहकार क्षेत्रातील विविध सहकारी संस्थामध्ये सदर पदविका अभ्यासक्रमामुळे नोकरीची संधी उपलब्ध व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी संघाने १३ सहकार प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून हा अभ्यासक्रम पोस्टल पध्दतीने सुरू केला आहे.अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या, पुणे अंतर्गत भाऊसाहेब भोकरे सहकार प्रशिक्षण केंद्र अमरावती येथे १ जुलै ते ३१ डिसेंबर २०२५ या मदतीकरीता दि. १ जुलै ते ३० जुलै २०२५ या मुदतीत प्रवेश देणे सुरू आहे. त्या करीता प्राचार्य भाऊसाहेब भोकरे सहकार प्रशिक्षण केंद्र अमरावती यांच्याशी संपर्क साधुन प्रवेश निश्चित करावा. संपर्क क्रमांक-९८८१०४७६६८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सहकार प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य यांनी केले आहे.

### 'रिसर्च मेथडॉलॉजी' विषयावर एसटीटीपी

**अमरावती-**पी. आर. पोटे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावतीच्या अप्लाइड सायन्सेस अँड ह्युमॅनिटीज विभागाच्या वतीने, तसेच ISTE द्वारा एक आठवड्याचा ऑनलाईन लघुकालीन प्रशिक्षण कार्यक्रम (एऊऊइ) नुकताच यशस्वीरित्या पार पडला. 'रिसर्च मेथडॉलॉजी' या विषयावर घेण्यात आलेल्या या प्रशिक्षणात देशभरातून २०० हून अधिक सहभागींनी सहभाग नोंदवला.कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी संशोधन कार्यातील पद्धतशीर दृष्टिकोन, शास्त्रीय विचारसरणी आणि ज्ञाननिर्मितीचे महत्व अधोरेखित केले. त्यांनी सहभागी सर्व संशोधक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून अशा कार्यक्रमातून मिळणारे व्यासपीठ भविष्यातील वाटचालीस कसे सहाय्यक ठरते यावर भर दिला.संस्थेचे संचालक डॉ.पी.एम.खोडके सर यांनी 'शब्दांकित विचार' व्यक्त केले. त्यांनी संशोधनाची नैतिकता, नवनवीन कल्पना, डेटा विश्लेषण आणि जगभरातील बदलत्या संशोधन प्रवाहांशी जुळवून घेण्याचे महत्व स्पष्ट केले.कार्यक्रमात विविध तज्ज्ञ मार्गदर्शकांनी संपूर्ण आठवडाभर सहभागींचे मार्गदर्शन केले.यात डॉ.ए.बी.गडीचा, डॉ.झेड.आय.खान, डॉ.डी. ए.शहाकार, डॉ.एस.बी.वरकड, डॉ.एस.एस.लढ्ढा, डॉ.व्ही.बी. कुटे, डॉ. व्ही. बी.गडीचा यांचा समावेश होता. विविध सत्रांमधून संशोधन पद्धती, डेटा संकलन आणि विश्लेषण, रिपोर्ट लेखन, साहित्य सर्वेक्षण अशा महत्त्वाच्या बाबींवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

# बिच्छन नदी पात्राच्या डोहात बुडून दोन बालकांचा मृत्यू

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर तालुक्यातील बुरडघाट येथील दोन बालकांचा बिच्छन नदीत बुडून मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना आज (दि.११) दुपारी घडली. नदीतील खोल डोहात बुडून भावेश रवींद्र चौरसिया (वय १०) आणि दीपक तुलसीदास ब्राम्हणे (वय ८) या दोन भावांचा मृत्यू झाला असून, संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ११ जुलै रोजी दुपारी ३ ते ३.३० वाजेच्या सुमारास बुरडघाट येथील पाच लहान मुले गावालगत असलेल्या बिच्छन नदीवर आंघोळीसाठी गेली होती. यामधील भावेश आणि दीपक हे दोघे खोल पाण्यात गेल्याने बुडाले.



त्यांच्यासोबत असलेल्या तिघांनी धावपळ करून गावात ही माहिती कळवली. घटनेची माहिती मिळताच गावकरी आणि नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. दोन्ही मुलांना नदीतून बाहेर काढून तातडीने अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

भावेश चौरसिया हा गौरखेडा कुंभी येथील एका खाजगी कॉन्व्हेंटमध्ये इयत्ता पाचवीत तर दीपक ब्राम्हणे इयत्ता चौथीत शिकत होता. दोघेही नात्याने आतेभाऊ व मामेभाऊ होते. लहानग्यांचा अकाली मृत्यू झाल्याने दोन्ही कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे परिसरात शोकाचे वातावरण आहे. बुरडघाट ग्रामस्थांसह शिक्षक, शालेय विद्यार्थी व नातेवाईकांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण ☞(पान २ वर)

# प्रेमसंबंधातून झाला त्या महिलेचा खून

## - आरोपीला अटक - शिरजगाव कसबा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील प्रकरण



**अमरावती/प्रतिनिधीः-** शिरजगाव कसबा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ब्राम्हणवाडा-शिरजगाव रस्त्यावर बगाडी नाल्यात एका महिलेचा मृतदेह सापडल्याने खळबळ उडाली होती. या प्रकरणात केवळ काही तासांतच अमरावती ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने तपास करून अनिल जांभेकर (वय ३५, रा. गळंकी, अचलपूर) याला अटक केली आहे. त्याने प्रेमसंबंधातून दुर्गा श्रोती (वय २७) हिचा खून केल्याची कबुली दिली आहे.



१० जुलै रोजी नाल्यात अर्धवट कुजलेल्या अवस्थेत, हातपाय बांधलेले आणि ब्लँकेटमध्ये ☞(पान २ वर)

### पैशाच्या वादातून खून

दुर्गा आणि अनिल यांचे प्रेमसंबंध होते. आरोपी अनिलने पोलिसांना सांगितले की, ५ जुलै रोजी पैशाच्या वादातून दोघांमध्ये भांडण झाले. रागाच्या भरात त्याने दुर्गाचा गळा आवळून खून केला. नंतर तिचा मृतदेह ब्लँकेटमध्ये गुंडाळून हातपाय बांधले आणि मोटरसायकलवरून नाल्यात फेकून दिला.

# चारित्र्यावर संशय घेत पत्नीची निर्घृण हत्या

## डोक्यात सिलेंडर घालून केला अंत

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत कौटुंबिक वादातून पतीने पत्नीच्या डोक्यात गॅस सिलेंडर घालून निर्घृण हत्या केल्याची खळबळजनक घटना यवतमाळ शहरातील वाघापूर परिसरात घडली. जयमहाराष्ट्र नगर येथे मंगळवार, दि. ९ जुलै रोजी रात्री १०.१५ वाजताच्या सुमारास ही थरारक घटना घडली.या घटनेत इंद्रकलाबाई विजयलाल जयस्वाल (वय ५२) यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पतीचे नाव विजयलाल जयस्वाल (वय ६०) आहे. पतीनेच पत्नीच्या डोक्यात सिलेंडर घालून ☞(पान २ वर)



# बाजार चौकात महिलेवर प्राणघातक हल्ला

**वरुड/प्रतिनिधीः-** वरुड शहरातील बाजार चौकात मंगळवारी सायंकाळी एका महिलेला अज्ञात इसमाने चाकूने सपासप वार करत जबर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली. जखमी अवस्थेतील महिलेला वरुड उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने तिला तत्काळ अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले आहे. जखमी महिलेचे नाव कांता रमेश परतेकी (वय ३२, रा. मिरची प्लॉट, वरुड) असे असून,



त्या सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास शेतातील काम आटपून घरी परतत होत्या. याचवेळी बाजार चौकात एका अनोळखी इसमाने, तोंडावर

# सुपर स्पेशलिटीमध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

## प्रहारच्या नेतृत्वात कंत्राटदार कंपनीच्या मनमानीचा विरोध

**अमरावती/प्रतिनिधीः-** विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात कर्मचारी पुरविणाऱ्या सक्षम फॅसिलिटी मुंबईच्या दादर येथील कंत्राटदाराच्या मनमानी कारभारामुळे संतापलेल्या कर्मचाऱ्यांनी प्रहार जनशक्ती पार्टीच्या नेतृत्वात आज शुक्रवार ११ जुलै रोजी काम बंद आंदोलन केले.

वैद्यकीय अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे



की, कंत्राटी कामगाराचे वेतन दर महिन्याला दिले जावे, वर्क ऑर्डर अनुसार वेतन द्या, तीन वर्षाचे बोनस आणि वेतन तफावतची रक्कम देण्यात यावी, पीएफ व एसआयसीईचे चलान चार वर्षांनी नावासह द्या, शासनाच्या ☞(पान २ वर)

# मालखेड रेल्वे अंडरब्रिज पाण्याने तुडूंब : जनजीवन विस्कळीत

## १३ जुलैपासून ग्रामस्थासह रेल्वे लाईनवर बसून आंदोलन

## -खा. बळवंत वानखडे यांचा रेल्वे प्रशासनाला इशारा






**अमरावती/प्रतिनिधीः-** मालखेड परिसरातील नवीन रेल्वे अंडरब्रिज सतत पावसामुळे पाण्याने तुडुंब भरला.परिणामी स्थानिक नागरिकांना अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून, रुग्ण, विद्यार्थी, कामगार व सर्वसामान्य नागरिक यांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. स्थानिक नागरीकांच्या सुविधेकडे रेल्वे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने संतप्त नागरीकांनी खा. बळवंत वानखडे यांचेकडे धाव घेत ☞(पान २ वर)

# बॉम्ब असल्याचा कॉल करणारा युवक यूपीचा!

## -अखेर पोलिसांच्या जाळयात

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात बॉम्ब ठेवल्याचा खोटा कॉल करून खळबळ उडवणाऱ्या २३ वर्षीय तरुणाचा पोलिसांनी अखेर पर्दाफाश केला आहे. हा तरुण उत्तर प्रदेशातील भदोही जिल्ह्यातील गणेश तिवारी असून, तो सध्या





अमरावतीत एका मोबाईल दुरुस्तीच्या दुकानात काम करत होता. गुरुवारी सकाळी ११ वाजता सरोज चौकातील दुकानातून त्याला अटक करण्यात आली.

गणेश तिवारी याने पोलिस तपासात धक्कादायक खुलासा केला की, फक्त गंमत म्हणून आणि नागरिकांच्या चेहऱ्यावर भीती पाहण्यासाठी त्याने रेल्वे स्टेशन, जयस्तंभ चौक आणि इर्विन चौक या ठिकाणी बॉम्ब ठेवल्याचा बनाव उभा केला. इतकंच नव्हे तर, त्याने स्वतःचा आवाजही बदलून पोलिसांना गोंधळात टाकण्याचा प्रयत्न केला होता. पोलिस☞(पान २ वर)

# अचलपुर येथून देशी पिस्तूल व जिवंत काडतूस जप्त

## आरोपीच्या मुसक्या आवळल्या

## स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीणची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** अचलपूरातील हरम नाका येथून एका २१ वर्षीय तरुणाकडून देशी बनावटीचे पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणच्या पथकाने ही गुरुवारी रात्री ही धडक कारवाई केली. आरोपीकडून कोणताही



वैध परवाना सादर न केल्याने त्याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ जुलै रोजी पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे हरम नाका, अचलपूर येथे सापळा रचण्यात आला. यावेळी ☞(पान २ वर)

# फुटपाथवरील अतिक्रमणावर महानगरपालिकेची कारवाई

## -दोन ट्रक साहित्य जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा झोन क्रमांक ४ अंतर्गत नवाथे प्लॉट ते साईनगर दरम्यान फुटपाथवर अनधिकृतपणे उभ्या असलेल्या हातगाड्या आणि लोखंडी पानठेल्यांवर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई केली. या मोहिमेत चायनीज खाद्यपदार्थ विक्रेते, फळ विक्रेते आदींच्या



सुमारे दोन ट्रक भर साहित्य जप्त करण्यात आले.

ही कारवाई दि.१० जुलै रोजी सकाळी १०:३० वाजता महानगरपालिका आयुक्त यांच्या आदेशानुसार☞(पान २ वर)

# २७ दिवसाच्या बाळाला गरम सळाखीने पोटावर दिले ३२ चटके

## -आठवड्याभरात केळी गावातील दुसरी घटना

## -अघोरी उपचाराने पुन्हा हादरला मेळघाट

**अमरावती/प्रतिनिधीः-** कुपोषणामुळे जगाच्या नकाशावर आलेल्या मेळघाट येथील आदिवासींमध्ये अंधश्रध्दा खोलवर रूजली आहे. विज्ञान युगातही ग्रामीण भागात अंधश्रद्धा पहावयास मिळत आहे. चार-पाच दिवसांपूर्वीच एका २० दिवसाच्या बालकाच्या पोटावर गरम सळाखीने चटके देण्यात आले होते. ही घटना ताजीच असताना आज पुन्हा एका २७ दिवसाच्या बालकाच्या पोटावर सळाखीने चटके दिल्याची घटना



समोर आली आहे. एकाच आठवड्यात घडलेल्या या दोन घटनांमुळे मेळघाट हादरला आहे. प्रशासना ☞(पान २ वर)

# तासाभरात लागला चोरीचा छडा!

## आरोपी गजाआड, -गाडगेनगर पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर परिसरातील घरफोडीप्रकरणी गाडगेनगर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने अवघ्या एका तासात आरोपीला जेरबंद करत सुमारे १७ हजार रुपयांचे प्लंबिंग साहित्य व मुद्देमाल जप्त केला. पोलिसांच्या या तत्परतेमुळे स्थानिक नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे.

११ जुलै रोजी सायंकाळी गौरव तनसुखलाल खत्री (वय ४२, रा. कॅम्प रोड, झिरो डिग्री



मागे) यांनी गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या घरातून १७,५०० रुपयांचे प्लंबिंगचे साहित्य अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले होते. गुन्हा नोंद होताच☞(पान २ वर)

# मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी केली फिशरीज हबची पाहणी





**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज फिशरीज हबची पाहणी केली. पाहणी दरम्यान शहर अभियंता रविंद्र पवार, नोडल ऑफीसर तथा पशुशल्य चिकित्सक डॉ. सचिन बोंद्रे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, अग्निशमन प्रमुख लक्ष्मण पावडे, अभियंता राजेश आगरकर, सुधीर गोटे तसेच उपअभियंता स्वप्नील जसवंते, शरद तिनखेडे आणि मनपाचे अन्य कर्मचारी उपस्थित होते. अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये फिशरीज हब ची उभारणी करुन निलक्रांती योजने अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे कोळी लोक, मत्स्य उत्पादक, अमरावती महानगरपालिका क्षेत्रालगत विक्रेते तथा ग्राहक यांना फायदा होणार आहे. या ☞(पान २ वर)

# खा.अरविंद सावंत यांचा पश्चिम विदर्भ दौरा

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** आगामी काळात होऊ घातलेल्या महानगर पालिका, नगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती च्या निवडणूक पूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हानिहाय मेळावा-बैठकाचे आयोजनासाठी शिवसेना नेते, खासदार अरविंद सावंत, संपर्क नेते, (पश्चिम विदर्भ)यांचा दौरा आयोजित करण्यात आला आहे.त्या अनुषंगाने यवतमाळ जिल्ह्याचा



मेळावा उत्सव मंगल कार्यालय यवतमाळ येथे शनिवार दि.१२ जुलै दुपारी ४ वाजता आयोजित केला आहे. या मेळाव्याला खासदार संजय देशमुख, आमदार संजय देरकर, जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड, आमदार बाळासाहेब मुनगिनवार, सागर पुरी, जिल्हाप्रमुख प्रवीण शिंदे, किशोर इंगळे, संजय निखाडे, संतोष ढवळे, महिला जिल्हा संपर्क प्रमुख सृष्टी ☞(पान २ वर)